# कमला



50

# अजिंक्यपदाची अखंड परंपरा



प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ विभागीय विजेतेपद व
आंतरविभागीय तृतीय क्रमांक प्राप्त केलेला बास्केटबॉल संघ



प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ विभागीय उपविजेतेपद
प्राप्त केलेला व्हॉलीबॉल संघ

निर्मातुं शिव सुंदरम्

ताराराणी विद्यापीठ
कोल्हापूर.

# ताराराणी विद्यापीठाच्या

# कमला महाविद्यालयाचे



## नि य त का लि क

# कमला

## १९९७-९८

## अंक तेरावा

# कमला
## १९९७-९८

**❐ अध्यक्ष ❐**

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील

**❐ प्रमुख संपादक ❐**

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

**❐ विभागीय संपादक ❐**

| | | |
|---|---|---|
| मराठी विभाग | : | प्रा. डॉ. श्री. जे. बी. शिंदे |
| इंग्रजी विभाग | : | प्रा. जे. बी. पाटील |
| हिंदी विभाग | : | प्रा. डॉ. सौ. सुमित्रा बा. पोवार |
| संपादन सहाय्यक | : | प्रा. पी. एस्. जाधव |
| | | प्रा. सौ. अनघा वि. पाठक |
| जाहिरात विभाग | : | प्रा. ए. एल्. नरके |
| | | प्रा. एस्. व्ही. बागल |
| | | प्रा. ए. एम्. साळोखे |
| विद्यार्थिनी प्रतिनिधी | : | कु. तृप्ती खटावकर, बी.ए.भाग तीन |
| | | कु. अर्चना पाटील, बारावी कला |

या अंकात प्रसिद्ध (व्यक्त) झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# रणरागिणीस अभिवादन



## युगस्त्री छत्रपती ताराराणी

दिल्ली झाली दीनवाणी
दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी
भद्रकाली कोपली

दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती



**कै. सौ. सरोजिनीदेवी**

**तथा**

**कमला विश्वनाथ पाटील**

अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा



**कै. मा. काकाजी**

**तथा**

**डॉ. व्ही. टी. पाटील**

# आमचे स्फूर्तिस्थान



## प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील

एम. ए. पीएच्.डी.

# संपादकीय...

## मनोगत

'कमला १९९७' हा तेरावा नियतकालिक अंक अतिशय आनंद व अभिमानाने आम्ही वाचकाना सादर करीत आहोत. या अंकात विद्यार्थिनींचे विचार व भावना शब्दरुपाने व चित्ररुपाने मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला आहे.

## कमला महाविद्यालयाची स्थापना

सन १९४५ साली ताराराणी विद्यापीठ ही महिला शिक्षण संस्था व १९८४ साली कमला वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना ज्यांच्या दातृत्वातून व असीम त्यागातून झाली त्या कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील तथा कमलादेवी यांचे नांव महाविद्यालयास देण्यात आले.

आज कमला महाविद्यालयातील विद्यार्थिनी संख्या १५५० पर्यंत वाढली आहे. अल्पावधीत या महाविद्यालयाने लक्षणीय प्रगती केली आहे. या संस्थेचे संस्थापक कै. डॉ. व्ही. टी. पाटील व त्यांच्या धर्मपत्नी कै. सौ. सरोजिनीदेवी यांचे आशीर्वाद, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे धडाडीचे व कौशल्यपूर्ण नेतृत्व आणि अव्याहत परिश्रम यामुळे महाविद्यालयाने प्रगती शिखरे गाठली आहेत.

## उल्लेखनीय घटना

स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात १७ डिसेंबर १९९७ रोजी थोर स्वातंत्र्यसेनानी श्रीमती डॉ. उषा मेहता यांना 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' देऊन गौरव केला.

श्रीमती शकुंतलादेवी हिंदुराव घाटगे यांच्या हस्ते कमला महाविद्यालयाच्या अभ्यासिका बांधणीचे चौकट पूजन दि. ९ मार्च १९९८ रोजी करण्यात आले.

## 'कमला १९९७' चा गौरव

शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा १९९६-९७ यावर्षी आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थिनींचे लेख बक्षिसपात्र ठरले.

कु. अश्विनी जाधव बी. ए. भाग 3, पुराण-साहित्य संशोधन शास्त्र (वैद्यक व अभियांत्रिकी विज्ञान विषय व्यतिरिक्त इतर लेखात) प्रथम क्रमांक.

कु. सुमन दंडवते बी. ए. भाग 3, बज गई बेल - हिंदी एकांकिका - द्वितीय क्रमांक

## शैक्षणिक प्रगती

महाविद्यालयाच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक प्रगती खालील परीक्षा निकालावरुन स्पष्ट होते.

| | | |
|---|---|---|
| बारावी कला ५०.०० % | प्रथम वर्ष कला ९७.५ % | प्रथम वर्ष वाणिज्य ९०.५८ % |
| बारावी वाणिज्य ७६.१९ % | द्वितीय वर्ष कला ९९.९० % | द्वितीय वर्ष वाणिज्य ९७.६४ % |
| बारावी विज्ञान ९०.०९ % | तृतीय वर्ष कला ८६.५३ % | तृतीय वर्ष वाणिज्य ९३.७५ % |

आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला व वाणिज्य विभागातून पुढील संख्येने विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

कला विभाग अर्थशास्त्र ६, इंग्रजी ६, हिंदी ८, समाजशास्त्र ३, होमसायन्स ४, तर वाणिज्य विभागातून एकूण १३ विद्यार्थिनी त्यातील कु. मीनल शेटे ही विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली.

## विद्यापीठ अनुदान आयोगाचे अर्थसहाय्य

कमला महाविद्यालयास नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने ९ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर केले असून त्यातील ४.५ लाख रुपये ऑडिटोरियमच्या बांधकामासाठी व ४.५ लाख रुपये पुस्तके व उपकरणे यासाठी प्राप्त झाले आहेत. महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ही बाब उपकारक वाटते.

## क्रीडा नैपुण्य

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत आमच्या संघास तृतीय क्रमांक मिळाला. युनिव्हर्सिटी कॅम्पकरिता कु. करिश्मा नाईक, कु. अर्चना बेनाडे यांची निवड झाली. आंतर विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धा खेळावयास कु. अर्चना बेनाडे ही तिरुपती येथे गेली होती. कु. वैशाली शिंदेची आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता निवड झाली व त्यानंतर ऑल इंडिया आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा अमृतसर येथे खेळली.

## राष्ट्रीय छात्रसेना

स्वातंत्र्य सुवर्णमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय कॅडेट कोर तर्फे आयोजित व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र टीममधून कॅडेट वैशाली शिंदेची निवड झाली.

## महिला विकास दालने

महिलांना सबल व स्वयंपूर्ण करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात प्रौढ व निरंतर शिक्षण विभागामार्फत अल्प मुदतीचे 'ज्युदो कराटे' व ड्रेस डिझायनिंग हे अभ्यासक्रम चालविण्यात आले.

## आभार

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार. विविध विभागीय संपादक प्रा. जे. बी. पाटील, प्रा. डॉ. सौ. एस्. बी. पवार, प्रा. ए. एल. नरके, प्रा. पी. एस्. जाधव, प्रा. एम्. ए. लोहार यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद. 'कमला १९९७-९८' नियतकालिकासाठी अर्थसहाय्य दिलेल्या जाहिरातदारांचे आम्ही ऋणी आहोत. राजहंस प्रिंटिंग प्रेसचे श्री. सी. गोसावी, श्री. अशोक कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी अंक छपाईचे काम तत्परतेने व निर्दोषपणे केले.

या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

**प्रमुख संपादक**

# भावपूर्ण श्रद्धांजली



- मदर तेरेसा, मानवतेची महान सेविका
- गुलाझारीलाल नंदा, माजी पंतप्रधान
- बासू भट्टाचार्य, चित्रपट दिग्दर्शक
- के. डी. माणगावे, ऑलिंपिक कुस्ती विजेता
- पी. सावळाराम, मराठी गीतकार
- यशवंत दत्त, मराठी चित्रपट कलाकार
- रमण लांबा, क्रिकेटपटू
- इ. एम. एस. नंबुद्रिपाद, स्वातंत्र्य चळवळीतील नेते
- श्रीमती सिंधू य. गंधे, माजी मुख्याध्यापिका

आणि सन १९९७-९८ या नियतकालिक वर्षात
दिवंगत झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, सामाजिक कायकर्ते, जवान.

माझा मराठाचि बोलु कवतिके ।
परी अमृताते पैजा जिंके ।
ऐसी अक्षरें रसिके ।
मेळवीन ॥

- संत ज्ञानेश्वर

# म रा ठी वि भा ग

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| भारतीय स्वातंत्र्याने काय मिळविले ? | (वैचारिक लेख) | कु. आरती कुंभार |
| मदर तेरेसा | (व्यक्ति परिचय) | कु. अश्विनी ढापरे |
| लक्षात राहिलेले गणपतीपुळे | (प्रवास वर्णन) | कु. रंजना पोवार |
| दुर्दैवी मंगी | (एकांकिका) | कु. गीता मस्कर |
| निकाल | (ग्रामीण कथा) | कु. अर्चना अवघडे |
| बायजामावशी | (व्यक्तिचित्र) | कु. निर्मला डफळे |
| भारतीय स्वातंत्र्य - एक दृष्टिक्षेप | (वैचारिक लेख) | कु. रत्नमाला कांबळे |
| एका रुपयाची गोष्ट | (लघुकथा) | कु. मृणालिणी आढाव |
| जेथे गवताला भाले फुटतात | (साहित्य समीक्षा) | कु. शलाका नौकुडकर |
| इंटरनेट | शास्त्रीय लेख | कु. अनुराधा सरनाईक |


## पद्य विभाग


| | |
|---|---|
| मात | कु. मनिषा सूर्यवंशी |
| नातं | कु. रत्नमाला कांबळे |
| डोळ्यांची पाती | कु. वैशाली देसाई |
| देव | कु. महानंदा शिंदे-देसाई |
| जपून गं पोरी | कु. शीतल माने |
| मदर | कु. समीक्षा इनामदार |
| जीवनरथ | कु. सविता मांगले |
| माझे मन | कु. जान्हवी कुलकर्णी |
| देव | कु. मनिषा गुरव |
| दिवस | कु. रुपाली मोहिते |
| भाव माझ्या मनीचे | कु. वंदना वास्के |
| जय-जय भारत माता | कु. स्वाती सोनार |
| बदल | कु. प्राजक्ता जाधव |
| स्वराज्य मिळाले पण.... | कु. स्वाती माने |
| घोटाळे | कु. मृणालिनी आढाव |
| बॉंबस्फोट | कु. शीतल पाटील |
| भारत माझा कृषिप्रधान | कु. तृप्ती खटावकर |
| संघर्ष | कु. शीतल रायकर |
| आम्ही वाट पहात आहोत | कु. अनुराधा सरनाईक |
| प्रश्न दोन वेळेच्या अन्नाचा | कु. सुनिता पाटील |
| दीस कसं आल्याती ! | कु. सरिता वाळके |

(वैचारिक लेख)

# भारतीय स्वातंत्र्याने काय मिळविले ?

कु. आरती निवृत्ती कुंभार
बी. कॉम. भाग - २

१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री केलेल्या आपल्या त्या सुप्रसिद्ध भाषणात भारताने बऱ्याच वर्षांपूर्वी नियतीशी केलेल्या कराराची पूर्तता होत असल्याचे पंडित जवाहरलाल नेहरुंनी म्हटले होते. भारत आता स्वातंत्र्यात आणि नवजीवनात पदार्पण करीत आहे याचेही त्यांनी स्मरण करून दिले होते. गेल्या पन्नास वर्षांचा आढावा प्रस्तुत एका लेखात घेणे म्हणजे रात्रीच्या वेळी विजेच्या एका झोतात हिमालय पाहण्यासारखे आहे. तरीही स्वातंत्र्याचा पन्नासावा वाढदिवस साजरा करताना लोकमानसात निर्माण झालेल्या विविधरंगी वातावरणाचा, उत्साहाचा आढावा घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करीत आहे. तसेच आकसाने कोणालाही बदनाम करणार नाही. मी जर सत्याशी प्रतारणा केली तर तो पंडित नेहरुंचा आणि त्यांना गुरुस्थानी असलेल्या महात्मा गांधींच्या स्मृतीचा अवमान केल्यासारखे होईल.

**भारतीय लोकशाही ५० वर्षे अव्याहत टिकली ही तिची सर्वात मोठी सिद्धी आहे. एका राजकीय प्रशासन व्यवस्थेचे घटक म्हणून स्वातंत्र्याच्या वातावरणामध्ये जवळ जवळ ९४ कोटी लोक राहत आहेत. भारतीय लोकशाही इतकी विविधता दुसऱ्या कोणत्याही लोकशाहीत अस्तित्वात नसल्यामुळे भारतीय लोकशाहीची ही कार्यसिद्धी अधिकच प्रशंसनीय ठरते. भारत म्हणजे मानवतेच्या सर्व वैशिष्ट्यांचे एकत्रित घडणारे दर्शन. जगातल्या बारा महान विद्यमान धर्माचे लोक येथे राहतात. हे सर्व बारा धर्म भारतात विकसित झाले आहेत. धर्माप्रमाणेच भाषा, वेश अशा अनेक बाबतीत विविधता असणारा जगामधील भारत हा एकमेव देश आहे.**

१९५० मध्ये स्वतंत्र भारत प्रजासत्ताक झाला तेव्हा त्याच्यापाशी ज्याचे मोजमाप करता येणार नाही अशा जमेच्या तीन बाजू होत्या. पहिली बाब म्हणजे पाच हजार वर्षांची भारतीय संस्कृती. संपूर्ण भारत कधीही एका राजकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली आलेला नव्हता. तो १८५८ च्या ऐतिहासिक अपघातामुळे व तेथून पुढे जवळ जवळ एका शतकाची म्हणजे स्वातंत्र्यापर्यंत राष्ट्रीय एकात्मतेची परंपरा लाभली हीच देशाच्या दृष्टीने जमेची दुसरी बाब होय आणि तिसरी जमेची बाब म्हणजे सर्वंकष राज्यघटना लाभणे होय.

आमच्या राज्यघटनेची सुरुवात फार चांगली झाली आणि भविष्यकाळातील सारी आव्हाने पेलण्याचे तिच्यात भरपूर सामर्थ्य होते असे आम्ही अभिमानाने म्हणू शकतो. ज्याप्रमाणे एखादा सराईत जुगारी त्याला लाभलेला अमोल वारसा बिनधास्तपणे उधळून देतो त्याप्रमाणे आम्हाला लाभलेल्या जमेच्या या साऱ्या बाजूंचा आम्ही विचका केला ही गोष्ट तितकीच खरी आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा विचार करीत असताना महात्मा गांधी, पंडित नेहरु, सुभाषचंद्र बोस, वल्लभभाई पटेल यांसारख्या नेत्यांचे योगदान आणि हजारो लाखो तरुण-तरुणी, वृद्धा स्त्री-पुरुषांच्या बलिदानाचा विसर आज पन्नास वर्षानंतर पडतो की काय अशी भीती व्यक्त केली जातेय ! सर्वत्र चिंता, भय आणि अनिश्चितता यांनी दाटलेले वातावरण, दिशाहीनता, विघटित, विनाशमय अस्थिर जीवन या सर्व बाबींमुळे भारतीय स्वातंत्र्याने काय मिळविले हा एक महाकठीण प्रश्न आज सर्वांसमोर उभा आहे आणि या प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर ५० वर्षांचा इतिहास आपल्याला पाहिला पाहिजे. कारण जॉर्ज सान्तायन यांनी म्हटल्याप्रमाणे ''प्रगतीमध्ये बदलाइतकेच सातत्यलाही महत्त्व असते. जे भूतकाळ विसरतात त्यांच्या हातून जुन्या चुका पुन्हा घडण्याचा संभव असतो''. आणि नेमके हेच आपण आज विसरलेले आहोत. हा इतिहास पाहताना काही टप्प्यांचा / मुद्यांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

### महात्मा गांधीजींचा स्वातंत्र्याचा विशाल आशय

स्वातंत्र्याची गांधीजींची कल्पना ही अतिशय व्यापक आणि विशाल होती. भारतीय स्वातंत्र्य हा गांधीजींचा ध्यास केवळ स्वराज्य निर्माण करणे हा नव्हता तर सुराज्य, पंचायतराज्य, प्रबोधनवादी , विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा समावेश इ. अनेक विशाल अर्थ त्यांना अभिप्रेत होते. महात्मा गांधीजींच्या ''ईश्वर अल्ला तेरे नाम'' आणि ''वैष्णव जन तो तेणे कहिये जो पीड पराई जाणेरे'' या दोन्ही भजनातून त्यांची भूमिका स्पष्ट होते. जनतेचे हित, सामाजिक बांधिलकी अशा अनेक गुणांनीयुक्त अखंड भारतीय सुराज्याची निर्मिती हे त्यांचे स्वप्न होते. आज देशात जो भोगवाद, चंगळवाद दिसत आहे त्या विरुद्धचा इशारा गांधीजींच्या पुढील उद्‌गारावरून दिसतो. ''भारताजवळ जी निसर्ग संपत्ती आणि जे मनुष्यबळ आहे त्यामधून भारतीय जनतेच्या सर्व गरजा भागू शकतील. परंतु काहीजणांची स्वार्थी हाव मात्र पुरी करता येणार नाही.'' मानवाने निसर्गाचा उपयोग करताना निसर्गाला ओरबाडून खाऊ नये आणि मानवी जीवन व निसर्ग यांच्यामध्ये सुसंवाद असावा ही गांधीजींची शिकवण फार महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रविज्ञान आंधळेपणाने स्वीकारताना पर्यावरणाचा जो विनाश होत आहे त्याचे भीषण स्वरूप पाहताना गांधीजींची भूमिका कशी आहे हे समजते. संपन्न राष्ट्रांना अनुरूप असणारे तंत्रविज्ञान भारतासारख्या विकसनशील आणि प्रचंड लोकसंख्येच्या देशाला परवडणारे नाही हे ओळखूनच गांधीजींनी प्रत्येकाच्या हाताला काम दिले पाहिजे आणि त्यासाठी विकेंद्रित अर्थव्यवस्था असली पाहिजे असा आग्रह धरला होता. त्यांची प्रेमाची, बंधुभावाची शिकवण, सामाजिक समतेचा आग्रह आणि त्यांचा निसर्गविषयक दृष्टिकोन, सुराज्याचे स्वप्न प्रत्येकांना प्रोत्साहित करत होते. या महान व्यक्तिमत्त्वाचा अंत हाही माणुसकीला, देशाच्या ऐक्याला काळिमा फासणारा असाच झाला. ''परधर्मद्वेष'' या विचारसरणीने साऱ्या जगाला बंधुभावाची, राष्ट्रीय एकात्मतेची हाक देणाऱ्या गांधीवादी विचारसरणीचा अंत गांधीजींची हत्या घडवून करण्याचा प्रयत्न केला. ही विचारसरणी समाजात पूर्णपणे रूजलीच नाही अशी ५० वर्षानंतरही आपण खंत व्यक्त करतो आहोत. तरीही या शतकातील एक महान व्यक्ती म्हणून जगातील लोकांनी नुकतीच मान्यता दिली कारण दोन महायुद्धांनी रक्तरंजित झालेल्या विसाव्या शतकातील जगाला प्रेमाचा संदेश देणारा महात्मा गांधी हाच एकमेव महामानव होता.

### पंडित नेहरु एक सौम्य - सौजन्यशील नेता :

महात्मा गांधीजींच्या नंतर या देशाला तारणारा दुसरा असा एक दूरदृष्टी असणारा नेता म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरु. महात्मा गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव आणि अंगी बहुश्रुत विविध गुणांच्या आधारे स्वतंत्र भारताला प्रगतिपथावर नेण्याचे महान कार्य या द्रष्ट्या नेत्याने केले. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत साधी टाचणीही बनवू शकत नव्हता. तोच भारत स्वत:च्या बळावर पोलाद कारखाने उभारीत आहे. रणगाडे, क्षेपणास्त्रे बनवीत आहे. पंडित नेहरुंनी १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री केलेल्या ऐतिहातिक भाषणातून उदात्त लोकशाही अवतरण्याचा चंग बांधला होता. गांधीजींचे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास त्यांनी घेतला आणि त्याप्रमाणे स्वत:च्या एकाधिकारशाहीच्या जोरावर भारतात औद्योगिक प्रगती त्यांनी घडवून आणली. सार्वजनिक क्षेत्रावर भर देऊन मूलभूत उद्योग सार्वजनिक क्षेत्रात उभे केले. एकंदरीत भारताच्या समृद्धीसाठी अनेक नवनवीन उद्योगरूपी तीर्थस्थाने पंडित नेहरुंच्या दूरदृष्टीने उभी राहिली. योजनाबद्ध विकासाकरिता पंचवार्षिक योजना आखल्या. आर्थिक सामाजिक विकासाबरोबरच राजकीय संरक्षण यांच्या प्रगतीकरिता भारताने संरक्षण सिद्धता निर्माण केली तेव्हा आचार्य कृपलांनी नेहरुंना लष्करशहा असे म्हटले होते. कसलेही सामर्थ्य नसताना भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरुंमुळे वजन प्राप्त झाले. भारताने उपग्रह सोडले. विज्ञानाची प्रगती साधली. याचा पायाही पंडित नेहरुंच्या दूरदृष्टीने घातला होता. हे जरी खरे असले तरी पन्नास वर्षाच्या कालखंडातील महात्मा गांधी, नेहरु व त्यानंतर कै. श्रीमती इंदिरा गांधी, कै. राजीव गांधी या घराण्याने थोडाफार सुराज्याचा प्रयत्न केला. वैज्ञानिक दृष्टिकोन , विज्ञाननिष्ठ समाज बनवण्याचाही प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर वरील काही नेत्यां व्यतिरिक्त असा एकही नेता भारताला लाभलेला नाही. त्यामुळेच स्वांतत्र्यप्राप्तीचा अर्थ आज समाजातून नष्ट होत आहे. गांधीजींचे कुशल मार्गदर्शन आणि पंडित नेहरुंसारखा प्रभाव यांच्या अभावामुळे आपली लोकशाही अंधारयुगाकडे वाटचाल करीत आहे.

### आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती :-

स्वातंत्र्यप्राप्तीपासून अधिकारावर आलेल्या सर्व

सरकारांनी राष्ट्रावर विवेकशून्य समाजवाद लादला आणि त्यामुळे लोकांच्या उद्यमशीलतेला आणि उपक्रमशीलतेला वावच उरलेला नाही. वास्तविक सामाजिक न्याय हाच समाजवादाचा खरा आशय. त्या ऐवजी सरकारी नियंत्रण आणि सरकारी मालकी म्हणजेच समाजवाद असे हे राज्यकर्ते धरून चालले. समाजवादाच्या या वरपांगी कल्पनेलाच खरा समाजवाद मानण्याची राज्यकर्त्यांकडून चूक घडल्यामुळे सामाजिक न्यायाची उपेक्षाच झाली. धर्म म्हणजे कर्मकांड आणि सत्य म्हणजे विचारसरणी असे समजण्याची जशी गफलत होते तसेच येथे समाजवादाचे झाले. सामाजिक न्यायाशिवाय समाजवाद निरर्थक ठरतो. या वस्तुस्थितीकडे आमच्या राज्यकर्त्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष केले.

भारताने स्वातंत्र्य मिळवून अखेर साधले काय ? या प्रश्नाला दुधारी धार आहे. बरेच काही साधले आणि बरेच गमावले. एकीकडे लोकसंख्या, बेकारी, भ्रष्टाचार, सांस्कृतिक ऱ्हास, नैसर्गिक संपत्तीची लूटमार, नैतिक अध:पतन सारख्या प्रश्नांची सतत टांगती तलवार ठेवली; तर दुसरीकडे, औद्योगिक प्रगती, शिक्षणाचा प्रसार, अंतराळ-विज्ञान क्षेत्रातील लक्षवेधक प्रगती वगैरे आशेचे दीपही तेवते ठेवले गेले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची पहिली २०-२२ वर्षे आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या आशादायक होती. त्यानंतर राष्ट्रीय व सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांचा झपाट्याने ऱ्हास होऊ लागलेला दिसेल. काही प्रमाणात झालेली आर्थिक व तांत्रिक प्रगतीची गुणवत्ता टिकवण्यात अपयश आलेले आहे. ५००० वर्षांच्या संस्कृतीचा वारसा असलेल्या राष्ट्रात अवघ्या पन्नास वर्षात संपूर्ण नैतिक अध:पतन झाले हे दुर्दैव, समृद्धीच्या धडपडीत समाधानी वृत्ती लोप पावत आहे. सामान्य नागरिक हा राजकारणाचा केंद्रबिंदू आहे असा दावा करणारे राजकारणी यांनी जनहित व राष्ट्रहित यांना तिलांजली दिल्यासारखे आचरण चालू केले आहे. स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी समाजाला प्रेरणा दिली. समाजाचे नेतृत्व केले त्यांना स्वातंत्र्यानंतर झेप घेऊन काही गोष्टी करण्याचे साधले नाही, मिळालेल्या स्वातंत्र्याला आंजारण्या-गोंजरण्यात ते अधिक रमले. त्यामुळे कठोरपणाने घ्यायचे निर्णय लांबले. हळूहळू स्वातंत्र्यलढ्यात केलेल्या त्यागाचे, बलिदानाचे मोलही उतरू लागले. सत्तावाद सगळ्यांना झपाटू लागला आणि नको त्या तडजोडी करण्यावर अधिकाधिक भर दिला गेला. जातिभेद व धर्मभेद यांनी पुन्हा डोके वर काढले आहे व त्याच विषाच्या प्राशनाने राजकीय सत्ता झिंगू लागली आहे. राजकारणच झपाट्याने बदलत गेले, सत्तेचे स्थैर्य संपले, एकंदरीत निराशाजनक परिस्थिती सर्वत्र निर्माण होऊ लागली आहे. भारतीय लोकसंख्येची जवळजवळ ४० कोटी ते१०० कोटी ही वाटचाल विध्वंसक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाकडे या प्रश्नाबाबत परखड भूमिका घेण्याची इच्छा नाही. निव्वळ स्वार्थ, लबाडी, गटबाजी, जात्यंध कुप्रवृत्तीने राजकीय, आर्थिक क्षेत्र बरबटलेले आहे. त्यामुळे बेकारी, दारिद्र्य यांना आता आळा घालणे अशक्य झाले आहे आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होण्याचे तेही एक कारण आहे. शिस्त व सभ्यता आज कोणालाही नको आहे.

जात्यंध व धर्मांध या शक्ती सध्या अधिक प्रभावित झाल्या असून देशात सर्वत्र धार्मिकतेची लाट आलेली आहे. कुचकामी प्रशासनामुळे नोकरशाही चढेल व मगरूर झालेली असून ती देशाला फक्त लुटत आहे.

राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. कारण एकात्मतेच्या अभावामुळे फुटीरता निर्माण होऊ लागली आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा खरा उदय लोकांच्या अंत:करणात होत असतो. लोकांच्या अंत:करणात तेवणारी एकात्मतेची ही ज्योत एकदा का विझली की त्या देशाला कोणतेही सैन्य, सरकार अथवा राज्यघटना वाचवू शकत नाही. एकंदरीत राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, नैतिक, आर्थिक अशा सव क्षेत्रात लबाडी, फसवणूक करणाऱ्यांचा एक प्रमुख गट उदयास आल्याने सर्वत्र भ्रष्टाचार, पिळवणूक, जात्यंधता, धर्मांधता यांचा उगम झाला आहे आणि नेमक्या याच बाबींवर अलीकडे राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी चिंता व्यक्त केलेली आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

### भारतीय स्वातंत्र्याचे भवितव्य :

वरील सर्व बाबींचा ऊहापोह करता, भारताला स्वातंत्र्य मिळाले ते योग्य की अयोग्य हा महाकठीण प्रश्न आपणांसमोर उभा आहे !! आजची लोकशाही ही दिशाहीन बनली आणि त्याचा परिणाम त्रिशंकू लोकसभा आणि अंतरंग व बाह्य परिणामात झाली. अंतरंग परिणाम म्हणजे विविध आर्थिक घोटाळे व बाह्य परिणाम म्हणजे काश्मीर-पंजाब प्रश्न इ. होय. थोडक्यात भारताला निसर्गाने अमाप बुद्धिमत्ता आणि कौशल्य प्रदान केलेले

आहे सार्वजनिक कर्तव्यांची जाणीव, शिस्त आणि समर्पित वृत्ती या बाबतीत दरिद्री ठेवले आहे. धंदेवाईक राजकारण्यांना सत्तेवर बोलवून आपण आपल्या समृद्ध आणि साहसी राष्ट्राला जगातील एक अत्यंत दरिद्री देश बनवून टाकले आहे. आज देशाची भावी पिढी निव्वळ "I love my India" अशी गाणीच म्हणत आहेत आणि नैतिक मूल्याची उधळण करताहेत. देशाची गाणी म्हणून, सभा, भाषणे, घोषणा करून राष्ट्रीय प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी ठोस उपायांची, परखड निर्णयांची गरज आहे. आज देशाचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आणि तातडीचे झाले आहेत ते सोडवण्यासाठी आपण आपले सारे प्रयत्न एकवटले पाहिजेत. या समस्या चुटकीसरशी सुटतील असे कोणीही मानत नाही. निसर्गाप्रमाणेच देशाच्या जीवनातही वाऱ्याच्या दिशा बदलत असतात. भरती - ओहोटीचा खेळ चालू असतो. यामध्ये आशेचा एकच किरण दिसतो, की आपण सर्व सांस्कृतिकदृष्ट्या जवळचे आहोत, आपण ऐतिहासिक आणि भाषिकदृष्ट्या जिव्हाळ्याचे आप्त आहोत. या गोष्टींची एकदा का राज्यांना आठवण झाली की प्रबल राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. अत्यंत अल्पबुद्धीने जगाचा कारभार चालवला जातो असे यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षात, पुढच्या ५० वर्षात आपल्याला काय साधायचे आहे, कसे साधायचे आहे याचा विचार आपण करायला हवा. कसे होणार बाबा ऽऽ असा गळा काढण्यात गुंतू नये. राजकीय लोकशाही लळतलोंबत का होईना पन्नास वर्षे या देशात आपण टिकविली हेही एक फार मोठे काम आपण केले आहे. वाया गेलेल्या वर्षांचा विचार करता करता येणाऱ्या भविष्याचा विचार करणे अधिक हितावह ठरेल.

आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा तेथे बुद्धिमत्ता आणि चारित्र्य याबाबतीत उत्तुंग असलेल्या नेत्यांची एक मालिकाच वावरत होती. आपण त्याच देशात राहत आहोत यावर आजचे अध:पतन पाहिल्यावर विश्वास ठेवायला जड जाते. भारतातील थोर विचारवंत, अर्थतज्ज्ञ व बुद्धिवादी व्यक्तिमत्त्व म्हणजे नानी ए. पालखीवाला यांनी भारतीय लोकशाही-तिच्या समस्या आणि भवितव्य यावर १९ सप्टेंबर १९७९ पुणे येथे एका व्याख्यानात पुढील विचार मांडले... ''सध्या आपल्या इथल्या सार्वजनिक जीवनात इतकी घाण आणि दुर्गंधी पसरली आहे की, ज्यांच्यापाशी बुद्धी आणि सचोटी आहे अशी माणसे तिकडे फिरकतच नाहीत, परंतु त्याच बरोबर हेही खरे आहे की बुद्धिमान आणि निष्ठावंत व्यक्तींनी पदार्पण केल्याशिवाय सार्वजनिक जीवनाचे क्षेत्र शुद्ध होणे शक्य नाही.'' त्याच व्याख्यानात त्यांनी आजच्या तरुण पिढीला अगत्याचे आवाहन केले आहे की, ''सार्वजनिक जीवनात पदार्पण करताना त्यांच्या विचारार्थ तीन म्हणींचा अभ्यास करावा.'' त्या तीन म्हणी प्रस्तुत लेखात मी जाणीवपूर्वक देत आहे. कारण भारतीय स्वातंत्र्याने काय प्राप्त केले हे पाहताना काय प्राप्त करावयास पाहिजे हा मुद्दा उपस्थित करणे योग्य ठरेल. त्या म्हणी खालीलप्रमाणे -

१) ''वाऱ्यावर नियंत्रण ठेवता येत नाही म्हणून जहाज सोडून देऊ नका.''

२) ''काहीही न करता यशस्वी होण्यापेक्षा काहीतरी करून अयशस्वी होणे अधिक चांगले.''

३) ''भारतीय राजकारणात नैतिकतेचा विकास होण्यासाठी बराच कालावधी लागणार असला आणि ते जरी सुसह्य ठरणार नसले तरीही तुम्ही आपले जीवन समर्पित करावे इतके दुसरे महान कार्य कोणतेही नव्हे.''

समर्पित वृत्तीचे आणि शहाणपण अंगी असलेले विशेषज्ञ मंत्रीमंडळ घेतले गेले आणि कृती करण्याबाबत आवश्यक ते स्वातंत्र्य त्यांना दिले गेले तर एका महान आर्थिक सत्तेमध्ये भारताचे ते सहज रूपांतर करू शकतील, असा विश्वास त्यांनी त्यावेळी व्यक्त केला.

आणीबाणीच्या काळातही प्रतिकार करून लोकांनी लोकशाही गाजवली. गेल्या पन्नास वर्षात केलेली प्रगती ही कमी महत्त्वाची नाही. राष्ट्राच्या जीवितात पन्नास वर्षांचा काळ हा तसा जास्त नाही. राष्ट्राची प्रगती आज जी होते आहे ती अधिक झपाट्याने व्हायला हवी हे खरे आहे. जनजागृती, जनविकास व आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर राष्ट्राची प्रगती पुष्कळ अवलंबून असते. जेवढी आणि जशी जनजागृती होईल तसतसे सामान्य मनुष्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न होतील, असा आशावाद बाळगायला काय हरकत आहे. कारण असे प्रगतीसाठी धडपडणारे कार्यकर्ते देशाच्या कानाकोपऱ्यात आजही आहेत. दबलेल्या जनतेचे प्रश्न घेऊन त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. देशाच्या राजकीय क्षितिजावर ढग जमले आहेत मात्र निरपेक्ष, निस्वार्थ बुद्धीने सुराज्यासाठी झटणारे कार्यकर्ते आशेचा नवा किरण देताहेत. शेवटी स्वातंत्र्याच्या या सोन्याला किती झळाळी, किती काजळी याचा विचार करताना आशावाद हा धरावयास हवाच...

# मदर तेरेसा

कु. अश्विनी अनंत ढपरे
बी. ए. भाग - १

**मानवतेचे मंदिर माझे,**
**आत लाविल्या ज्ञान ज्योती,**
**श्रमिक हो, घ्या इथे विश्रांती**

मानवाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला भावनांचे वरदान असते. एखाद्याच्या भावना न दुखवता त्याला सहानुभूतीने वागवणे म्हणजे मानवता. 'भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे' अशी मानवतेची परिभाषा करता येईल.

केवळ भारत देशातच नव्हे, तर संपूर्ण जगामध्ये 'मदर तेरेसां'चे नाव माहीत नाही असे लोक खरोखरच विरळ असतील. ती सर्वांची एकमेव माता-माऊली होती.

मदर तेरेसांचा जन्म २७ ऑगस्ट १९१० रोजी युगोस्लाव्हियातील स्कोप येथे झाला. त्यांचे सुरुवातीचे नाव ॲग्नेस होते. दुर्दैवाने बालपणीच त्यांना पितृवियोगाचे दु:ख झाले. त्यांना आगास्था नावाची एक बहीण व लाझरस नावाचा एक भाऊ होता. त्यांच्या आईने मुलांचे कसेबसे पालनपोषण केले. या दु:खाने त्रस्त झाल्यामुळे बालपणापासूनच त्यांचा स्वभाव चिंतनशील झाला.

२५ सप्टेंबर १९२८ रोजी ॲग्नेसने कूच करण्यासाठी प्रस्थान ठेवले. तिची आई आणि बहीण आगास्था तिला पोचविण्यासाठी झागारेट रेल्वे स्टेशनपर्यंत आल्या होत्या. त्याच वेळी त्यांचा भाऊ लाझरसला युद्धात (सैन्यात) नोकरी लागली. ॲग्नेसचा अंतिम निरोप घेताना आई म्हणाली,

''तू माझे पोटी जन्मली असलीस तरी या क्षणापासून सर्वस्वी येशूची झालीस. यापुढे येशूच तुझे माता-पिता, सखा आणि पाठीराखा आहे. अखेरपर्यंत त्याचीच तुला साथ-संगत लाभणार आहे. त्याचा आदेश, उपदेश तू शिरसावंद्य मान आणि त्याने दिलेल्या मार्गापासून ढळू नकोस.'' त्यांच्या चिंतनशील स्वभावामुळे सरतेशेवटी वयाच्या १८ व्या वर्षीच सर्व सुखांचा त्याग करून त्या भारत देशात सेवाकार्य करण्यासाठी आल्या.

**यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रिया : ।**
**चित्ते वाचि क्रियायांच साधूनामेकरूपता ॥**

कलकत्ता शहरातील सेंट मेरी विद्यालयात त्यांनी शिकवण्याचे व्रत स्वीकारले. परंतु हे त्यांच्या जीवनाचे ध्येय नव्हते. अनाथ, रोगी, अडाणी आणि दुर्लक्षित अशा लोकांची दैन्यावस्था पाहून त्या नेहमी दु:खी होत असत. त्यांनी शिक्षिकेचे पद सोडून, परिचारिकेचे प्रशिक्षण घेतले गोरगरिबांची सेवा करण्यास आरंभ केला.

कलकत्याला स्थायिक झाल्यावर ॲग्नेसने तिचा भाऊ लाझरसला फक्त दोन ओळींचं पत्र लिहिलं,

''सैन्यात भरती होऊन तू फक्त आपल्या देशाची सेवा करणार आहेस. उलट मला अखिल विश्वाची सेवा करण्याची संधी प्राप्त होणार आहे.''

इ. स. १९४८ मध्ये त्यांनी भारताचे नागरिकत्व स्वीकारलेही 'रोग्यांची सेवा म्हणजे ईश्वरसेवा' हे त्यांचे व्रत होते. ईश्वराच्या प्रेमाचा संदेश घेऊन त्या कलकत्त्यात आल्या आणि जात, पात, वंश, धर्म, भाषा, प्रदेश हे सगळे भेदभाव विसरून गोरगरीब, दीनदुबळ्या लोकांच्या सेवेसाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. लॉरेट स्कूलच्या नजीकच मोतझिल नावाची झोपडपट्टी होती. तेथील जीवन हलाखीचं होत. तेथील वीस मुलींना त्या शिकवत होत्या. त्यांच्या संस्थेतून कोणत्याही व्यक्तीला बाहेर पडता येत नव्हते. इ. स. १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाला सुरवात झाली. इ. स. १९४६ साली कलकत्त्याला हिंदू मुसलमान लोकांचा दंगा सुरू झाला. संस्थेचे सर्व नियम आणि बंधने

धाब्यावर बसवून ॲग्नेस भर रस्त्यावर आली आणि सैनिकांना उद्देशून म्हणाली,

''शाळेच्या तीनशे विद्यार्थ्यांची जबाबदारी माझ्यावर आहे, धान्यकोठार संपूर्ण रिकामं आहे. कालपासून सारी मुलं उपाशी आहेत !''

ॲग्नेसचा तो अवतार पाहून गहू, तांदूळ, साखर याने भरलेला एक ट्रक शाळेच्या कंपाऊंडमध्ये रिकामा करून मिलिटरी अधिकारी पुढे निघून गेले. तेव्हा तिचे लक्ष आजूबाजूला गेले. कित्येक सडलेली, कुजलेली प्रेते दिसली, शाळेचा दरवाजा उघडल्यावर हजारो माणसे शाळेच्या आवारात घुसली. १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस ॲग्नेसच्या मनावर खूप आघात करून गेला. ७ ऑक्टोबर १९५० मध्ये तेरेसांनी 'मिशनरीज् ऑफ चॅरिटी (सिस्टर्स)' या संस्थेची स्थापना कलकत्ता येथे केली. कलकत्ता शहरापासून सुरू झालेले हे कार्य हळूहळू संपूर्ण देशभर पसरले. इ. स. १९६३ मध्ये 'मिशनरी ब्रदर्स ऑफ चॅरिटीणि' आणि नंतर १९६९ मध्ये इंटरनॅशनल को.-वर्कर्स ऑफ मदर तेरेसा या संस्था त्यांनी सुरू केल्या.

कलकत्त्यातील झोपडपट्टीवासियांसाठी त्यांनी अनेक योजना सुरू केल्या. आसन्नमरण वृद्धांसाठी 'निर्मलहृदय', निर्मलहृदय याविषयी त्या म्हणत असतात. ''निर्मलहृदय हा आमचा बहुमोल ठेवा आहे. निदान माणसाला मृत्यू तरी सुखासमाधानाने यावा, हे आमचे घोषवाक्य आहे. डोक्यावर प्रेमाचा हात, स्मित आणि प्रेमळ वाणीचे दोन शब्द कानावर पडले म्हणजे प्रत्येक व्यक्ती सुखाने देवाघरी जाते, अशी माझी धारणा आहे. म्हणूनच भेटायला येणाऱ्यांना, आश्रितांना द्रव्यदान नको, प्रेमदान द्या. अशी माझी आवर्जून विनंती आहे''. समाजाने दुर्लक्षलेल्या कुष्ठरोग्यांसाठी 'शांती नगर' म्हणजेच कुष्ठरोग्याचं पुनर्वसन करून त्यांना स्वावलंबी जीवन जगायला शिकवणं असं होतं. त्याप्रमाणे अनाथ बालकांसाठी 'निर्मल-शिशुभवन' म्हणजे शिशुभवनात निर्वासित आणि बेवारशी बालकांचं संगोपन, कुष्ठरोग्यांसाठी फिरते दवाखाने, कुपोषणग्रस्तांसाठी केंद्रे, अंमली पदार्थाच्या आणि मद्याच्या व्यसनाधीन लोकांसाठी फिरते दवाखाने, बेघरांसाठी रात्रीचे निवारे, नैसर्गिक कुटुंब नियोजनासाठी मार्गदर्शन अशा अनेक सेवाभावी योजना त्यांनी सुरू केल्या. मदर तेरेसा झोपडपट्टयांतून वावरताना तेथील प्रश्न समजावून घेत. खरी समस्या कुपोषणाची आहे हे लक्षात येताच त्यांनी त्यांच्यासाठी पोषक आहाराची योजना केली. आणखीन एक मोलाचे कार्य म्हणजे पाकिस्तान बांगला देशाच्या युद्धामध्ये ज्या हजारो स्त्रिया अत्याचाराला बळी पडल्या होत्या त्यांना आपल्याकडे आणून त्यांनी त्यांची गर्भारपणातील व बाळंतपणाची निगा राखली आणि स्वयंपूर्ण बनण्याचे शिक्षण देऊन सन्मानाचे जिणे मिळवून दिले. उकिरड्यावर फेकल्या गेलेल्या या अर्भकांना उंदीर-घुशीचे भक्ष्यस्थान न देता त्यांना नवजीवन द्यायचा मदरचा निर्धार होता व त्यांनी आपलेसे केले. ज्या स्त्रियांना त्यांच्या नवऱ्याने टाकले त्या बायकांना आपलेसे केले. अशी एक ना दोन नव्हे तर शेकडो उदाहरणे मदरच्या कार्याची देता येतील.

या सर्व कामांसाठी प्रचंड पैसा लागतो. परंतु मदर तेरेसांचे काम पाहून त्यांना अनेक लोकांनी आपण होऊन मदत केली. ''काम चांगल्या भावनेने केलं जात असेल आणि त्यांचा लोकांना खरोखरच उपयोग होत असेल तर पैसा कुठून ना कुठून, आपण न मागताही आपल्याकडे चालत येतो'', असे मदर तेरेसांचे त्यावरचे उत्तर होते. आज जगभर त्यांच्या पाचशे शाखा कोणताही गाजावाजा न करता अखंड कार्यरत आहेत. निव्वळ मानव जन्म मिळाला यावर येशू राजी नव्हता. त्यापलीकडे जाऊन तो आनंदाने सुळावर गेला, तो तुमच्या आमच्यासाठी, अवघ्या विश्वात शांती नांदावी म्हणून,

**जे जे जगी दिसते तया ।**
**माझे म्हणा, करुणा करा ॥**

विश्वातला प्रत्येक प्राणिमात्र प्रेमाचा भुकेला असतो. वसाहतीच्या प्रवेशद्वारी प्रार्थनामंदिर उभारलं गेलं. सभोवार बागबगीचा तयार करण्यात आला. मंदिराबाहेर एका दालनात अभ्यागतांसाठी टेबल खुर्च्या, काही ग्रंथ आणि मासिके, भिंतीवर काही तक्ते तसेच पंख्याचीही सोय करण्यात आली.

त्याचप्रमाणे बेसिन, टॉयलेट आदिंची सोय झाली. मदरच्या प्रत्येक सेविकेला पांढ्या रंगाची, निळ्या बॉर्डरची साडी परिधान करण्याची सक्ती आहे. देशाबाहेर सुद्धा तिने हा भारतीय पद्धतीचा पेहेराव केला पाहिजे. त्यांनी बनविलेले नियम यांचे पालन रोज होत होते. प्रार्थना

म्हणजे जणू विचार संस्काराची खाण आहे. प्रार्थनेने माणसाचं मन मोठं होते. विचार प्रगल्भ बनतात. प्रार्थनेने अनेक भंग हृदयांना दिलासा देता येतो. गेली ६० वर्षे मदरने हा प्रार्थना प्रपंच मांडला आहे, तो दीन-दुबळ्या, गरिबांची इमानेइतबारे सेवा करण्यासाठी.

**''प्रार्थनेशिवाय विश्वास नाही**
**विश्वासाशिवाय प्रेम नाही**
**प्रेमाविना भक्ती नाही आणि**
**भक्तिविना सेवा व्यर्थ !''**

मदर तेरेसांचे चरित्रलेखक श्री. नवीन चावला यांनी त्यांना असा प्रश्न विचारला होता की, तुमच्या कामाचा स्पर्श नाही असा एक तरी देश पृथ्वी तलावावर असेल का ? त्यावर त्यांनी मंदस्मित करीत उत्तर दिले. ''चंद्रावर देखील माझ्या मदतीची आवश्यकता असेल तर मी तेथेही जाईन.'' या त्यांच्या उत्तरावरून असे वाटते की त्यांच्यापाशी अविरत काम करण्याची प्रचंड इच्छाशक्ती होती. यावरून त्यांचा महत्त्वाकांक्षीपणा दिसून येतो.

'मिशनरीज ऑफ चॅरिटी'च्या स्थापनेपासून आजतागायत मदर सारा प्रपंच सांभाळत होत्या. संस्थेचा वारस नेमण्याची जबाबदारी मदरची नसून येशूची आहे अशी मदरची धारणा आहे. नव्हे येशूचा तसा दृष्टांत आहे.

**सुखाकडे पाठ फिरवून आयुष्यभर**
**कणाकणाने दुःख वेचणाऱ्या या**
**विश्वमातेस त्रिवार विनम्र अभिवादन !**

मदर तेरेसांचे अपूर्व कार्य संपूर्ण विश्वात वंदनीय झाले. मदर तेरेसांच्या या अपूर्व कार्यामुळे संपूर्ण विश्वामध्ये त्या वंदनीय झाल्या. त्यांच्या अद्वितीय सेवाकार्यामुळे सर्व लोक प्रभावित झाले. १९६२ मध्ये पद्मश्री पुरस्कार, त्याचवर्षी खेमॉन मॅगसेस आंतरराष्ट्रीय पुरस्कार १९७१ मध्ये पोपजॉन २३ वे शांती पुरस्कार, त्याचवर्षी केनेडी आंतरराष्ट्रीय पुरस्कार, १९७३ मध्ये टेम्पलटन फाउंडेशन पारितोषिक, १९७५ मध्ये पहिले अल्बर्ट स्विट्झर आंतरराष्ट्रीय पारितोषिक, १९७८ मध्ये ऑर्डर ऑफ ब्रिटीश एम्पायर, १९७९ मध्ये शांततेचा नोबेल पुरस्कार, १९८० मध्ये भारतरत्न आणि १९८३ मध्ये राणी एलिझाबेथ दुसऱ्या यांचा ऑर्डर ऑफ मेरिट पुरस्कार, भारताने त्यांना नेहरु पुरस्कार, राजीव गांधी सद्भावना पारितोषिक, 'भारताची सुपुत्री' असे बहुमानाचे सन्मान त्यांना दिले आहेत. १९९६ मध्ये त्यांच्या मिशन ऑफ ज्युडिशियल कमिटीने मानद अमेरिकेन नागरिकत्व हा बहुमानाचा किताब त्यांना बहाल केला आहे.

अशी ही दीनाची माऊली जरी आज आपल्यातून निघून गेली असली तरी तिचे कार्य 'यावत्चंद्रदिवाकरौ' या म्हणीप्रमाणे सतत आपल्या स्मरणात राहील. अशी ही मानवतेची महान प्रेषित व भारताची सुपुत्री, दयेची सागर, असलेली मूर्ती वयाच्या ८७ व्या वर्षी दि. ५ सप्टेंबर ९७ ला मरण पावली. त्यांचे कार्य पाहून असे वाटते की

**'झाले बहु होतील बहु परंतु या सम हा.'**

◆ ◆ ◆ ◆

## मंत्राने पाणी पेटविणे

**चमत्काराचे स्वरूप -**

पिण्याचे पाणी काचेच्या पेल्यात ओतून पेटवून दाखविणे.

**चमत्काराचे गुपित -**

यात रासायनिक युक्ती वापरलेली असते. काचेच्या ग्लासात सोडियमचा तुकडा दडवून ठेवतात. त्यावर ॲसेटोन हे रसायन टाकतात. जेव्हा आग पेटवायची असते तेव्हा पिण्याचे पाणी सोडीयमच्या तुकड्यावर टाकले जाते. त्यामुळे रासायनिक अभिक्रिया सुरू होऊन सोडियम पेट घेतो. त्या आगीमुळे ॲसेटोनही पेट घेतो व मोठी ज्वाला निर्माण होते.

(प्रवास वर्णन)

# लक्षात राहिलेले गणपतीपुळे

कु. रंजना पोवार
बी. ए. भाग - २

माझा मामा म्हणजे एक चक्रीवादळच आहे. ही वादळे केव्हा येतील ते सांगता येत नाही. तसंच आहे माझ्या मामाचं. एके दिवशी मी माझ्या अभ्यासाला बसणार तोच आलं चक्रीवादळ.

'आहेत काय दाजी ?' असा खणखणीत स्वर दारात ऐकू आला आणि मी उघडलेलं पुस्तक, वही, पेन बंद केलं. आता एक तास तरी हे वादळ घोंघावणार हे मी ओळखलं.

'या बाळासाहेब' पप्पांचा उत्साह का कुणास ठाऊक ऊतू जाऊ लागला. तसे ते दोघे एकमेकांचे मित्रच आहेत.

'अहो उद्या, अंगारिका आलीय' मामा.

'अरे मामा, अंगारकी म्हण. मूळ शब्द अंगारक आहे.' मी.

' ए कार्टे, मला शहाणपणा शिकवतेस ?'

'अरे मामा, मी तुला शहाणपण शिकवलं नाही पण बरोबर आहे ते सांगणं काही गुन्हा आहे का ?' मी.

'मग अंगारक म्हणजे काय सांग '

'अरे अंगारक म्हणजे मंगळ !'

'म्हणजे गणपती हा मंगळ ग्रह.'

'मंगळ हा दुष्ट ग्रह आहे म्हणून त्याची पूजाअर्चा करून त्याची अवकृपा टाळण्यासाठी लोक प्रयत्न करतात. पण आपण आता पृथ्वी हा काही देव मानत नाही. तसे गुरू, शुक्र इत्यादी ग्रह हे काही देव मानण्याची गरज नाही.'

'बरं बरं तुला पाठवू या अमेरिकेला शिकायला. पण तू पुळ्याला येणार का उद्या ते सांग. काय हो दाजी उद्या येणार नव्हे ?' मामा उत्साहाने बोलत होता.

झाले ठरले एकदाचे गणपतीपुळे. मी कधी पाहिलेच नव्हते. मला खूप आनंद झाला. प्रवास कोणाला आवडत नाही ?

दुसरे दिवशी पहाटे पाच वाजता आम्ही निघालो. पहाटेची रम्य वेळ. शांत सुन्न रस्ते, रस्त्यावर क्वचितच लोक दिसत होते. तेही पेपरवाले, दूधवाले किंवा फिरायला निघालेले. एक लहान मुलगा दुधाच्या पिशव्यांचे ओझे सायकलला अडकवून हेलपाटत निघाला होता. वयाने १४-१५ वर्षांचा असावा. त्याच्या वयाची श्रीमंतांची मुलं अजून बिछान्यातच असतील. हा गरिबा-घरी जन्मला म्हणून निघाला हेलपाटत. पहाटे ४ वाजता उठला असेल, डोळ्यात झोप असताना. पोट भरण्यासाठी. मला अस्वस्थ वाटू लागलं. दुकानांच्या फळ्यावर फाटक्या चादरी पांघरलेले म्हातारे लोक कुडकुडत बसले होते. त्यांच्याकडे अजिबात न पाहता छाती काढून, हातातील काठीला ऐटीत हवेत फिरवीत श्रीमंत लोक फिरायला निघाले होते. दोघेही भारतीय आहेत असे मला वाटेना. एक नरकवासी दुसरा स्वर्गवासी (?) असे म्हणावेसे वाटले. गाडी आता वेग पकडू लागली.

पंचगंगेचा पूल ओलांडला. नदीवर धुके तरळत होते. पंचगंगा ! शेकडो गटारगंगा पोटात घेऊन संथ वाहणारी. शेकडो रोगांचे अनंत कोटी रोगजंतू आम्हाला नळातून देणारी तीर्थस्वरूप लोकमाता. श्रीकृष्णाला विषारी स्तनपान करण्यासाठी आलेली जणू पूतनामावशी. उजवीकडे आपली मळी पाण्यात सोडणारा बावड्याचा साखर कारखाना दिसला. शहाजोगपणे शांत बसलेला. मी त्याला कोपरापासून हात जोडले.

आता उसाची शेते लागली. दोन्ही बाजूंनी उसाची तोडणी चालू होती. मजूर ट्रॉल्या भरीत होते. त्याना मजुरी मिळणार होती. शेतकऱ्यांना कारखान्यातून बिले मिळणार

होती. हे असे का ? मलिदा चोरांनाच का मिळतो ?

पुढे पन्हाळा, मलकापूर, आंबा घाट सगळे क्रमाने आले. वळणाने जाणाऱ्या रस्त्यांमुळे प्रवास मजेचा वाटतो पण वळण म्हणजे धोका. घाट म्हणजे धोका. अशा रस्त्यावरून गाडी चालविणे म्हणजे धोका. धोके टाळण्याची अक्कल माणसात फारशी नसते. वास्तविक रस्ते सरळ करणं माणसाला इतकं कठीण आहे का ? पण माणसे गुंतलीत एकमेकांना 'सरळ' करण्यात. त्यातून त्यांना सवड तर मिळाली पाहिजे.

कोकणच्या लाल मातीचं वेड जणू माझ्या रक्तातच आहे. तांबड्या रंगाच्या विविध छटा पाहून मन हर्षित होत होतं. पण कोकणवासी लोकांच्या चेहऱ्यावर मात्र एक खिन्न भावना दिसत होती. माझ्या दृष्टीने ते भाग्यवान निसर्गपुत्र होते पण त्यांच्या दृष्टीने आम्ही देशावरची हौसेनं सैरसपाटा करणारी, सुखवस्तू असणारी, बौद्धिक कष्ट (?) करणारी माणसे म्हणजे खरी भाग्यवान होतो. निसर्ग गरिबांना कधी धार्जिणा नसतो हेच खरं. पैसेवाल्यांनी पायाला माती न लागता, गॉगलच्या डोळ्यांनी निसर्ग पहावा, केबल-कार मधून दऱ्याखोरी पहावीत. ती किती छान वाटतात. पण भाकरी नाही म्हणून करवंद शोधणाऱ्यांना निसर्ग मित्र न वाटता शत्रू वाटला तर नवल काय ? निसर्गकवींवर अशी पाळी आली असती तर त्यानी कोणत्या कविता लिहिल्या असत्या ? निसर्गप्रेमाच्या की निसर्गनिंदेच्या ? मला अवघड वाटू लागले.

शेवटी दगडांच्या, कातळांच्या पठारावर गाडी आली आणि खारा वारा समुद्राची ओळख सांगू लागला. 'तो बघा समुद्र' मामा पप्पांना म्हणाला, क्षितिजाशी एकरुप होऊन पांढऱ्या फेसाळ लाटांनी पुढे सरकण्यासाठी धडपडणारा, रोंरावणारा समुद्र पुळ्याच्या टेकाडावरुन दिसत होता. कोल्हापुरात राहिलेल्यांना समुद्र कधी नाही तो दिसला की छान वाटतं. मी मामाला म्हटलं.

'मी मोठी झाले ना की गोव्यात बंगला बांधून राहणार ! मला गोवा फार आवडतो.'

'बरं पण पावसाला सुरु झाला की बंगल्याला कुलूप लावून पळ काढशील. अगं दुरुन डोंगर साजरे हेच खरं. हां, चार दिवस फिरून ये. तेवढं पुरे !'

मामाचं बोलणं खरंच होतं. मी गप्प राहिले.

अंगारकी असल्यानं सगळ्या महाराष्ट्रातून आलेल्या गाड्यांनी पुळ्यात ही गर्दी केली होती. किती महात्म्य ह्या स्वयंभू गणपतीचं. पण हे सगळे भक्त एका विशिष्ट वर्गातलेच होते. मध्यम वर्गीय किंवा उच्च मध्यम वर्गीय. ज्यांच्या आर्थिक परिस्थितीचा पाया बराचसा स्थिर आहे अशी ही माणसे. परिस्थितीने भक्त बनलेली. संकटाच्या कल्पनेला घाबरणारी. बावळट, अत्यंत हलाखीची किंवा एकदम अतिउच्च श्रीमंत ह्यात एक टक्काही नव्हती का ? बरोबर आहे कारण स्वयंभू दैवतांची एक फौज आणली तरी ती कंगालाची हलाखी दूर करणार नाहीत किंवा उच्च श्रीमंतांना गरीब करू शकणार नाहीत. मग ते इकडे येतील कशाला ?

माझा देवावर विश्वासच नाही. मी देवदर्शन नावाच्या मूर्खपणाच्या प्रयत्नापासून लांबच राहिले. आईनं डोळे वटारले पण मी तिला म्हटले, 'माझाही नमस्कार तूच कर.' तेवढाच सर्वांगसुंदर व्यायाम.

गेस्ट हाऊसवर विश्रांती घेतली. यात्रेतले पेढे धुळीने माखले होते पण त्याचा विचार न करता भावाने ते खाल्ले. नळाला अक्षरश चिखलासारखे लालभडक पाणी आले. ते तो प्याला.

दुसऱ्या दिवशी त्याला डिसेंट्री सुरू झाली. रात्रभर रक्तासारखे जुलाब. अंगारक-मंगळ-एक लाल ग्रह-मला त्या नावाची शिसारी येऊन मळमळू लागले. आम्ही सारे रात्रभर जागत होतो. घरगुती औषधोपचार झाले. आजार वाढतच होता. शेवटी पहाटे तांबडे फुटण्याच्या वेळी रिक्षा मिळाली आणि माझ्या भावाला एका चांगल्या डॉक्टरांच्या दवाखान्यात नेले. इंजेक्शन, सलाईन सुरू झाले. डॉक्टरानी हजार पाचशे बिल केले. बाबा डॉक्टरांना म्हणाले, 'माझ्या मुलाला वाचविले. डॉक्टर तुम्ही देव आहात.'

'आणि पुळ्याचा गणपती पावला, त्याच्यामुळे भाऊ मरणाच्या दारात गेला तो ?'

'.....' बाबांनी एक अर्थपूर्ण कटाक्ष माझ्याकडे टाकला. त्यांची दृष्टी बरेच काही बोलून गेली.

आम्ही हॉस्पिटलमधून घरी आलो. जागरणं, बिलं, औषधांच्या बाटल्या घेऊन, थकलेले.

मी मामाला म्हटले, 'मामा, गणपती पुळ्याचा तुझा स्वयंभू गणपती इतका पावेल असे वाटले नव्हते.'

'ए गप्प बैस, असं बोलू नये !' आई.

'आई तू जरा थांब. ह्या देवभोळ्या तुझ्या भावाला मी

विचारते की आपण गणपतीची भक्ती संकटमुक्त होण्यासाठी करायची ना मग त्यानं आम्हांला संकटात का घातलं ? एवढा खर्च का करावा लागला. ती मृत्यूची छाया ? का ? देव नावाच्या दगडांना शरण जातो. भक्ती नावाच्या बावळट श्रद्धांचे मनात बीज रोवतो. आपण गेलो त्या त्या दिवशीच एका तरुण गणेशभक्त जोडप्याचा हिरो होंडा गाडीचा घाटात अपघात झाला. ती दोघेही गेली. ते गणेशभक्त नसते तर मेले नसते. खरं ना ? हे भक्तीचं थोतांड पुरे झालं, 'काय रे मामा, अंगारकीला पुन्हा जाशील काय ? आणि गेलास तर एकटा जा. आम्हांला बोलावशील तर याद राख !'

मामानं मला हात जोडले. तो म्हणाला,

'नाही माझे माय, मीही आता जाणार नाही आणि तुम्हालाही नेणार नाही.'

'अरे मामा, तसं म्हणू नको. पुळ्याला आपण ट्रीप काढू संकष्टी वगळून. निसर्ग चांगला आहे'. मी

'होय पण यावेळचं गणपतीपुळे मात्र चांगलंच लक्षात राहिलं'. मामा.

◆◆◆◆


कमला महाविद्यालयास
आमच्या कंपनीच्या कर्मचारी वर्गाच्या
आणि सन्माननीय भागीदारांच्या
हार्दिक शुभेच्छा

साई इंडस्ट्रिज

फ्लॅट नं. एफ्. ६८,
एम्. आय. डी. सी., शिरोली,
कोल्हापूर.

हार्दिक शुभेच्छा !

पॅट-केम
एंटरप्राइझेस

कन्स्ट्रक्शन, शुगर फॅक्टरी व
डेअरी केमिकल्स्
८५२/७/के, अवंतिका अपार्टमेंट, सुभाष रोड,
कोल्हापूर-४१६ ००२. फोन : ६४०७३३

डॉन कन्स्ट्रक्शन
केमिकल्स इंडिया प्रा. लि.,
(यु. के.) चे ॲथॉरॉईज्ड डिलर
प्रोप्रा. शिरीष पाटील

हार्दिक शुभेच्छा !

Golden Jubilee Tailoring Firm

एस्. डी. वायचळ
अँड सन्स

लक्ष्मी रोड, कोल्हापूर. फोन : ५२६४७५

मॅरेज सूटस्
सफारी
नित्योपयोगी कपडे स्पेशालिस्ट

# (अंधश्रद्धा निर्मूलनविषयक एकांकिका)

# दुर्दैवी मंगी

कु. गीता मस्कर
बी. ए. भाग - २

**पात्र परिचय :**

**बळ्या** - एक शेतमजूर
**राधी** - त्याची बायको
**चिंगी** - मोठी मुलगी वय ५ वर्षे
**मंगी** - लहान मुलगी वय ३ वर्षे
**म्हातारी** - बळ्याची आई
**शंकऱ्यादादा** - मांत्रिक, देवऋषी

**स्थळ :**

खुळ्याची वाडी गाव. लांब डोंगरपठाराच्या कुशीत वसलेलं. गावात घरं मोजकीच. बरीच पडलेली, उध्वस्त झालेली. बळ्याचं घर मांत्रिकाच्या घराजवळच. त्याच्या दोन घरांच्या आसपास पडकी घरे.

**(प्रवेश पहिला)**

(बळ्याच्या झोपडीत राधी चूल पेटवीत आहे. चिंगी-मंगी जवळच्या नदीवरून पाणी आणताहेत. बळ्या अंथरूणावर तळमळत पडला आहे. पोट हाताने दाबतो आहे आणि ओरडतो आहे.)

**बळ्या :** (कण्हत) राधी ऽ राधी ऽ....

**राधी :** (ओरडून) गप्प पड गुमान. मी च्या जरा करते. बरं वाटंल मग.

**बळ्या :** त्ये न्हवं. आज बी म्या कामाला जात न्हाई. तूच जा. झालं तवर केलं, आता हुईत न्हाई त्येला काय करू ?

**राधी :** आता म्या तर जातीया. तुजं बगत बसेल तर काम जाईल हातातनं.

**बळ्या :** व्हय जा. पर भाकर हाय न्हव.

**राधी :** रातीची हाय अर्धीगिर्दी पोरी खाऊंदेत तू खा म्हातारीकडनं मागून.

**बळ्या :** आदी तू जा. च्या त्यवडा हिकडं आण. (राधी कामावर जाते. बळ्या कापडात गुंडाळलेली भाकरी शोधतो. अधाशासारखी खातो, चहा पितो. तेवढ्यात चिंगी-मंगी पाणी घेऊन येतात.)

**चिंगी :** (जरा शोधून) हित भाकरी हाय न्हव.

**मंगी :** मला खाया दे.... भूक लागली.

**बळ्या :** काय आग पडलीया पोटात ? गप्प बसतीस का, दिवू एक वादाडा ?

**चिंगी :** फडक्यात भाकर व्हती. बाबा कुटं हाय भाकर ?

(बळ्याच्या पोटात पुन्हा दुखू लागलं. आता कळा तीव्र झाल्या. तो ओरडू लागला. त्याचे ओरडणे ऐकून शंकऱ्या पळत आला.)

**शंकऱ्या :** बळ्या, का रं, लई दुखतया प्वाट !

**बळ्या :** म्येलो रं बाबा, म्येलो.

**शंकऱ्या :** काय घेटलस का न्हाई ?

**बळ्या :** गोळ्या घेटल्या, इंजीसन झालं काय गुण न्हाई. काय करू रं बाबा ?

**शंकऱ्या :** काय कर; उद्या ये दरबारात. काय सुचतंय का बगू.

**बळ्या :** बरं बाबा, येतू.

(शंकऱ्या जातो. चिंगी-मंगी येतात. मंगी बाबाच्या जवळ जाते. बिलगते.)

**मंगी :** बाबा, मला भूक लागलीया.

**बळ्या :** (तिला ढकलून देतो. रागाने) मलाच खा आता च्यायला पोरगी हाईस का भूत हाईस. सारकं खायाला खायाला म्हणती.

**चिंगी :** (रडणाऱ्यां मंगीला जवळ घेते.) चल आपण शेतात जाऊ. वावऱ्या शेंगा मिळत्यात खाऊ.

**बळ्या :** (पोटातील कळ तीव्र झाली असावी. तो चिंगी-मंगीकडे पहातो आहे. भूक भूक म्हणणाऱ्या मंगीकडे विचित्र नजरेने पहातो) ही कार्टी झाल्यापास्नं प्वाटदुखी सुरू झाली. आयला हिचा पायगुणच तसा वाईट हाया. हे भूतच हाय जणू. उद्या शंकऱ्यादादा काय म्हणतो बगू. ह्या भुताचा बंदुबस्त केला पायजे. (पुन्हा कळ येते.) अगं आई ऽऽ, बंदुबस्त केल्याबिगर हे दुखनं थांबायच न्हाय. आई ऽ ऽ ई.
(म्हातारी - बळ्याची आई प्रवेश करते.)

**म्हातारी :** काय रं ? काय म्हणलास ? बंदुबस्त ? कुणाचा बंदुबस्त ? का ? आँ ऽ ऽ

**बळ्या :** (वैतागून) ह्या ह्या भुताचा. हे समदं हाय माझ्या पोटाला आल्यालं. च्या मायला..... अगं अगं आई ऽ.

**म्हातारी :** (मंगीला जवळ येत.) का रं वाद्या. माज्या सोनीच्या वाईटावर टपलाईस ? काय झालंय काय तुला ? तुलाच झपाटलं आसल बग त्या शंकऱ्याच्या भुतानं. सगळ्यास्नी टाळून मोकळा झालाय भाड्या. त्येन डोस्कं फिरीवल काय तुजं.

**बळ्या :** शंकऱ्यादादाच्या नावानं उगाच बोंबलू नगस. ही कार्टी झाल्यापास्न एकेक पाय मागंच चाललाय. बडमीला पयले कंदी लागलीती आग. ही कार्टी जलामली त्यासाली बडीम खाक झाली. ढोरं इकली. दूध-दुभतं बंद झालं. लई वाटूळं झालं.

**म्हातारी :** आरं बळ्या, आग मंगीनं न्हाई लावली. तू भांडलास त्या पैलवानासंग,म्हारत्यासंग. त्येन पेटीवली. त्येचं नाव घ्याया भितूस.

**बळ्या :** ए तुज्या आयला. गप न्हा. त्येचं नाव घिऊ नगस. खून करील माजा.

**म्हातारी :** आरं मुडद्या, म्हणून काय ह्या लेकराचं नाव घेतूस. म्या जाती तिला घिऊन. न्हाऊ दे माज्याकडं. चल रं लेकरा माज्या.

(मंगीला घेऊन म्हातारी आपल्या घरी जाते.)

(राधीचा प्रवेश)

**राधी :** अव ऽ पोरी कुटं हाईत ?

**बळ्या :** मरुंदेत पोरी. तू चल शंकऱ्यादादाकडं.

**राधी :** अव ऽ पर, पोरी.

**बळ्या :** (तिला ओढत नेतो) तू चल आदी.

(दोघे जातात.)

(प्रवेश दुसरा)

(शंकऱ्यादादाचे घर. बळ्या राधी प्रवेश करतात.)

**शंकऱ्या :** आर बळ्या, राधी ? यवा,

**बळ्या :** शंकऱ्यादादा भरीव तुजा दरबार आता.

**शंकऱ्या :** आरं पर आमूशा उद्याच्याला हाय.

**बळ्या :** त्ये काय न्हाई. आजच्यालाच भरीव. त्येच्या मायला हे आता लई झालय. उठ गा. पाया पडतू तुज्या.

**शंकऱ्या :** बरं बरं. बस समूर. बस राधी.

(शंकऱ्यानं मांडी घातली आणि तो उदबत्ती पेटवून समोर ठेवून घुमू लागला.)

**बळ्या :** (घुमणाऱ्या शंकऱ्याला हात जोडून) आई ऽ तुज्या दरबारात आलुया. माझ्याकडनं काय चुकलय ? माजं प्वाट का लई दुकतय ?

**शंकऱ्या :** आरं लेकरा, तुज्याकडं काय बी चुकी न्हाई. पर चुकी वायलीच हाय.

**राधी :** आई ऽ सांग काय माजी चुकी झाली ?

**शंकऱ्या :** न्हाई तुज काय न्हाई ऽ ऊं हूं ऽ ऊं हूं ? ह्यो तरास कवाधरनं हुतोय ऊं ऽ हूं ऽ ऽ

**बळ्या :** झाली असतील चार वर्स, न्हाई ग ?

**राधी :** कवापास्नं बगा, आपली मंगी जलमली व्हती तवापासनं.

**शंकऱ्या :** आँ ऽ हा, ऊं ऽ हू आता घावलं रं ऽ घावलं बळ्या घावलं ऽ

**राधी :** काय घावलं ऽ आई ऽ काय घावलं ?

**शंकऱ्या :** (झिंज्या विस्कटून घेत) बळ्या त्ये भूत हाय. त्ये भूत हाय ऽ त्येचा बंदुबस्त कराय पायजे.

**राधी :** आसं म्हणू नग आई ऽ माजी मंगी लई गुणाचं लेकरू हाय. खाया दिलं तर म्हणत आय तू खाल्लस. तू खा मंग म्या खातू. त्ये भूत न्हाय. देवगुणाची हाय माजी पुरगी.

**शंकऱ्या :** न्हाय त्ये भाईरचं हाय. पिशाचं हाय. हाडळ हाय. साडेसाती हाय. त्ये आलय तुज्या मुळावर. तुजं मूळ तुटायच्या आधी त्येचं मूळ तोड ऽ ऽ तो ऽ

**राधी :** (घाबरून) आई आसं म्हणू नग. त्या माज्या चिमणीनं काय क्येलंय. ह्येचं प्वाट दुकत त्येला ते लेकरू काय करल ?

**बळ्या :** ए तुज्या आयला. गप न्हा. आय काय म्हंती त्ये बग. (हात जोडून) आई चुकी झाली. (राधीला केस धरून) तू बी पाया पड. चुकी झाली म्हण.

**राधी :** (वेदनांनी कळवळून) आई चुकी झाली. चुकी झाली.

**बळ्या :** आय, आता काय करु ते सांग.

**शंकऱ्या :** भुताचा बंदुबस्त कर, त्येला गाडून टाक. तुजी सुटका व्हईल.

**बळ्या :** (राधीला) आण हिकडं त्या भुताला.

**राधी :** (कळवळून) नग आसं नग करू. माजी मैना हाय ती. माजं लेकरू.

**बळ्या :** (तिला थप्पड मारतो.) पुन्ना म्हणशील ? आता इसर तिला. आता माज्या हातन काय ती जित्ती न्हाईत नाय. म्या तिचं मूळ उपटणार. म्या तिला जिमीनीत गाडणार. (पडदा)

(प्रवेश तिसरा)

(मंगीचा भुकेने व्याकूळ होऊन रडण्याचा आर्त आवाज आतून येतो. झोपडीला कुलूप लावून बळ्यानं किल्ली खिशात ठेवतो.)

**मंगी :** आय मला लई भूक लागलीया. आय मला खाया भाकर दे ऽ आय ऽ

**बळ्या :** (झोपडीकडं तोंड करून) भूक आता थंड पडंल तुजी. रड तू, पायजेल तेवडं. तुजा निकाल लावल्याबिगार ह्यो बळ्या न्हाणार नाय.

**राधी :** अव पोराचं हाल करू नगसा. भूक म्हणतय. दोन दिस झालं. त्येच्या आतड्याला खरकट न्हाई लागलं. तळमळतय लेकरू. तुमच्या पाया पडते म्या.

**बळ्या :** म्हंजे माज्यापरास तिचा जीव लई भारी हाय काय ? म्या म्येलू तर चालल. पर त्ये भूत जगलं पायजे. म्या म्येलू तर रांड हून बचशील. का दुसरा कोण हाय तुजा यार ? आँ ?

**राधी :** (रागाने) बया, बया, हे काय बोलताय धनी ? म्या असली हाय व्हय ? अव म्या म्हणती त्या पोरीचं हाल करू नगसा. एकदा मारून तर टाका चाट करून ! अरं हाल हाल करून नग मारूसा. आनि म्या म्हंती ही म्येली म्हणजे बरं झाल न्हाई तर ! त्या शंकऱ्या का फिंकऱ्यानं डोस्क्यात भरीवलय भूत !

(एवढ्यात म्हातारी येते.)

**म्हातारी :** (रागानं) म्या त्येच म्हणतीया. आरं त्यो शंकऱ्या धड न्हाई. किती बायाबापड्यास्नी त्येनं नासवून टाकलया. अंगात किडं पडून मरल त्यो घिरना. आता माज्या सोन्यासारक्या हरणीच्या जिवावर टपलाय. बाबा बळ्या, त्या लेकराला आन-पाणी दे. आरं त्येचा सराप लागल. ह्या घराची माती हुईल. बाळाचा तळतळाट लई वाईट. आरं काय म्हणतीया म्या ?

**बळ्या :** (रागाने) ए तुज्यायला, दीन वादाडा, तर मरशील.

**म्हातारी :** त्वांड संभाळ बळ्या, म्या तुज्या शा खायाची न्हाय. म्या जातीया लेकीकडं, पर याद राखून ठीव. ह्या लेकराचं बरं-वाईट झालं तर तुला कचेरीत न्हेल्याबिगार न्हायाची न्हाई.

**राधी :** (घाबरून) तुमी त्येंच्या तोंडाला लागू नगसा. पाया पडती तुमच्या.

**म्हातारी :** राधी तू गप लेकरा. म्या खरच जातीया. ह्ये नग बगाया. जाती मी.....(रडत भेकत जाते.)

**बळ्या :** ह्ये बेस झालं. आत्ता त्या भुताला हाकलतो. उपासी ठिवूनशान मारतो. शंकऱ्यादादान म्हटल्या परमान हुईल.

(चिंगी हमसाहुमशी रडत येते.)

**चिंगी :** आय, मंगी कुणीकडंतरी कराया लागलीया. पाणी मागतीया. दिऊ पाणी ?

**बळ्या :** (तिच्या मुस्काडात लगावतो.) पाणी देतीस काय ?

पाणी देतीस काय ? (पुन्हा हात उगारतो.)

**चिंगी :** बाबा मारू नगस... म्या न्हाई दीत पाणी खरं मंगी मला सोडीत न्हाई.

**राधी :** अगं रांडं, पानी पानी म्हणून जीव देतीया माजी लेक, उन्हाचा काळ. तान लागती. काय करू रं देवा. हे काय हाल बगायच ! (तेवढ्यात शंकऱ्या येतो.)

**शंकऱ्या :** बळ्या आणि दोन दिवस गुमान काढ. मंगी मेली का तुझी पीडा गेलीच बग. (तोच आतून मंगीचा अत्यंत तीव्र स्वर... पानी ऽ पा ऽ नी मला पानी दे ऽ)

**शंकऱ्या :** बग बळ्या, म्या आल्या बरूबर त्ये भूत बग कसं कालवा कराया लागतं. मंग म्या म्हंतू त्ये खरं काय खोटं ?

**बळ्या :** व्हय रं बाबा. आतापातूर गप व्हतं भूत. तू आल्याबरूबर वरडाय लागलं.

**राधी :** अव त्येला तान लागलीया. दोन दीस झालं. ठ्यांब भरबी पानी न्हाई. काय हुईत आसंल.

**शंकऱ्या :** बळ्या ही राधी त्या भुताला जगीवणार ! हिला दे हाकलून. म्हायारला जाऊं दे ही. आन आपून दोग जाऊ नाईकबाच्या जत्रंला. आठ दिवस. तवर हिकडं भुताचा निकाल लागतुया... तवा आसंच कर. राधी तू जा म्हायारला.

**राधी :** न्हाई, पोरीला सोडून म्या जायची न्हाई ऽ !

(बळ्या तिला मार मार मारतो. चिंगीला आणि तिला दंडाला धरून मारत हाकलून देतो.)

**शंकऱ्या :** बळ्या आता झालं बघ मना परमानं. आता येळ नग. चाटकिऱ्यानं ऊट. कुलूप लाव दाराला. चल.

(आतून वेदनायुक्त स्वर... पानी, पा ऽ नी !)

**बळ्या :** शंकऱ्यादादा आता निघूया.

**शंकऱ्या :** बळ्या मला वाईच पाणी दे, तान लागलीया.

(आतून बाबा, बा ऽ बा, मला पा ऽ नी असे आवाज) बळ्या शंकऱ्याला पाणी देतो.)

**शंकऱ्या :** बळ्या आदी घरातलं सगळं पानी भाईर वतून टाक. न्हायतर त्ये भूत सगळं पानी पील.

(बळ्या आतून घागर आणतो, बाहेर ओततो.)

**शंकऱ्या :** बळ्या आता चल बिगी बिगी !

**बळ्या :** आरं पर कुणी पोलिसात कळिवलं तर. च्यायला फाशी व्हईल.

**शंकऱ्या :** आरं चल म्हाइती हाईस श्याना. तुला आजार पाजे का पोरगी पाजे ? आरं तू जगलास तर समदं बेस व्हईल. याक मेलं तर काळजी न्हाई. चल आता. आट दिस बास झालं.

(आतून बा ऽ बा मला पा ऽ णी ! असा आवाज येत असतानाच दोघे घराला कुलूप लावून निघून जातात. हळुहळू अंधार. त्यातून मंद होत जाणाऱ्या हाका... बा ऽ बा पा ऽ नी, पा ऽ नी, पा ऽ नी!

(पडदा)

◆ ◆ ◆ ◆

## जटेवर गंगाजल टाकून रक्त निर्माण करणे

जटाधारी स्त्री किंवा पुरुष आपल्या जटेत देवत्व आहे हे भासविण्यासाठी जटेवर दोन चार चमचे गंगाजल टाकून रक्त निर्माण झाल्याचे भासवितात.

**चमत्कारामागचे रहस्य** – जटाधारी स्त्री डोक्यात कुंकू, हळद वगैरे पदार्थ मुद्दाम टाकून ठेवतात. अशाच प्रकारे थोडी जादा हळदपूड जटेखाली लपवितात. त्यावर तीर्थाच्या नावाखाली सोडियम हैड्रॉक्साईड किंवा धुण्याच्या साबणाचे पाणी ओततात. त्यामुळे रासायनिक क्रियेने मिश्रणास रक्तासारखा रंग येतो.


हार्दिक शुभेच्छा !

**एकदा खाल तर पुन्हा घ्या,**
**पुन्हा मागाल**

**क्लासिक ग्लुकोज बिस्किट**

आमचे अधिकृत विक्रेते
**विक्रम मार्केटिंग, कोल्हापूर**
**सुरेश एजन्सीज, चिपळूण**
**कीर्ती किरण एजन्सी, दापोली**
**दीपाली ट्रेडर्स, म्हाड, रायगड**

**ऑफीस**
प्लॅट नं. ८, मुक्तसैनिक वसाहत,
कोल्हापूर-४१६००५.
फोन : ६६१८९८ (नि.) ६५२१३८

## (ग्रामीण कथा)

# निकाल

**कु. अर्चना वसंतराव अवघडे**
अकरावी सायन्स

सोनापूर हे डोंगराच्या मध्यावर वसलेलं गाव. असं भासत व्हतं की डोंगरच त्या गावचं संरक्षक हायत. सकाळची कवळी उन्हं डोंगरमाथ्यावर पसरली व्हती. डोंगरावरल्या हिरव्या गवताला आगळी सोभा आली व्हती. म्हादु, दौलू बैल घेऊन शेतावर निघाली होती. समदी आपापल्या कामाला लागली होती.

सखुबाई, आवं ! आमच्या शिवाची माय. शिवा आमच्या गावातल हुशार पोरग. कवा पयला नंबर सोडायचं नाय आणि बाबाला कामात मदत बी करायचा. त्येला धाकटी दोन भावंडं भिवा त्येचा पाटचा तर सोना सगळ्यात धाकटी. सखुबाई येरवाळी रोजगाराला निघाली होती. काम आवरत ती म्हणत होती, ''हे बघ शिवा, शिबड्यात भाकर हाय ती खाऊन घे. आन साळला जा. साळत ध्यान दे. यंदा तू धावीला. त्यो तूजा मास्तर म्हणत व्हता. लय अवघड परिक्षा असतीया. आभ्यास करायला पायजे.''

घाटगे मास्तर शिवाचं लय कौतुक करायचे. त्येच्याकडून अभ्यास करून घ्यायचे. त्येला पुस्तक नसली तर आपली द्यायची. त्येच्या शंका असतील त्या दूर करायचे मास्तर म्हणायचे, 'पोरगं बोर्डात येणार. आपल्या गावाचं नाव काढणार. आमच्या गावात हा हिराच आहे. मी त्याच्यावर पैलू पाडणार'.

आमचं गाव शहरापासून तुटलेलं. कुणाला शिक्षणाचं महत्त्व म्हाईत न्हाई. गावकरी फक्त दोन येळच्या जेवणाच्या मागं लागलेली. पर घाटगे मास्तरांना मनापासून वाटत व्हतं आपल्या गावाची प्रगती व्हावी, आपला गाव सुधारावा, सरकारनं आपल्या गावाकडं लक्ष द्यावं.

फेबुरवारी महिना चालू झाला. तसा शिवा जास्तच अभ्यासाला लागला. रात्रीचा दिवस करून त्यो अभ्यास करत होता. मास्तर आणि मदत करतच होते. माय आणि बाबा आता त्येला कामं लावत नव्हती. समद लक्ष त्येच्या अभ्यासाकडं होत.

मार्चच्या २० तारखेला मराठीचा पेपर. सकाळी त्यो चारलाच अभ्यासाला बसला होता. आंघोळ करून, देवांना नमस्कार करून मायच्या अन् बाबाच्या पाया पडला. दोघांनी त्येला आशीर्वाद दिला.

त्यो शाळेत गेला. आणि दोघं चौघं होती मॅट्रिकला. शिवा मास्तरांच्या पाया पडला. त्यांनी पण त्याला यशस्वी हो असा आशीर्वाद दिला. त्येचा नंबर शहरात पडला होता. रामा गाडी घेऊन कामानिमित्त शहराकडं निघाला होता. ही समदी त्या गाडीत बसलीत. शिवानं लगीच पुस्तक उघडलं. त्यानं जरा अलंकार वाचले. रूपे, समास ओळखा यावरून ओझरती नजर फिरवली. त्येचा सगळा अभ्यास झाला व्हता खरं त्येला भिती वाटत होती. घाटगे मास्तरनी त्येला धीर दिला. त्येला सारखे सूचना देत होते. 'भरभर पेपर लिही.' खाडाखोड करू नकोस लक्ष देऊन पहिल्यांदा प्रश्नपत्रिका वाच''. एक का दोन. त्याचा पेपर लिहून झाला अन् दहा मिनट बाकी असलेली घंटा वाजली त्यानं परत सगळा पेपर वाचून काढला. स्वल्पविराम, पूर्णविराम बघितले. पहिला पेपर देऊन आला तेव्हा खूप खुशीत होता. मास्तरांना सांगितलं त्येन मला सोपा पेपर गेला म्हणून. अशा प्रकारे त्येला सगळं पेपर सोपं गेलं. त्येन गावात सांगितल्यं की, बोर्डात नक्कीच येणार. सरपंचांनी इचारलं, 'लेका किती टक्के मार्क पडतील ?' शिवा म्हणाला, 'पडतील ८५ टक्के.' तेच्या सांगण्यात ठामपणा दिसत होता. परीक्षा संपली तसं त्याच्या डोक्यावरचं ओझं कमी झालं

त्यो आता बाबाला कामात मदत करू लागला. धाकट्या भावंडांना सांभाळू लागला. बघता बघता मे महिना संपला. जूनच्या २८ ला निकाल होता. घाटगे मास्तर तर नुस्ते निकालाच्या दिवसाकडे डोळे लावून बसले होते. समदी मोठी माणसं चावडीत जमली. त्यो दिवस २८ तारखेचा होता. शिवापण आला होता. मास्तरांनी शहरात जाऊन निकाल आणावा असे ठरले.

सांज झाली आणि मास्तर खाली मान घालून पाय वढत येत होतत. कुणाला काय कळायला मार्ग नाही. समदी भेदरल्या नजरनं मास्तरांच्याकडं बघू लागली. ते चावडीत येऊन थांबले आणि निकाल शिवाच्या हातात दिला. त्येच्या पाया खालची जमीन सरकल्यासारखं झालं. हात कापत होत त्येनं निकालावरून नजर फिरवली आणि खालीच कोसंळला. दोघाचौघानी धरून त्येला घरला नेला जणू गावात सुतक आल्यासारखं सगळा गाव निपचिप पडून होता. कोणी कुणाशी बोलत नव्हतं. गावातलं चैतन्यच निघून गेलं होतं.

चार पाच दिवासांनी गावात अगदी हलकल्लोळ चालला होता. कुणायला माहीत काय झालय ते. प्रत्येकाच्या मनात पाल चुकचुकत होती. आणि वाऱ्यासारखी ही बातमी गांवभर पसरली की, शिवानं फास लावून घेतला. सगळं गाव हळहळलं शिवाच्या मायनं तर टाहोच फोडला. तिचं ते दुःख पाहून दगडाला रडू इल. घाटगे मास्तरांचा तर इसवासच बसंन. त्यांनी त्याला खूप समझवल होतं की, 'अरे तुला पेपर सोपे गेलेत तर तू नापास होणं शक्यच नाही. तू धीर सोडू नकोस मी परत तुझे पेपर तपासायला पाठवले आहेत.'' निकाल समजल्यापासून त्यानं खाणं-पिण, बोलणं टाकून दिलं होत. पोरानं हे बरं केलं नाही. सगळे त्या आई बाला धीर देत होते पण त्याचा काय उपयोग ?

आता शिवा जाऊन तीन दिवस उलटले पण सगळ्यांना वाटत होतं की, त्यो अभ्यासाला मळ्यातल्या घरात गेलाय. मायनं तर आनपाणी सोडून दिलं होतं. तिनं फक्त शिवाचा धस्का घेतला होता.

तेचं समदं पईपावनं जमा झालं होतंत. आज मातीचा दिवस. त्याच दिवशी घाटगे मास्तर परत काय निकाल लागतो ते पाह्यला शहरात गेले होतें. समद्यांनी मातीच्या ठिकाणी जेवण, फळ असा निवद ठिवला आणि कावळा शिवायची वाट पाहू लागले. समदी थोड्या अंतरावर जाऊन उभी राहिली. सगळी उन्हांत उभी होती. तेवढ्यात घाटगे मास्तर आले. त्येंच्या चेहऱ्यावर दुःख आणि आनंद हे एकाच वेळात पाझरत त्यांच्या डोळ्यात पाणी साचलं पुढं होऊन त्यांनी तो निकालाचा कागद सर्वांना दाखवला आणि निघून गेले. जाताना ते शिवाच्या बाबाला म्हणाले, ''हे बघ हरू, काय माणसाचं नशिब हाय. अरे, शिवा बोर्डात १७ वा आला आणि नजरचुकीन त्याला नापास हा शेरा मिळाला.'' मग मात्र हरू धाय मोकलून रडला. हा तर सगळा विचित्र प्रकार होता.

◆◆◆◆

### ॲसिड पिण्याचा चमत्कार

स्वरूप-द्रव अमोनियाबरोबर पांढऱ्या वाफा येणारे हैड्रोक्लोरिक ॲसिड पिणे.

रहस्य - ही हातचलाखी आहे. प्रस्तुत प्रयोगात शोषनळी वापरून तिच्यात तीव्र हैड्रोक्लोरिक आम्ल शोषून ठेवले जाते. ॲसिडच्या रिकाम्या बाटलीत पाणी ओतून ठेवले जाते. शोषनळीच्या एका टोकावर बोट ठेवून वाफ येण्यापुरते ॲसिड द्रव अमोनियावर टाकून, वाफा काढून दाखवून बाटलीत ॲसिड असल्याचे भासवून पाणी पिऊन टाकले जाते.

हार्दिक शुभेच्छा !

सुप्रिमो
पॅटर्न वर्क्स
गोकुळ शिरगांव, एम. आय. डी. सी.
ता. करवीर, जि. कोल्हापूर

प्रोप्रा. सौ. विद्या विश्वनाथ वराडकर

(व्यक्तिरेखा)

# बायजामावशी

कु. निर्मला लहू डफळे
बी. कॉम. भाग - २

मानवी जीवनाचा विचार करताना ''माणूस'' म्हणून घेणे किती सोपे आणि 'माणूस' म्हणून जगणे किती अवघड आहे याचा आपल्याला जीवनाच्या विविधांगी प्रसंगातून प्रत्यय मिळतो. माणसाला आयुष्यात जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक अडीअडचणींना, संकटांना सामोरे जावे लागते, आणि त्यातून सहीसलामत बाहेर पडणे म्हणजेच जीवन जगणे होय. माणसाच्या जीवन सागरात हजारो वादळे निर्माण होतात. अन् ती केव्हा शमतात याचे भान त्यास राहत नाही. परंतु जीवनातील असे एखादे वादळ असते की त्याच्या स्मृती स्मृतिपटलावर कायमस्वरूपी कोरल्या जातात. मानवी जीवनात अशा काही व्यक्तिरेखा अनुभवास येतात की त्या विसरणे कठीण असते. तर अशीच एक व्यक्तिरेखा ''बायजामावशी'' होय. तीच ती इनामदारांच्या बंगल्यात ''कामवाली'' म्हणून वावरणारी एक ''आदर्शमाता !!''.

मी आणि आमच्या घराजवळच राहणाऱ्या इनामदारांची मनिषा, दोघी एकाच वर्गातल्या. अगदी जिवलग मैत्रिणी. परीक्षा असो, कोणताही कार्यक्रम असो, माझे तिच्या घरी सारखे जाणे-येणे होत असे.

कधीकधी अभ्यास करण्यासाठी मी तिच्याकडे संपूर्ण दिवसभर थांबत असे. कारण माझ्या घरी दोनच खोल्या असल्याने आणि माझी भावंडं, त्यांचे मित्र यांच्या ये-जा मुळे घरी माझा अजिबात अभ्यास होत नसे. याउलट मनिषा एक गर्भश्रीमंत घरातील मुलगी, प्रचंड पैसा, मोठा बंगला, घरी बरेच नोकरचाकर. माणसाच्या जीवनात आर्थिक परिस्थितीच गरीब, श्रीमंत, मध्यमवर्गीय असा भेद निर्माण करते. परंतु इनामदारांचे घर त्याला अपवाद होते.

मी वार्षिक परीक्षा जवळ आल्यामुळे मनिषाच्या घरी अभ्यासासाठी जाणार होते. दुपारी जेवून दप्तर घेऊन तिच्या घराकडे गेले. बंगल्याच्या गेटमधून आत गेले व दारावरची बेल वाजवली. बऱ्याच वेळाने एका मध्यम उंचीच्या, अंदाजे ४५ वर्षे वयाच्या, सावळ्या, गोलसाडी परिधान केलेल्या महिलेने दार उघडले अन् विचारले, ''काय पायजे ?''

मी उत्तरले ''मनिषा आहे का घरात ?''

'' हा; हाय की, '' असे म्हणत तिने मनिषाला जोरात हाक मारली. मनिषा पळतच बाहेर आली. अन् आम्ही दोघी वरती तिच्या अभ्यासाच्या खोलीत गेलो. पण जिना चढताना मी पुन्हा पुन्हा मागे वळून त्या स्त्रीकडे पाहत होते. कारण हा चेहरा मनिषाच्या घरात नवीनच दिसत होता. खोलीकडे जाताना न राहवून मी मनिषाला विचारले. ''अग मनिषा, आता ज्यांनी दार उघडलं त्या कोण ?'' मनिषा उत्तर देणार तोच दारातून आवाज आला. ''ताईसाब ! मीच सांगते माझं नाव बायजाक्का म्हादेव कळासे. तसं वाईच बायजा म्हणत्याती मला ! माझा दाल्ला मरून २५ वर्षे झाली. पोटाची खळगी भराया नग काय ? पोटची दोनच पोर हायती. त्यांना शिकवून मोठं कराया पायजे. बरं ते जाऊदे. म्या तुम्हाला च्या आणते मग करा जोमान अभ्यास !'' असं म्हणून ती तरातरा निघूनही गेली. तेव्हा मनिषाने माझ्याजवळ खुलासा केला की दोनच दिवसापूर्वी तिच्या आजोबांनी गावाहून ''कामवाली'' म्हणून धुणं-भांडी, स्वयंपाक करण्यासाठी आणली आहे.

बऱ्याच वेळाने चहापान झाल्यावर मी व मनिषा अभ्यासासाठी बसलो. मी अभ्यास करण्याचा बराच प्रयत्न करत होते. पण माझे मन न राहवून त्या बायजामावशीचाच विचार करत होते. कसे तरी २-३ तास मनिषाबरोबर अभ्यास करून मी घरी परतले. येताना वाटेत, मनात

असंख्य विचारांनी गर्दी केली होती. त्या बायजामावशी कोण ? कुठल्या ?

अनेक दिवस मी सातत्याने मनिषाच्या घरी जात होते. प्रत्येक वेळी बायजामावशी मला आपसूक भेट द्यायच्याच. बऱ्याचवेळा मनिषा नसली की मी बायजामावशी बरोबर गप्पा मारायची. गप्पा मारताना मला अनेक व्यक्तिमत्त्वाच्या विविध छटा तिच्या एकाच व्यक्तिमत्त्वातून साकार होताना दिसल्या.

लहानपणीच लग्न झालेल्या बायजामावशीचे पती जमिनीच्या वादात मारले गेले होते. घरच्या भावकीने वाळीत टाकले. विधवेचं जिणे घेऊन, पोटभर खाण्या-इतकी जमीन, घर असून सुद्धा कपाळकरंटी म्हणून इवल्याशा दोन मुलांसहित घराबाहेर हाकलून दिलेल्या बायजामावशीची करूण कहाणी मनाला चटके देऊन गेली.

बायजामावशी गावात शेतमजुरी करून आपलं व मुलांचं पोट भरू लागली. गावची भावकी नीटसं जगू देईना. त्यातच मुलांना मोठं करायचं म्हणून जिद्दीने पेटून उठलेल्या बायजामावशीने पडेल ते काम करण्यास सुरुवात केली. थोरला मुलगा पांडू व दुसरा शिवा. आईच्या मिळणाऱ्या तुटपुंज्या रोजंदारीवर शाळेत जाऊ लागली. हां हां म्हणता पोरं मोठी झाली. आईचा पांग फिटला. थोरला पांडू शाळामास्तर झाला. शिवा तालुक्याला कचेरीत कारकूनी करू लागला. आईला बरं वाटलं. गावाला हायसं वाटलं. भावकीला पुन्हा मायेचा पाझर फुटला. भावकीचे घराकडे जाणे-येणे सुरू झाले. भावकीतील जो-तो म्हणू लागला, ''पांड्याला म्या मोठा केला''. ''शिवाला म्या नोकरीला लावला.''

आई. आईच ती. दयेचा सागर. झालं गेलं विसरली. थोरल्याचं लगीन लावलं. घरात सून आली. पण पांडू बदली झाल्यामुळे सुनेला घेऊन दुसरीकडे निघून गेला. धाकटा शिवा अजूनही तितकासा स्थिरावला नव्हता. वाढती महागाई माणसाला सुखासमाधानाने जगू देत नाही. तसंच झालं. कचेरीतून मिळणारा पगार दोघा मायलेकरांना पुरत नव्हता. कारण भावकी, नवीन पाहुणे यांनी आता घर सारखं भरून जाई. सगळ्यांचा राडा मागं बायजाच काढत असे.

थोरला बदली होऊन जो गेला तो पुरताच बदलला. आईने उपसलेल्या कष्टाचे, मायेने राहिलेल्या भावाचे त्यास भानही राहिले नाही. कारण नवीन सहजीवनात तो पूर्णपणे गुरफटलेला होता.

शिवा तसा धडपडी होता. तोच आईची काळजी घ्यायचा. म्हणायचा ''आये, मला इथवर आणलंस. आता तू थोडा आराम कर. शेतावर जात जाऊ नगस. दादाचा विचार करू नगस.'' बायजा मोठ्या मनानं शिवाचा आधार घेऊन देणे एकमेकाच्या सुखदु:खात वाटा घेऊन राहू लागली. पण नियतीच्या मनात काही वेगळेच असते.

शिवा धडपडी असल्याने तो गावातील राजकारणातही भाग घेऊ लागला. शिवाचे असे पुढे - पुढे करणे काहींना पाहावत नसे. त्याचा काटा काढण्यासाठी शिवावर खुनाचा आरोप ठेवला. अन् त्यातच त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. बायजावर दु:खाची कुऱ्हाडच कोसळली.

काय करावे या कर्माला ! असे म्हणत न बसता बायजाने पुन्हा मोठ्या जिद्दीने आलेल्या प्रसंगाशी सामना दिला. थोरल्या पांडूने तर अगोदरच पाठ फिरवली. अनेकांच्या हातापाया पडत तिने हायकोर्टात केस लढविली. अन् शिकलेली नसताना सुद्धा जिद्दीने मुलाची सुटका केली.

अगोदरच परिस्थितीने ग्रासलेल्या अन् त्यात बदनामी झालेल्या शिवाने घरी आल्यावर दोनच दिवसात गळफास लावून आत्महत्त्या केली. बायजा धाय मोकलून रडली. आठवडाभर ती काहीही खाल्ली नाही. थोरला पांडू भावाच्या निधनाचे वृत्त ऐकून धावत आला. पण शाळामास्तर झाला तरी पुस्तकापेक्षा व्यावहारिक जीवनातील सत्याचा तो सामना करू शकत नव्हता. त्यातच तो आता स्वार्थी बनला होता. थोड्याच दिवसात उरली सुरली सगळी जमीन आपल्या नावावर करून आईला सोडून निघून गेला. किती कठोर मनाची माणसं असतात ह्या जगात !

बायजावर या साऱ्या घटनांचा जबरदस्त आघात झाला. मनावर, मेंदूवर थोडा विपरीत परिणाम झाला. मानसिक व शारीरिक दृष्ट्या आता ती पुरती थकली होती. मरणाशिवाय तिच्यासमोर आता कोणताही दुसरा मार्ग नव्हता. पण का कोण जाणे. अंगात असणारी मातृत्वाची ओढ, मुलांचे प्रेम न मिळाल्याची जाणीव, म्हणून ती पुन्हा

कामावर जाऊ लागली.

गावातल्याच नंदू चांभाराची दोन पोरं आता आई बापाविना अनाथ झाली होती. एक ७ वर्षाचं, तर दुसरं ९ वर्षाचं. ती दोन्ही पोरं बायजाबरोबर शेतात राबायची. त्यांचा लळा लागून तिनं त्या दोन्ही पोरांना आपलंस केलं. गावानं व भावकीनं पुन्हा बोंब ठोकली. पण यावेळेस मात्र बायजास मोठा आधार मिळाला होता तो रावसाहेब इनामदारांचा. त्यांना तिची दया आली. अन् त्यांनी तिला मनिषाच्या घरी पाठवलं.

***बायजामावशीचे हे अंगावर शहारे आणणारे कथानक केवळ तिच्याच तोंडून ऐकले नाही, तर मनिषाच्या आजोबानीही त्याला पुस्ती जोडली होती. बायजामावशीचे जीवन पाहताना अशिक्षित महिलेकडेही केवढे प्रचंड ज्ञान ! केवढी माया ! आणि धन्य ते मातृप्रेम !***

***या वेळेस महात्मा गांधीजींचे एक भजन मला आठवते.***

*''वैष्णव जन तो तेणे कहिये*
*जो परपीडा जाने रे.''*

***खरोखरच बायजामावशी सारखी आदर्श माता माझ्या मनात चिरकालासाठी घर करून राहिली.***

◆◆◆◆

## अगरबत्त्या आपोआप पेटण्याचा चमत्कार

रहस्य - पिवळा फॉस्परस कार्बन डाय-सल्फाईडमध्ये विरघळून त्यात अगरबत्त्यांची टोके बुडवून काढतात. हा कार्बन डाय सल्फाईड चार मिनिटात उडून जातो व अगरबत्तीला लागलेला फॉस्फरस हवेतील ४४० सें.ग्रे. तापमानाला पेट घेतो. अगरबत्त्या त्यामुळे धुमसून (आपोआप) पेटतात.

भाविकांच्या मनावर बुवांच्या शक्तीचे दडपण येण्यास हा प्रकार कारणीभूत होतो.


हार्दिक शुभेच्छा !

मेसर्स मनिषा सेफ कंपनी

आमच्याकडे स्टील कपाटे, खुर्ची, टेबल्स्, स्टोअरवेल कपाटे, डेस्क, कोअर ओव्हन बनविण्याचे एकमेव ठिकाण
तसेच ऑर्डरप्रमाणे वरील फर्निचर तयार करुन देऊ.

संपर्क
२८१५ 'बी' सुभाष रोड, मंडलिक वसाहत,
कोल्हापूर-४१६००२. फोन : ६२२८६०
प्रोप्रा. श्री. शहाजी बा. पवार

हार्दिक शुभेच्छा !

मेहता बुकसेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
फोन : (०२३१) ५२२३०४
फॅक्स : (०२३१) ५२१८८१

• महाविद्यालयीन क्रमिक पुस्तके •
• गाईडस् नोटस् आणि •
• सर्व प्रकारच्या पुस्तकांसाठी •

(स्वातंत्र्य सुवर्णमहोत्सवानिमित्त खास लेख)

# भारतीय स्वातंत्र्य - एक दृष्टिक्षेप

कु. रत्नमाला कांबळे
बी. ए. भाग - ३

**स्वातंत्र्य मिळाले गुढी तोरणे उभारली**
**भारतभर रोशनाई दिसू लागली**
**लहानच काय मोठी पण,**
**स्वातंत्र्य मिळाले स्वातंत्र्य मिळाले**
**असे म्हणून नाचू लागली.**
**मुक्त होऊन पक्षी आकाशातून**
**उडू लागले.**
**खळखळ वाहणाऱ्या नद्या,**
**भारताला सुजलाम् सुफलाम्,**
**करू लागल्या.**
**हिमालयही भारताचे संरक्षण,**
**करायला सज्ज झाला.**

आपल्या भारताला खरे स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी मिळाले. त्यावेळी आपला भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन आपली संसदीय लोकशाही सुरू झाली. आज आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाले ही घटना खरोखरच अतिशय महत्त्वाची आहे. कारण त्यामुळेच तर स्वातंत्र्याचा आपल्याला उपभोग घेता आला. आपण सर्वजण स्वत:ची मते, विचार मांडू शकतो. आपल्याला मतदानाचा हक्क मिळाला आहे. लोकशाही राज्य स्थापन झाले आहे.

आपला देश भारत स्वतंत्र झाला. दीडशे वर्षाच्या इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे काम महात्मा गांधी, पंडित नेहरू, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, लाल बहादुर शास्त्री सारख्या मोठ्या नेत्यांनी केले. आपल्या भारतामध्ये शासन व्यवस्था आली. आपल्या देशाची स्वत:ची एक राज्यघटना तयार झाली. भारतीय लोकांनी निवडून दिलेले लोक नियुक्त प्रतिनिधी म्हणून काम करू लागले. आपल्या देशाच्या दैनंदिन आणि सार्वकालिक गरजा कशा पार पाडता येतील या दृष्टीने स्वतंत्रपणे विचार सुरू झाले. देशाचा सगळा राज्यकारभार करायला लोक मोकळे झाले. स्वत:च्या गरजा, रस्ते बांधणे, धरणे, कालवे उभारणे याकडे लोक लक्ष देऊ लागले. पण नवीन शास्त्रे खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी उदयास आली. नवनवीन शास्त्रीय संशोधन करून नवनवीन शोध भारताने अवकाशात याने पाठवून लावले. आर्थिक व्यवहार सुरू झाले.

सर्वांना संरक्षणासाठी कायदा, पोलिस सुरक्षा अवलंबण्यात आली. देशामध्ये शिक्षणाचा विकास मोठ्या प्रमाणात घडवून आणला. नवनवीन शैक्षणिक संस्था स्थापन करून गोर-गरिबांना मोफत शिक्षण दिले. उद्योग धंद्याचा विकास मोठ्या प्रमाणात घडवून आणला. समाजवादी तत्त्वांचा व्यवहारामध्ये उपयोग करण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळालेच नसते तर हे सर्व आपल्याला करताच आले नसते. प्रत्येक नागरिकांच्या स्वातंत्र्याकडे आज लक्ष दिले जाते. पल्स पोलिओ मोहीम, निरक्षरता निर्मूलन सारख्या मोठ्या योजना देशभर राबविल्या. दारिद्र्य रेषेखालील अनेक लोकांना आर्थिक मदत देणे, त्यांना अनेक प्रकारे सहाय्य देणे, स्वस्त दरात धान्य पुरवठा करून देणे, दलितांच्यासाठी नोकरीच्या ठिकाणी राखीव जागा ठेवणे,

बी. सी. स्कॉलरशिप, गरजू व गरीब विद्यार्थांना फी सवलत देऊन त्यांना मोफत शिक्षण निर्माण करून दिले.

इंग्रजांच्या राज्यात हे सर्व आपल्याला शक्य झाले नसते. स्वातंत्र्याचा उपयोग खरोखरच भारताला आज किती चांगला झाला आहे. खरोखरच भारत स्वतंत्र झाला तो अनेक लोकांच्या त्याग व बलिदानामुळेच हे आपल्याला विसरता कामा नये. पंडित नेहरूंनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा झेंडा अभिमानाने फडकविला. २६ जानेवारी १९५० ला नवीन संविधानाचा स्वीकार करण्यात आला. भारताची राज्य घटना लिहिण्यात आली. भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा हक्क आहे. त्यानंतर भारत हे गणतंत्र राष्ट्र म्हणून जाहीर करण्यात आले. यामध्ये प्रत्येक व्यक्तीला न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाची साक्ष देण्यात आली. यामध्ये भारताला एक धर्म निरपेक्ष राज्य म्हणून घोषित केले. आणि यामध्ये धर्म, वंश, जात आणि पंथ यांच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही याची हमी देण्यात आली.

१९७९ मध्ये निवडणुकीनंतर काँग्रेस आय पार्टीची केंद्र आणि अधिकांश राज्यामध्ये परत सत्ता आली. मागील वर्षामध्ये आम्ही पाच पंचवार्षिक योजना सफलतापूर्वक लागू केल्या आहेत. यामधून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला शक्ती आणि स्वायतत्ता मिळाली. कृषीउत्पादन सुद्धा दुप्पट वाढले आहे. बेरोजगारांना रोजगार व आर्थिक सांह्य दिले गेले. गरिबी कमी करण्यासाठी लोकांना काम दिले. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या आवश्यक गरजा भागवणे, सरकारकडून त्यांना घरे बांधून देणे अशी कामे स्वातंत्र्यानंतर चालू झाली. स्वातंत्र्याशिवाय आपल्याला हे करताच आले नसते. स्वातंत्र्याशिवाय जगता येत नाही, शिकता येत नाही, कायदे करता येत नाहीत, समाजाला सुखी करता येत नाही.

पण भारताला स्वातंत्र्य मिळून थोडे दिवस जातात, थोडी वर्षे जातात तोच अनेक कठीण समस्यांनी भारताला वेढले. इंग्रजांच्या काळात पाकिस्तान हा भारताच्या ताब्यात होता तो आता भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वेगळा झाला. अशा तऱ्हेने आपल्या देशाचे विभाजन होऊ लागले. लाखों लोक बेघर झाले. पाकिस्तानने काश्मिरवर हल्ला करून तो आपल्या ताब्यात घेण्यासाठी युद्ध सुरू केले. तेच काश्मीर हे भारताचे मुकूटस्थान आहे. तसेच काही आर्थिक घोटाळे देशाची स्थिती बिघडवीत आहेत. हे संकट गंभीर आहे. उदा. आमची जैन डायरी हवाला प्रकरणामध्ये अनेक मोठ्या मगरमच्छ लोकांची नांवे होती. सगळे निर्दोष सुटले. त्यात बसपा (बहुजन समाज पार्टी) पासून भाजप पर्यंतचे नेते आहेत, हे सगळे कसे सुटले. भारताला एवढे स्वातंत्र्य मिळून सुद्धा आज भारतात अशा घटना होत आहेत.

प्रा. एन्. डी. पाटलांसारखे लोक सांगतात की, ''आमच्या देशात ५०% लोक हे निरक्षर आहेत.'' आदिवासी समाजचा कधीही उद्धार होऊ शकत नाही ही वाईट परिस्थिती आज आहे. आम्हाला स्वातंत्र्य मिळून त्याचा काय उपयोग झाला असे काही लोक म्हणत आहेत. एन्रॉन सारखे प्रकल्प भारताला गिळू पाहत आहेत. आज जी भारतीय लोकशाही आहे ह्यापेक्षा पारतंत्र्य बरे असे काही लोक म्हणतात. इंग्रज या देशात राज्य करत होते ते बरे असे काही लोक म्हणतात. म्हणजे काय आमचे सरकार स्थिर, व्यवस्थित चालले नाही. अगदी कन्याकुमारीपासून ते काश्मिरपर्यंत कुठल्याही राज्याचे सरकार सौराष्ट्रपासून मणिपूर आसामपर्यंतचे सरकार कुठलेही काम समाधानकारक करत नाही.

शिवाय राज्य सरकार काय आणि केंद्र सरकार काय ? त्यांच्या विषयी हजारो तक्रारी आहेत. देशाचे एक महत्त्वाचे अंग असल्यामुळे न्याय संस्थेला महत्त्व आहे. सध्या न्यायालयाकडे इतके खटले पडून आहेत की ते देशभरात एकूण ७ कोटीच्या दरम्यान आहेत. Justice delayed is Justice denied याचा अर्थ असा की न्याय द्यायला विलंब लावला की तो अन्यायच आहे. साध्या नोटा छापण्यासाठी परदेशाला कॉन्ट्रॅक्ट देण्यात येते. म्हणजेच साध्या नोटा सुद्धा छापता येत नाहीत. स्वातंत्र्यापूर्वी काश्मिर हे भारताच्या ताब्यात होते. लडाकच्या ताब्यातील काश्मिर हे आज आपल्या ताब्यात राहते की नाही अशी भीती वाटते आहे. ही जर अवस्था असेल तर आम्ही स्वतंत्र झालो असे म्हणण्याला अर्थच नाही.

आमचे नोकर वर्ग इतर देशांच्या नोकर वर्गाच्या मानाने ५०% सुद्धा काम करत नाहीत. पण पगार मात्र दुप्पट मागतात. पाचवा वेतन आयोग हा स्वातंत्र्याला शाप आहे. नोकर वर्गाला या वेतन आयोगामुळे आणखी पगार वाढणार

आहेत. त्यामुळे महागाईहीही जास्तच वाढणार आहे. ह्या गरीब लोकांना याचा काय फायदा होणार ? आमचा नोकर वर्ग हा जणू काय वाघच झाले आहेत व यांच्या पुढे केंद्र सरकारची मान देण्यात आली आहे. जैन डायरीमध्ये ते सापडले ते कोण होते. जैन पी. व्ही. सी. पाईप जळगावच्या जैन बंधूनी सरकारी कॉन्ट्रॅक्ट मिळविण्यासाठी ज्या ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, मंत्र्यांनी त्यांच्याकडून लाच स्वीकारली. त्या त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची व मंत्र्यांची नावे जैन बंधूनी आपल्या डायरीत लिहून ठेवलीत. ज्यावेळी ती डायरी सरकारला सापडली त्यावेळी मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला. त्याला जैन हवाला डायरी प्रकरण म्हणतात. न्यायाधिशांनी त्यांना जामिनावर निर्दोष सोडले.

नोकरांनी या देशाला लुबाडले. धनिक शेतकरी हे मोठमोठी कर्जे काढून ती माफ करण्यासाठी लोकांची घरे जाळतात. गरीब लोकांच्यावर व कामगारांच्यावर अत्याचार करतात. ते देशाचे चोर बनले आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आज देशाला लुबाडण्याचे प्रयत्न करत आहेत. असे आम्हाला म्हणावेसे वाटते की, अशा मूर्ख माणसांच्या हातात सत्ता गेली आहे. भारताला लुबाडण्याचे हे काम चुकीचे आहे. आज भारताचे विघटन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आज प्रत्येक जण स्वतंत्र राज्याची मागणी करू लागला आहे. भारताला आज स्वातंत्र्य मिळून दिले आणि भारतीय लोकच भारताला लुबाडत आहेत त्यामुळे ह्या स्वातंत्र्याचा आज काय उपयोग झाला असे म्हणावे लागत आहे. काही लोक म्हणतात आम्हाला स्वातंत्र्य का मिळाले ? आज भ्रष्टाचारीच देशाचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहेत. आज भारताला स्वातंत्र्य मिळून खरोखरच भारत स्वतंत्र आहे का ? आज भारताला स्वातंत्र्य मिळालेले आहे हे कितपत खरे आहे ? असे म्हणावे लागते आहे.

◆◆◆◆

### टोकदार खिळ्यांवरुन चालण्याचा चमत्कार

रहस्य - चार पाच फूट लांबी व पाऊण इंच जाडीच्या फळीवर दोन इंची खिळे दाटीने ठोकले जातात व चमत्कार करणारी व्यक्ती त्या खिळ्यांवरुन चालून दाखविते. फळीला अधिक खिळे असल्यास शरीराचे वजन अधिक चांगले विभागले जाते व त्यामुळेच पाहणाऱ्याला अधिक भीती वाटते.

*With Best Compliments from*

M. R. SUTAR, (Pahune Mestri)

**M/S. NEW PRAKASH ENGINEERING WORKS**

**Repair Specialist in**
All Types of Trucks, Cars Housing, Pilot Bearing, Crown Cage Body, Front Axle and Fork Bend

**1430 'C', LAXMIPURI, KOLHAPUR.**
**PHONE : 642113**

हार्दिक शुभेच्छा !

**मे. आजरी इंजि. इंडस्ट्रिज प्रा. लि.**

जे-१२, एम्. आय. डी. सी.,
गोकुळ शिरगांव, कोल्हापूर

# (लघुकथा)

# एका रुपयाची गोष्ट

कु. मृणालिनी आढाव
बी. ए. भाग - २

ते दोघे उपाहारगृहातून बाहेर पडले आणि कसे कोण जाणे अपघातात सापडले. बिचाऱ्यांनी घेतलेला चहा अजून पचलाही नव्हता. खरं म्हणजे गोपाळराव आणि चिंतामणरावांपैकी गोपाळरावांना हे जर आधी ओळखता आलं असतं तर त्यांनी चहासाठी पैसे घालविलेच नसते. पण अदृष्टाचा लेख कोणी वाचलाय ?

त्यातूनही एक चूक त्यांनी केली, ती तर अजिबात केली नसती. हॉटेलात गेल्यावर चिंतामणरावांना असं काही सुचेल असं चुकून जरी त्यांना जाणवलं असतं तर ते त्यांना टाळूनच कदाचित चहा घ्यायला गेले असते. अर्धा कप चहा प्यायचा होता. कोणाच्या तरी भागिदारीत भविष्यकाळाचं अर्ध्या कपाचं देणं कोणावर तरी राखून. पण हॉटेलात चिंतामणरावांना बेसनाचा लाडू खावासा वाटला. त्यासाठी मात्र गोपाळरावांनी एक रुपया त्यांना उसना दिला. जन्मात त्यांनी ही चूक अगदी पहिल्यांदा केली होती.

अपघात म्हणजे जबरच अपघात होता तो. कोणी नवखा मोटार शिकणारा असेल. त्यानं अशी धडक मारली होती की दोन्ही व्यक्ती एका क्षणात भुईसपाट झाल्या होत्या. कुठे लागलं नव्हतं असं नाही. ठेचून निघाले होते दोघेही. मोटारवाला पळाला. बघ्यांनी ह्या दोघांना हातही लावायची टाळाटाळ केली. तोच गर्दीत चिंतामणरावांकडे वर्तमानपत्र टाकणाऱ्या गृहस्थाने त्यांना पाहिले व कदाचित हे 'गेले' तर आपल्याला पैशांचा नादच सोडावा लागेल म्हणून त्यांना उचलून रिक्षात घातले आणि हॉस्पिटलचा रस्ता धरला. कुणी कुणाला, कुणी कुणाला असे निरोप, फोन, बातम्या दिल्या आणि हॉस्पिटलात दोघा गृहस्थांशी संबंधित व्यक्ती जमल्या. त्यातल्या नात्यांच्या संबंधापेक्षा व्यवहाराशी संबंधित अशाच व्यक्ती फार असाव्यात असे त्यांच्या चेहऱ्यावरून वाटत होते.

गोपाळरावांचा मुलगा ही बातमी कळल्यावर हॉस्पिटलच्या दिशेने एक मिनिटाचा वेळ न लावता धावत पळत आला. रिक्षावाल्याने परत दिलेले पैसे आणि मिटरप्रमाणे भाडे ह्यांच्या हिशेबात गुंग होऊन त्याने वॉर्डबॉयला ''नव्या रिक्षाभाड्याची सुरुवात अजून व्हायची आहे ना ?'' असा प्रश्न विचारला. वॉर्डबॉय गोंधळला. तो म्हणाला, ''बहुतेक येत्या एक तारखेपासून होणाराय वाटतं साहेब.'' मग दचकून गोपाळरावांचे चिरंजीव उद्गारले, ''सॉरी हं, ते गोपाळराव....आताच इथं अपघातात सापडलेले....ते कुठे.....''

आणि जसा त्याने वॉर्डबॉयला नको तो प्रश्न विचारला तसाच त्याने गोपाळरावांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरलाही प्रश्न केला होता. कदाचित तो पाहिजे तोच...असेलही.

''डॉक्टरसाो ही रक्ताची बाटली नाही दिली तर... म्हणजे काय ? मार फार लागलाय काय...जगण्याची आशा नसेलच तर...रक्त... नाही म्हणजे दिलंच पाहिजे...?''

डॉक्टर वयस्कर गृहस्थ होते. समजुतीनं बोलले, ''होय, हे पहा मिस्टर, रक्तच काय अमृत जरी दिलं तरी आता शक्यता कमीच आहे नाही तरी ! ही पहिली आणि शेवटचीच बाटली असणार, पण केवळ कर्तव्यभावनेनं आम्ही काही करतो आहोत थोडं तुम्ही सहन करा...''

''म्हणजे....?''

''हो....ही शेवटची आणि पहिलीच !''

डॉक्टर आश्चर्यचकित होऊन पेशंटकडे पहात होते. वास्तविक दुपारी १२ वाजेपर्यंत गोपाळराव जगणार नाहीत असं त्यांचं ठाम मत होतं. पण आता सायंकाळचे ७ वाजले होते. तरीही गोपाळराव जिवंत होते. जिवंत म्हणजे काय मुडदाच...पण मेले नव्हते. डॉक्टरांच्या शास्त्रात न बसता जिवंत होते. सायंकाळी डॉक्टरनी आपले ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीनं त्यांना तपासलं. पण डोकं सुन्न होण्यापलीकडं काही निष्पन्न झालं नाही.

चिंतामणरावांची स्थिती वेगळीचं होती. ते जे बेशुद्ध होते ते शुद्धीवर यायला तयारच नव्हते. विविध उपचार करून डॉक्टरांनी त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्याजवळ बसविलं आणि ते 'शुद्धीवर येताच कळवा' म्हणून निघून गेले होते. खरे तर गोपाळरावांच्याही आधी त्यांचा देहांत होणं वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाच्या भूमिकेतून योग्य होतं. पण ते आणि गोपाळराव दोघे न मरता, वैद्यकाचा घोर अपमान करण्यासाठीच जणू जिवंत होते. नातेवाईक मंडळी नंतर येण्याचे वायदे करून परतली. त्यांच्या प्रेतयात्रेसाठीच त्यांना आता तयार व्हायचे होते. ह्यासाठीच थोडे आधी ते हॉस्पिटमधून पळाले होते.

रात्री अकरा-बारा वाजता मात्र अगदी झोपलेल्या माणसाला कुणी हालवून जागं करावं तसं हे दोघेही शुद्धीवर आले. पण दुर्दैवाने तिथं त्यांचे कुणी नातेवाईक नसावेत किंवा असलेले झोपले असतील. त्यामुळे त्यांच्या शुद्धीवर येण्याला काहीच अर्थ राहिला नाही. दोघांनी एकमेकांकडं पाहिलं. बँडेजमध्ये बांधलेले हात किंचित उंचावले आणि पुन्हा दोघेही निपचित पडले. अशक्तपणामुळे की कसल्या तरी अशक्यतेमुळे कोणास ठाऊक ! गोपाळरावांचा मुलगा जेव्हा तेथे आला तेव्हा मात्र ते पुन्हा निपचित पडलेलेच त्याला दिसले होते. त्याने खुर्ची ओढून घेतली आणि मोठ्या समाधानाने तिच्यावर बसकण मारली. तो दमला होता पण त्यापेक्षा त्याने रात्रभर जळणारा व्हरांड्यातला १५ वॅटचा दिवा मुद्दाम येथून ४ किलोमीटर सायकल मारत जाऊन बंद केला होता. त्यामुळे एक समाधान त्याला प्राप्त झालं होतं. खुर्चीत बसल्या बसल्या तो पुन्हा कसल्याशा हिशेबात पडला,..... ''लाकूड'' ''मडके'' ''तेरावे'' असे शब्द त्याच्या तोंडातून निसटत होते. नंतर तो डुलक्या घेऊ लागला. जागरणानं तब्येत बिघडेल, ''औषधांचा खर्च'' करावा लागेल...म्हणून.

पहाटे सहा वाजता डॉक्टरांना आश्चर्याचा झटकाच बसला. दोन्ही पेशंट विलक्षण सुधारले होते. त्यातून कोणाची तब्येत झपाट्याने सुधारते आहे हे कळेना. ते स्वत: काळजीपूर्वक पाहणी आणि विचार करीत होते. कालपासून आजपर्यंतच्या ह्या जखमींचा प्रवास नोंदवून ठेवण्यासाठी त्यांनी एकदा प्रयत्न केला पण गोपाळरावांच्या मुलाने त्यांच्या ह्या गोष्टीचा फायदा करून घेतला तर. कदाचित त्या 'प्राप्त ज्ञानाची नोंद' पैशात तो वसूल करील असं या वयस्कर गृहस्थाला वाटून तो त्यांनी सोडून दिला.

नऊ सत्तावीस झाले. काल बरोबर ह्याचवेळी तो अपघात घडला होता. ह्याचवेळी ते उपाहारगृहाबाहेर पडले होते. नवशिक्याची मोटार धडकून जखमी झाले होते.

''डॉ...डॉ...'' गोपाळरावांनी हात उचलला होता.

''होय...बोला कसं वाटतं..?'' गोपाळरावांनी हात उचलला. पण तो संपूर्ण बँडेजग्रस्त असल्याचे पाहून ते वैतागले. त्यानी तो कॉटवर आपटला. असह्य वेदना झाल्या असाव्यात. चेहऱ्यावर त्या उमटल्या होत्या. क्षणभराने त्यांनी डॉक्टरांना जवळ बोलावले...खुणेनं त्यांचा हात हातात घेतला आणि त्यांची बोटे धरली. पण त्यांना हवी ती हालचाल करता येईना. पुन्हा वैतागून त्यांनी हात आपटला. त्यांना काहीतरी सांगायचे असावे...

''डॉ...क्ट...र'' चिंतामणराव कळवळून ओरडले.ते बरेच शुद्धीवर आले होते. त्यांनी आपल्या जवळपास पाहिले. त्यांची पत्नी पायांजवळ मुकाटपणे बसली होती.

डॉक्टर धावले. चिंतामणराव आपल्या पत्नीकडे पाहू लागले. त्या बरोबर बाईंना रडे कोसळले. चिंतामणरावानी मात्र त्याना जवळ बोलावले. तेही बोलू शकत नसतील पण त्यांनी हात हालवून एक बोट उभारले. पत्नीने ''काय म्हणून विचारले.''

''एक....रू...पा..या'' एवढेच अस्पष्ट शब्द ऐकू आले.

''अहो...ते...एक रुपाया मागताहेत.'' डॉक्टर त्यांच्या पत्नींना म्हणाले. तिने न कळून पण चटकन रुपाया काढून दिला. गोपाळरावाकडे बोट करून त्यांना द्या असं त्यांनी

सुचविलं. ''त्यांना द्या म्हणताहेत.'' डॉक्टर उद्गारले.

चिंतामणराव मान वळवून पहात होते. गोपाळरावही त्यांच्याकडे पहात होते. त्यांच्या डोळ्यात स्मित खेळत होते. चिंतामणरावांच्या पत्नीने गोपाळरावांच्या पुढे ती नोट धरली. गोपाळरावांनी बँडेजमध्ये असलेल्या हातात ती घेण्याचा प्रयत्न केला पण ते जमले नाही. बँडेज बांधलेल्या छातीवर ठेवून घेऊन त्यांनी बँडेजचा तो पंजा त्यावर ठेवला आणि दुसऱ्याच क्षणी ते किंचित हसले...आणि त्यांचे शरीर निष्प्राण झाले. डॉक्टरांनी क्षणभर काय घडले त्याचा अंदाज केला. ते आता चिंतामणरावांकडे वळले पण त्यांचेही शरीर निर्जीव झाले होते. बहुतेक त्यांना गोपाळरावांकडून रुपायाची पोच घेण्याची घाई झाली असावी. म्हणूनच त्यांनीही महाप्रयाण केले होते.

आणि डॉक्टरांच्या कानावर शब्द पडत होते, ''मी हा रुपाया घेतो...हं....'' डॉक्टरांनी पाह्यलं. गोपाळरावांचा मुलगा नोट खिशात घालीत होता.

बाहेर ह्या महानिर्याणानिमित्त असंख्य अश्रू वाहत होते. त्यात वर्तमानपत्रवाल्याचेही काही नक्कीच होते.

◆◆◆◆


*हार्दिक शुभेच्छा*

**डिझायनो कुशन वर्क्स**

राजारामपुरी १२ वी गल्ली,
बाईच्या पुतळ्यासमोर, कोल्हापूर

**सोफा सेट विक्री व दुरुस्ती**

*With Best Compliments from*

**NATIONAL MEDICAL**

**Rafiq A. R. Memon**

**RAJARAMPURI 2ND LANE,**
**KOLHAPUR.**
**PHONE : 529370, 527346**

## नाट्यसमीक्षा

# जिथे गवतास भाले फुटतात

## एक पिळदार नाट्यकृती

कु. शलाका नौकुडकर
बी. कॉम. भाग - १

'रायगडला जेव्हा जाग येते' ह्या नाटकाचे लेखक म्हणून ज्यांना महाराष्ट्र ओळखतो त्या प्रा. वसंत कानेटकरांचे 'जिथे गवतास भाले फुटतात' हे शिवयुगावरील एक संशोधनाधिष्ठित ऐतिहासिक नाटक आहे. कोल्हापुरातील प्रख्यात ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक शिक्षणतज्ञ काकासाहेब तथा श्री. व्ही. टी. पाटील यांची महाराष्ट्राची अस्मिता, स्वातंत्र्यलक्ष्मी महाराणी ताराबाईवरील परमभक्ती ही या नाटकाची प्रेरकशक्ती असल्याची साक्ष अर्पण पत्रिकेतून मिळते.

ह्या प्रेरणेच्या जिवंत व जातिवंतपणामुळेच अठरा वर्षाच्या दीर्घ चिंतनानंतर ह्या नाटकाचा जन्म झाला. म्हणून ह्या नाटकाच्या नाटककाराइतकेच श्रेय ऋषितुल्य ताराराणीभक्त काकासाहेब तथा श्री. व्ही. टी. पाटील यांना दिले पाहिजे.

### एक कर्मकठीण काम :

इ. स. १६८९ ते १७०७ एवढ्या मराठेशाही कालीन कालखंडावर आधारलेले हे नाटक प्रा. वसंत कानेटकरांना 'एक महाकठीण काम' वाटले. ह्या कालावधीत मराठेशाहीत घडलेल्या घटना जशा वेगवान तशा गुंतागुंतीच्याही आहेत. विविध प्रवृत्तींची माणसे आणि पिळदार सामाजिक परिस्थितीतून त्यांची झालेली जडणघडण रेखाटणे हे इतके सोपे काम मुळीच नसल्याचे मत लेखकानी व्यक्त केले आहे. नाटककारापुढील आव्हान विलक्षण होते. 'काय आणि कसे ठेवायचे यापेक्षा काय आणि कसे गाळायचे या प्रश्नाने' लेखक चिंतामग्न झाले होते. नाटकाचे लेखन करण्यापूर्वी जो अभ्यास लेखकाने केला त्या अभ्यासाला ग्रंथ पुरवून श्री. काकासो यांनी सहाय्य केले आणि कानेटकरांनी जो अभ्यास केला त्यानेच लेखनाची दिशा निश्चित झाली. लेखकांना सुरुवातीला पडलेला पेच पुढे लिहिताना नाहीसा झाला हे नाट्यकृतीच्या वाचनातून बऱ्याच अंशी जाणवते. तो पेच काही अंशी नाटकावर परिणाम करून गेला आहे. त्यामुळे संताजी-धनाजीच्या व्यक्तिरेखा रेखाटनास, महाराणी ताराराणीच्या तेजस्वी स्वभावाची वैशिष्ट्ये रेखाटनास वाव राहिलेला नाही. औरंगजेब ही व्यक्तिरेखा तशी नाटकभर आपला प्रभाव दाखवीत राहते. औरंगजेबाच्या व्यक्तिरेखेविषयीचे नाटककाराचे प्रेम वाढत गेल्याचा हा सकृतदर्शनी पुरावा आहे. लेखकाने प्रस्तुत नाटकाची पार्श्वभूमी चितारण्यासाठी औरंगजेबाच्या व्यक्तिरेखेचा उपयोग करून त्या पार्श्वभूमीवर सेनापती संताजी घोरपडे आणि महाराणी ताराराणी यांचे कार्यकर्तृत्व, त्यांचा प्रभाव, त्यांची व्यक्तिगत महानता कौशल्याने रेखाटून प्रस्तुत नाटकाच्या झंझावाती, आवर्ती, कालखंडाला सर्व ताकदीनिशी शब्दशब्द करून 'एका कठीण कामा'ला सोपे बनविले आहे.

### पार्श्वभूमीस्वरूप औरंगजेबाची व्यक्तिरेखा :

औरंगजेबाने प्रस्तुत नाटकाचा बराच भाग व्यापला आहे. दख्खनमध्ये आपल्या हयातीची दोनहून अधिक तपे हट्टाने घालवून असहाय्य स्थितीत मृत्यू पावलेल्या औरंगजेबाची व्यक्तिरेखा नाटकात आपल्या संपूर्ण वैशिष्ट्यांसह लेखकाने ताकतीने उभी केली आहे. त्याचे बोलणेचालणे, बौद्धिक कुशाग्रता, व्यवहारपटुत्व, राजनीतीमध्ये जरब निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न, त्याची संशयीवृत्ती, आपल्या आजुबाजूच्या लोकांना सतत पारखून घेत राहण्याचा त्याचा स्वभाव, मराठा जमातीचे परीक्षण करत राहून निष्कर्षाप्रत येण्याइतकी त्याची चिंतनशीलता यांचे समग्र दर्शन नाटकात जागजागी होते.

एक साक्षेपी, सावध राज्यकर्ता आपल्या कर्तव्यकर्मात किती समर्पण बुद्धीने काम करतो, वागतो-जगतो हे समजून घेता येण्याची सोय प्रस्तुत व्यक्तिरेखात निश्चितच आहे. पण त्यापलीकडे एक माणूस म्हणून त्याची योग्यता आहे, त्याच्या व्यक्तिगत जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या त्याच्या भावभावना काय आहेत हे सुद्धा प्रस्तुत नाटककाराने कुशलपणे प्रगट केले आहे. औरंगजेब लुटीतील संपत्तीचा हिशोब बसल्या ठिकाणी करून आपल्या चतुर बुद्धीची साक्ष पटवून देतो आणि श्रीमान योगी छ. शिवराजांविषयी धन्योद्‌गार काढून आपल्या भारदस्तपणाचे, उचित मूल्यमापक बुद्धीचे दर्शनही घडवतो. तो म्हणतो, 'शिवाला माणसं मिळाली, माणसं घडविता आली, हे मानायलाच हवं, आसद, मुत्सद्दी म्हणून शिवा मातब्बर होता, सेनापती म्हणून तो जबरदस्त होता, आणि इन्सान म्हणून तर तो पाक दिलाचा आणि मोठ्या मनाचा होता. सैनिक आणि सरदार तर सोडूनच दे, पण या मुलखातील रयत देखील त्याच्यावर अजून केवढं प्रेम करतेय, किती गोडवे गातेय ते पहा!'

औरंगजेबाच्या व्यक्तिरेखेची तिसरी बाजू भयानक आहे. शासक कसा आणि किती क्रूरकर्मा असतो हे दाखविणारी ही बाजू. शासकाला नाती नसतात. तो मानवी षड्रिपूंच्याही पलिकडे गेलेला असतो हे सांगणारी ही बाजू. त्याच्याकडे पाहताना त्याच्या महत्त्वाकांक्षेचा गौरीशंकर किती उंच होता एवढंच आम्ही - तुम्ही जाणून घ्यावं, त्यावर टीका- टिप्पणी करू नये; असे सुचविणारी ही बाजू. औरंगजेबाने आपल्या जन्मदात्याला कैदेत कोंडून मारलं, आपल्या दारा-शुजा ह्या भावांची हत्या केली, त्यांच्या रक्तानं आपले हात बरबटून घेतले. त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. आसेतुहिमाचल भारताचा तो शहेनशहा झाला. मोगल घराण्याला शोभेल असंच तो जगला, वागला, तैमूरलंगचे वंशज समजून घेण्यात कृतार्थता मानणाऱ्याचे हे वर्तन विसंगत मुळीच नाही पण त्या निमित्ताने लेखकाने दोन भिन्न वंशांचे ध्येयधोरण, राजकारण कसे आपापल्या वळणाने जाणारे असते हे स्पष्ट केले आहे. क्रूरकर्म करणाऱ्या औरंगजेबाच्या पार्श्वभूमीवर राजकीय पेचप्रसंगात सापडलेल्या महाराणी ताराराणीचे वर्तन फार वेगळे आणि त्यांच्या महान परंपरेला शोभेल असेच दिसून येते. औरंगजेबानं जो पिढीजात हिंस्र स्वभाव दाखवला तो ताराराणी दाखवीत नाही. तिच्या डोक्यात प्रतिस्पर्धी म्हणून येऊ घातलेल्या शाहूबद्दल प्रतिशोध, हिंसा, कपट या भावना नाहीत. त्या थोर साध्वीला चिंता आहे आपल्या वंशातील महापुरुषानं जोपासलेल्या, आकाराला आणलेल्या स्वप्नाला तडा न जाईल याची. यासाठी ती 'आत्माहुती' देण्याचा विचार करते. हा दोन संस्कृतीमधील फरक अत्यंत कलात्मकतेने रेखाटावा तो प्रा. कानेटकरांनीच!

## शिवस्नुषा ताराराणी : एक अलौकिक व्यक्तित्त्व

इ. स. १६८९ ते १९०७ या ऐतिहासिक कालखंडात महाराष्ट्रात ज्या दोन ऐतिहासिक महान व्यक्तिरेखा आढळतात त्यातील दुसरी व्यक्ती छ. शिवरायांची सून भद्रकाली ताराराणीच होती. नाटकात ताराराणीला आणखी थोड्या विस्ताराने रेखाटणे आवश्यक होते असे लेखकाला वाटते की काय कोणास ठाऊक पण वाचक - प्रेक्षकांपुढे ही तेजस्वी, ओजस्वी व्यक्तिरेखा पूर्णतः प्रकटली नाही.

राजारामासारख्या नाकर्त्या कुचकामी राजाला सांभाळणारी कर्तबगार स्त्री म्हणून तिची योग्यता मोठी आहेच, पण तिचं मोठेपण आहे आपल्या महान पूर्वजांचे शिवछत्रपतींचे राज्य कुशलपणे व सुरक्षित ठेवण्यासाठी ती करत असलेल्या धडपडीत. शिवछत्रपतींचे राज्य एक मालमत्ता म्हणून तिला नको आहे. तो एक तेजस्वी वारसा म्हणून तिला हवा आहे. ही महान स्त्री व्यथित होऊन उद्‌गारते, 'पंत, रोहिडेश्वरी, थोरल्या महाराजांनी संकल्पिलेले ते श्रींचे राज्य आता संपले आहे. मागे उरली आहे ती फक्त एक दौलत... एक संपत्ती, एक जहागीर, एक मालमत्ता, एक वतन'. मराठ्यात यादवी युद्ध होऊ नये अशीही तिची इच्छा आहे. ती मनाने आणि शरीराने शिवप्रभूंच्या ध्येय-धोरणांशी एकरूप झालेली दिसून येते. महाराणी ताराराणीचा शाहूला विरोध आहे, तोही तिच्या तर्कसंगत, ध्येयनिष्ठ मनोभूमिकेला धरूनच, जो औरंगजेबालाच आपला बाप मानतो, ज्याच्यावर लहानपणापासून मुसलमानांनी धर्म व संस्कृतीची गहिरी छाप पडली आहे, ज्याला शिवछत्रपतींचा वारसा चालवायचा म्हणजे काय हे आता सांगून, समजावूनही कळणार नाही अशा व्यक्तीचा उपयोग तेजस्वी परंपरा चालविण्यास कधीही होऊ शकणार नाही. म्हणूनच त्यांचा 'वारसा' म्हणून निदान छत्रपती शिवाजी महाराजांच्या

त्याग आणि पराक्रमपूर्ण कार्यात तरी विचार होणे शक्य नाही, 'शाहू हा सुन्नत न झालेला मुसलमान होता' हे पूज्य काकाजींचे मत इतिहासात नमूद करण्यायोग्य आहे. म्हणूनच ताराराणी व्यथित झालेली दिसते. शाहूंच्या हाती मराठी राज्य सोपविण्याचा विचार तिला मरणप्राय दु:ख देतो. तिची व्यक्तिरेखा नाटककाराने अघळपघळपणे पसरली नसेल पण प्रभावकारितेत ती एवढीही पुरेशी आहे.

अशाप्रकारे मराठेशाहीचा एक शिवप्रेरणेने भारावलेला कालखंड प्रस्तुत नाटक आपणापुढे त्यातील बारीकसारीक तपशिलासह, प्रमुख ऐतिहासिक घटनांसह उभे करण्यात यशस्वी झाले आहे. गवताप्रमाणे महाराष्ट्र भूमी, तिची माणसे तुच्छ मानणाऱ्या गर्विष्ठ दिल्लीपतीला त्या गवतावर भाल्याचे फाळ आढळून सावधपणाने म्हणून नामुष्कीने जगायला भाग पाडणाऱ्या मराठी अस्मितेचे दर्शन घडविणे हे उद्दिष्ट साध्य झाल्याचे येथे दिसून येते.

◆◆◆◆



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गावातील एक पुढारी आवेशाने भाषण करीत होता. 'आता आपण इतिहासाचे नवे पान उलटले आहे. आता आपले लक्ष आपण भविष्यकाळाकडे केंद्रित केले पाहिजे. पूर्वीच्या सर्व गोष्टी आपण विसरून गेलं पाहिजे.'

प्रेक्षकांतला एक श्रोता मध्येच उभा राहून म्हणाला, 'साहेब, पण माझे शंभर रुपये तुमच्याकडून येणं आहे मात्र विसरू नका.'

## प्रसाद भक्षण केल्यावर ईश्वराने दर्शन घडण्याचा चमत्कार

**रहस्य** : पुजारी किंवा मांत्रिक भाविकांना भुलविण्यासाठी हा दुष्ट प्रयोग नेहमी करतात. प्रसादामध्ये अफू, चरस किंवा गांजासारखा बेशुद्ध करणारा पदार्थ मिसळतात. हा पदार्थ खाल्यामुळे एक प्रकारची धुंदी येऊन विविध भास होतात व मनातील काल्पनिक प्रतिमांना स्वरूप प्राप्त होऊन ईश्वराने दर्शन दिल्यासारखे वाटते.

## मोठा दगड तर्जनीवर उचलणे

५०-६० किलो वजनाचा दगड चौघांनी आपली तर्जनी लावून उचलण्याचा हा चमत्कार भाविकांना दैवीशक्तीचा प्रभाव वाटतो. पण खरी गोष्ट अशी की साठ किलो वजन चार व्यक्तींच्या बोटांवर विभागले जाते व दगड उचलला जातो.

## निखाऱ्यावरून चालण्याचा चमत्कार

भक्तगर निखाऱ्यावरून चालूनही त्यांचे पाय पोळत नाहीत असा चमत्कार दाखविला जातो. साधारणत: पाच ते सहा मीटर इतके निखारे असतात. शास्त्रीयदृष्ट्या तीन ते साडेतीन सेकंदपर्यंत आपल्या शरीराचा भाग अग्नीच्या सान्निध्यात आल्यास त्याला इजा होत नाही. भक्त पाय धुऊन निखाऱ्यावरून चालल्याने 'लेडन फ्रोस्ट आवरण'मुळे पाय भाजत नाहीत. यात काही दैवी शक्ती नसते.

## काचेचे तुकडे खाणे

काचा दाताने चावून पाण्याबरोबर त्या गिळल्यास व्यक्तीला इजा होत नाही. इतकेच नव्हे तर कोणतीही टोकदार वस्तू एकदा घशाखाली गेली की पचनमार्गात कोठेही अडकून पडत नाही. काचा खाऊन त्यावर दोन केळी खातात. त्यामुळे काचेचे तुकडे एकत्र होतात.

# इंटरनेट

कु. अनुराधा सरनाईक
बी. ए. भाग - १

आजच्या यंत्रयुगामुळे जगाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम अत्यंत वेगाने चालू आहे. संगणक हा हरकाम्या म्हणून अक्षरश: मानवाच्या प्रगतीला हातभार लावत आहे. त्याचबरोबर इंटरनेटमुळे गेल्या चार-दोन वर्षामध्ये जग अत्यंत जवळ आले आहे. या इंटरनेटच्या आवाक्या विषयी माहिती घेऊ या.

इंटरनेट हे संगणकाचे एक जाळे (Network) आहे. यामध्ये संगणक एकमेकांशी अशा रीतीने जोडलेले आहेत कि ज्यायोगे एकमेकाशी विचार विनियम करणे, चर्चा करणे, लिहिलेला मजकूर एकमेकाला पाठविणे इ. कामे अगदी घरबसल्या होतात. आता हा नेटवर्क अगदी छोटासा असू शकतो किंवा अगदी जगभर पसरलेल्या लाखो संगणकाचा असू शकतो. हे सर्व संगणक टेलिफोन लाइन्स्. सेटेलाईट प्रसारण, फायबर ऑप्टीक केबल किंवा रेडिओ लहरी याद्वारे जोडले जाऊ शकतात.

अमेरिकेमध्ये साधारण १९६९च्या दरम्यान सरकारने शाळेमध्ये संगणकाचा अभ्यासक्रम सुरु केला. त्यामध्ये सरकारी कामात किंवा शालेय व्यवस्थापनात येणाऱ्या समस्यावर तोडगा काढण्यासाठी संगणक वापराचे प्रयत्न होत होते. त्यावेळी त्यांनी साधारण वर्ड-प्रोसेसर वर तयार केलेली संगणक प्रणाली संगणकावर संग्रहीत करायला सुरवात केली. पण तेव्हा अशी कोणती लायब्ररी नव्हती कि जिथे काम करणाऱ्या व्यक्तीला हे माहीत होऊ शकत नव्हते कि असेच अभ्यास त्याला किंवा त्याचा आपल्याला उपयोग होऊ शकतो काय ?

त्या दरम्यान डिफेन्स ॲडव्हान्सड् रिसर्च प्रोजेक्ट एजन्सीच्या एका कर्मचाऱ्याला असे वाटले कि सर्व संगणक टेलिफोन लाइन्सद्वारा जोडले जाऊ शकतात. एका संगणकावरील आज्ञा प्रणाली किंवा लिहिलेला मजकूर विनाविलंब दुसऱ्या संगणाकावर पोहोचू शकतो. त्यावेळी त्याने चार संगणकाच्या साहाय्याने एक नेटवर्क डारपेनेट तयार केला. हळूहळू याचे महत्त्व पटू लागले व आज इंटरनेटचे विश्वव्यापी दालन खुले झाले.

आजच्या पिढीसाठी इंनटरनेट एक असे साधन आहे ज्यामुळे मानवाच्या बुद्धीच्या विकासास मदत होते. संगणक आपल्याला वेगवेगळ्या विषयावरील माहिती अगदी क्षणात इंटरनेट द्वारा देतो त्यामुळे आपल्या बुद्धीला खाद्य पुरवण्याचे काम होते. जी माहिती गोळा करण्यासाठी काही वर्षे लागली असती ती माहिती लवकर मिळाल्यामुळे इंटरनेटकडे आपण 'ब्रेन फूड' म्हणून पाहिले पाहिजे. एकविसाव्या शतकात जात असताना सतत ज्ञानवृद्धीच आपल्याला विकासाकडे घेऊन जाईल. कारण ज्ञान वाढविण्यासाठी आपल्याला तो स्त्रोत घरबसल्या मिळाला पाहिजे व हे काम फक्त इंटरनेटद्वाराच होऊ शकते. खालील काही मुद्यांच्या आधारे इंटरनेटद्वारा आपण आपले ज्ञान वाढवू शकतो.

'इ मेल' द्वारा आपण जगातील कोणत्याही व्यक्तीशी आपल्या विषयासंदर्भात चर्चा करू शकतो. दुसऱ्या देशातील वैज्ञानिकाबरोबर चर्चा करून अडचणी सोडवू शकतो. विचारांचे आदान-प्रदान होऊ शकते. बोलणे व ऐकण्याच्या प्रक्रियेमध्ये आपण जगातील कोणत्याही व्यक्तीशी सल्ला मसलत करत असल्यामुळे सारे जग जणू आपले शेजारीच आहेत. 'इ मेल' द्वारे आपण एकमेकांना पत्र पाठवू शकतो. आपण आपल्या संगणकावर पत्र टाईप केले की त्याचक्षणी ज्या व्यक्तीला पाठविले आहे त्याच्या संगणकावर ते पत्र जाईल. यामध्ये वेळेची प्रचंड बचत तर होणारच आहे शिवाय टेलिफोनमुळे पत्र लिहिण्याचा प्रकार

कमी झाला होता. तो आनंद पुन्हा मिळू शकेल. त्याचबरोबर मेलिंग लिस्ट मध्ये आपण आपले नांव नोंद केल्यानंतर एक पत्र आपण बऱ्याच व्यक्तीना एकावेळी पाठवू शकतो की ज्यामुळे प्रत्येकाला वेगळे पत्र लिहिण्याची किंवा पोस्ट करण्याची गरज नाही.

इंटरनेट मुळे आपण देश, स्थळे व विचारांची माहिती घेऊ शकतो. इंटरनेटच्या सहाय्याने आपण जगप्रवास करू शकतो, चंद्रावर जाऊ शकतो, घर बसल्या आयफेल टॉवर, ब्रिटिश म्युझियम इ. पाहू शकतो. माहितीचे विस्तीर्ण भांडार खुले झाल्यामुळे ''घेशील किती दो कराने'' अशी आपली अवस्था होऊन जाईल.

इंटरनेटच्या सहाय्याने आपण शोध व रिसर्चचे काम करु शकतो. आपल्याला आवश्यक माहिती शोधण्याचे त्याविषयी जादा जाणून घेण्याचे काम इंटरनेटद्वारा शीघ्र होते. ऐतिहासिक, संगीत, विज्ञान, कृषिविज्ञान, पाक विद्या, फॅशन, डिझाईन इ. विषयावरील ज्ञान आपल्याला अवगत होते. आपल्या शोधनिबंधासाठी लागणारी माहिती इंटरनेट मध्ये मिळू शकते.

ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचे महत्त्वाचे कार्य इंटरनेटद्वारा झाले आहे. एखाद्या विषयातील माहिती नाही म्हणून काम खोळंबले आहे अशी अवस्था इंटरनेट मुळे येऊ शकत नाही. आपल्याला आवश्यक माहिती शोधताना आपल्याला अचानकपणे वेगळ्या विषयावरील माहिती मिळू शकते. विविध खेळ, त्यातील विक्रम, घडामोडी, खेळाडूंची नावे, गाजलेले सामने इ. आपण इंटरनेटद्वारे बघू शकतो. सिनेमाचे क्षेत्रही त्याला अपवाद नाही. सिनेमाचा इतिहास, त्यातील नायक, नायिका, खलनायक इ. संदर्भातील माहिती, गायकांची माहिती आपल्याला उपलब्ध होऊ शकते.

पण इंटरनेटचा वापर हा शैक्षणिक व व्यापारी दृष्टिकोनातूनच व्हायला पाहिजे अन्यथा त्याचे वाईट परिणाम होऊ शकतात. अलिकडे काही मंडळीनी भारतीय नट्यांची अश्लील छायाचित्रे इंटरनेटवर दाखवून आपल्या हिणकस मनोवृत्तीचे दर्शन घडविले याबाबतीत काय करता येईल याचा गंभीरपणे शास्त्रज्ञ विचार करत आहेत. एकविसाव्या शतकात जात असताना इंटरनेट आपला चांगला मार्गदर्शक असेल हे मात्र निश्चित.

## 'E' Mail





## मात

संकटात सापडलास तरी
मदत कुणाची घेऊ नकोस,
दु:ख अनावर झाले तरी
अश्रू कुणाला दाखवू नकोस

कारण आपले दु:ख आपले असते
त्यावर आपणच मात करायची असते.
बाकीचे सगळे बघे असतात
त्यांनी दूरून नुसते पहायचे असते

सुखात तुझ्या जे जवळ असतील
दु:खात तेच दूर पळून जातील
याच दु:खावर मात करत जा
सुखाचे दिवस आपोआप येतील

त्यावेळी यांच्यापासून सावध रहा
ते तुझ्याशी जसे वागले
तसाच त्यांचीशी वाग
कारण आपले दु:ख आपले असते
त्यावर आपणच मात करायची असते.

कु. मनिषा भूपाल सूर्यवंशी, बी. ए. भाग १

## नातं

न पाहिलेल्या माणसातही
आपलं मन अडकत असतं
नातं नाही म्हणत म्हणत
अनामिक नातं जुळत असतं

शब्दात शब्द गुंतून
रेशीम नातं विणलेलं असतं
एक एक धागा सोडायचा म्हटलं
तरी सुद्धा जमत नसतं

एक गुंता सोडवताना
गुंफणं अधिक वाढत जातं
न पाहिलेल्या माणसाला
हृदयाचे डोळे करून पहायचं असतं

दिसणं, असणंच्याही पलिकडे
एक नातं अस्तित्वात असतं
शब्दात गुंफता येत नसतं तरी
खोल हृदयात वसलेलं असतं.

कु. रत्नमाला कांबळे, बी. ए. भाग ३

## डोळ्यांची पाती

माझ्या डोळ्यांची पाती
ओली झाली अंधाऱ्या राती
कुणी पुसाया तया हाती
नाही उरली आता नाती

जीव शिणला वाटे
नात्या-गोत्याच्या त्या पाळता रीती
सोसाट्याच्या वाऱ्यासंगे धावलो
त्याला दिली ना विश्रांती

होती जी माझी,
मज सोडूनी गेली
तया जाताना पाहून
पापणी ओली झाली

डोळ्यात साठता पाणी
ती औसंडून गेली

कु. वैशाली एकनाथ देसाई, बी. ए. भाग २

## देव

इकडून तिकडून येतात
नमस्कार करतात
दुधा दह्याची धार
माझ्यावर ओततात
काय करायचे ?

इकडून तिकडून येतात
नवसाचे बोल
बोल बोल बोलतात
नैवेद्य दाखवतात
आपणच खातात
काय करायचे ?

भक्तीचा बाजार
हवा तसा भरवतात
मधल्या मध्ये मात्र
माझे हाल करतात
काय करायचे ?

निमूटपणे सारा अन्याय
सहन मी करतोय
कोणी मला घडवलय
त्याचाच मी शोध घेतोय

कु. महानंदा स. शिंदे-देसाई, बी. ए. भाग -१

## जपून गं पोरी

कॉलेजला जाताना उगीच
मन भिरभिरत असतं
समोर येणारं पोरगं
ओळखीचं वाटतं

हसावंस वाटतं पण
ते दुसरीकडे बघत असतं
पाठीमागून कुणीतरी
आवाज करीत असतं
वळून पहावं तर कोणीच नसतं

झाडावरचं पाखरू
किलबिलंत असतं

वर्गात शिरताना कोणीतरी
पदर माझा धरतं
लाजून मागं पहावं तर
पातळ दारात गुंतलेलं असतं
उगीच का कुणास ठाऊक
आजीचं म्हणणं आठवत असतं
जपून गं पोरी वर्ष सोळावं
धोक्याचं असतं

कु. शीतल शिवाजी माने
बी. ए. भाग - १

## मदर

थोर समाज सेविका होत्या मदर तेरेसा,
दीन, दलीत, गोर-गरिबांना होता दिलासा.

केला नाही त्यांनी कधीही भेदभाव,
सर्वांनी कार्यासाठी केला त्यांचा गौरव

स्वत:च्या इच्छेने केले त्यांनी कार्य सुरु,
सर्वजण लागले मदत करू

दीन दुबळ्यांच्या होत्या त्या आधारस्तंभ
झाला नाही त्यांच्या व्रताचा कधीही भंग

जनसेवा हीच ईश्वर सेवा हे होते व्रत,
केली त्यांनी सेवा सर्वांची अखेरपर्यंत

रूग्ण गरजूंची खरी आई ती गीतांजली,
तिचे कार्य चालू ठेवणे हीच तिला श्रद्धांजली

समीक्षा इनामदार
११ वी आर्टस्

## जीवनरथ

जीवन हे जगताना
कधीच रडायचं नसतं,
उरी वेदना होताना
सदाच हसायचं असतं ॥

काटा कुणाच्या मार्गी
कधीच बनायचं नसतं
फूल बनून या जगी
सर्वांना सुखवायचं असतं ॥

ओझं आपल्या दु:खाचं
कोणावर लादायचं नसतं
घेता आलं कुणाचं तर
दु:ख घ्यायचं असतं ॥

शब्दाच्या माऱ्याने कधी
घायाळ व्हायचं नसतं
स्निग्ध प्रीतीच्या शब्दानं
सर्वांनाच सावरायचं असतं ॥

क्षणभंगूर उदासीन जीवनाला
निभवायचं असतं
अंती मरताना सर्वांना
प्रकाशित करायचं असतं ॥

जीवन नसावं
समुद्रातील प्रतिबिंबासारखा
जीवन असावं
समुद्राप्रमाणे खोल, शांत व
चंद्रासारखे शीतल ॥

कु. सविता मांगले, बी. ए. भाग - २

## माझे मन

माझे मन जरा आहे वेडं
कधी हसतं तर कधी रडतं
कधी शहाण्यासारखं, तर कधी वेड्यासारखं करतं
कधी जागं असतं तर कधी झोपलेलं असतं
कधी बोलतं तर कधी अबोल होतं
काय करावं या खुळ्या मनाला ?
समजावून सांगाल का कोणी त्याला ?

कु. जान्हवी गोविंद कुलकर्णी, बी. ए. भाग - १

# देव

खरंच देव कसा असतो ?
कोणी त्याला शोधतात मंदिरात
दक्षिणा टाकून व्यक्त करतात इच्छा
खरंच का देव असा असतो ?
दक्षिणेचाही मोबदला देतो ?

कुणाच्या अंगातच देव येतो
उपास तापास करायला सांगतो
बकऱ्याचा बळी मागतो
कोणी म्हणतात ''सारीच देवाची लेकरं.''
मग खरंच का देव असा असतो ?
आपल्याच लेकराचा बळी मागतो ?

ठिकठिकाणी होतात अनेक महापूजा
जमा करतात लोक त्यासाठी पैसा
पैसा जास्त ज्याचा, मान पहिला त्याचा
खरंच का देव असा असतो ?
पैसे बघून भक्ती ठरवतो ?

मला तरी वाटते की
माणसातली माणुसकी हाच खरा देव
सद्वर्तन भूतदया हीच खरी भक्ती
नको उपास तापास नको बकऱ्याचा बळी

कु. मनिषा विवेक गुरव, बी. ए. भाग - १

# दिवस

नाही दिवस राहिले पूर्वीचे
पुढे न येणार हे आताचे,
कधी हे दिवस संपायचे ।
दिवस होते खाण्या-पिण्याचे , श्रमाचे,
आता तर आहेत आरामाचे,
कधी हे दिवस संपायचे ।
दिवस होते अहिंसेचे शिष्टाचाराचे,
आता तर आहेत, भ्रष्टाचाराचे
कधी हे दिवस संपायचे ।
दिवस होते सत्याचे न् वचनाचे,
आता तर आहेत लबाडीचे न् व्यभिचाराचे ।
कधी हे दिवस संपायचे ।
दिवस होते आपलेपणाचे, जिव्हाळ्याचे,
आता तर आहेत तिरस्काराचे, मत्सराचे ।
कधी हे दिवस संपायचे ।
कधी हे दिवस संपायचे ।

कु. रूपाली मोहिते, बी. ए. भाग - १

# भाव माझ्या मनीचे

आसवानो माझ्या डोळ्यातूनी वाहू नका
दडलेले भाव माझ्या मनीचे
उघड्या जगा दाखवू नका

भिजलेले डोळे माझे
दु:खद माझ्या भावना
गुपीत मनीचे बोल
उघड्या जगा दाखवू नका

वाहत्या ह्या आसवातूनी
वाहिले भाव गुलाबी
मोहरलेल्या भावना
जगा जाणवू नका

आज माझी पाहूनिया ही दशा
माझ्यावरी हसू नका, हसू नका

स्वप्न माझे भंगले
आणि गीत संपले
आज बाजारात माझ्या
दु:खाना आणू नका

कु. वंदना वास्के, बी. ए. भाग - २

# जय-जय भारत माता

जय-जय भारत माता,
घोषवाक्य उच्चारिता,
माझे देह-भान ही हरिता,
आठवे जे लढले देशाकरिता ॥ धृ ॥
गांधी, फुले असो. मानू सावरकर,
'न डरे मौत को' आम्ही बेडर ॥ १ ॥
प्राणाच्या लावियल्या ज्योती
म्हणून आज अजरामर होती
जळणाऱ्या ज्योतींमधील वात
स्वतंत्रता, स्वाभिनामाची सुरुवात ॥ २ ॥
आपला संसार सांभाळित
आपले आंबेडकर लक्ष घालित
बुडत्या समाजास दिला हात
आहे समाज तो दलित ॥ ३ ॥
शिक्षण प्रसारात सावित्री आपली भोळी
शेण आणि फेकिले दगडांचे गोळे
रंगविता क्षण भरून आले डोळे
मग आई म्हणे का झाले ओले डोळे ॥४ ॥

कु. स्वाती गुरुनाथ सोनार, अकरावी कला

## बदल

दोन्ही आवाजच
पण एक किलबिलाट
तर दुसरा कलकलाट
दोन्ही जंगलेच
पण एक वृक्षांचं
तर दुसरं सिमेंटचं
दोन्ही पक्षीच
पण एक आकाशातील
तर दुसरा पिंजऱ्यातील
दोन्ही संहारच
पण एक कंसाचा
तर दुसरा कृष्णाचा
दोन्ही विचारच
पण एक सन्मार्गाचा
तर दुसरा कुमार्गाचा

कु. प्राजक्ता जाधव, बारावी सायन्स

## स्वराज्य मिळाले पण...

स्वराज्य मिळाले पण...
सुराज्यासाठी तळमळतोय ।
या भूमीतील कण अन् कण
स्वतंत्र हवेसाठी गुदमरतोय ॥
धनवानाच्या पायाखाली
मुंगीसारखा चिरडतोय
अन् कधी सुडापोटी
माणूस माणसाचं रक्त इथं पितोय ॥ १ ॥
जातीवादाच्या दंगलीत
रक्ताचे सडे शिंपतोय
अन् तोच मग स्वातंत्र्यदिनी
हम सब एक'चे नारे लावतोय ॥ २ ॥
थोर गांधींच्या देशात
हिंसेचे स्तोम माजवतोय
आणि जयंती - मयंतीला न चुकता
चौकातल्या पुतळ्याला हार घालतोय ॥ ३ ॥
रक्षक जो आहे
भक्षकही तोच होतोय
पुन्हा एकदा भारतमातेला
पारतंत्र्याकडं झुकवतोय

कु. स्वाती प्र. माने, १२वी सायन्स

## घोटाळे

दारोदारी येतात
मताची भीक मागतात
आश्वासनावर आश्वासनाची
खैरात करतात

शुभ्र धवल खादी घालतात
गांधीवाद बोलतात
गरिबांची गरिबी दूर करणार म्हणतात
घसा फोडून ते सांगतात
दारोदारी येतात...

राखीव जागा देतो,
नोकरीला घेतो,
जातीयवाद मोडतो,
स्त्रीविकास करतो,
असे नको नको ते बोलतात,
दारोदारी येतात...

भोळी ही जनता,
बळी त्याला पडते,
नावावर फुली मारून,
निवडून त्यांना आणते,
दारोदारी येतात...

निवडून हे येतात,
विसरून आम्हां जातात,
स्वतःच्या पोराबाळांची,
जोडणी करून ठेवतात,
दारोदारी येतात...

घोटाळ्यावर घोटाळे,
केवढे हे करतात,
तरी सुद्धा
हे हासत जगतात
दारोदारी येतात...

कु. मृणालिनी आढाव
बी. ए. भाग - २

# बाँबस्फोट

स्फोटातून कसे बसे बचावून
त्याने पार केली गर्दी व
'मी सुरक्षित आहे' फोनवरून
घरच्यांना दिली वर्दी
अगदी दुसऱ्याच क्षणी
आरोळ्यांचा भीषण चित्कार
जणु गुंडांनी लोकांसंगे
खेळला होता एक जुगार
आसमंत थरारून गेले
चक्काचूर झाला गाड्यांचा
काळजाचे तुकडे झाले,
चिंधड्या उडाल्या देहांच्या,
स्फोट करणारे दूरवर उभे होते,
आनंद उफाळून आला होता
मनाच्या कोपऱ्यालाही झाली नव्हती इजा,
लाचखाऊ पोलीस देतीलच कसे सजा !
सारे काही जाणून स्तब्ध रहावे
म्हणून एवढेच म्हणावे,
''कुणालाही तारा कुणालाही मारा,
आहे गुंडांचाच खेळ सारा

**कु. शीतल पाटील**, अकरावी सायन्स

# भारत माझा कृषिप्रधान

भारत माझा कृषिप्रधान
आहे अन्न-धान्याची वाण
तेल साखर धान्यासाठी टाकू देश गहाण
तरीही गर्जूया एकमुखाने
माझा भारत महान...
मानी तरुणांच्या पदरी पडे अपमान
भ्रष्टाचारात अडे मंत्र्यांनी मान
तीच त्यांची तहान तोच अभिमान
तरीही गर्जूया एकमुखाने
माझा भारत महान...
पन्नाशीच्या स्वातंत्र्याला
चढे सुवर्णाची शान
जनतेच्या अंगी आता
उरले नाही त्राण
रित्यापोटी आले कंठाशी प्राण
तरीही गर्जूया एकमुखाने
माझा भारत महान...
नेता रमतो करीत घोटाळा
मुक्या जनतेच्या तोंडी टाळा
कसले बंधन कसला आळा
महात्म्याचे मौन पाळा
स्वार्थापोटी विकूया
साऱ्या देशाचे ईमान
तरीही गर्जूया एकमुखाने
माझा भारत महान...

**कु. तृप्ती मोहन खटावकर**, बी. ए. भाग ३

# संघर्ष

सकाळी उठल्या उठल्याच
वृत्तपत्र पहाणे झाले ॥
वाचून मनाला धक्काच बसला
भल्या पहाटे ॥
माझ्या मनात संघर्षाचे
सुरुंग पेरले क्रांतीचे ॥
दलितांनो ! उठा ॥
असे निस्तेज नि:शब्द
होऊन लोळू नका ॥
जीवनाला नैराश्याचे रूप
देऊ नका ॥
मला माहीत आहे
अन्याय अत्याचारासाठी
झगडले आपुले आंबेडकर
त्यांची विटंबना केली
या लोकांनी ॥
परंतु ही वेळ नव्हे स्वस्थ बसण्याची
ही आहे अस्वस्थ होऊन आपल्याच अस्मितेसाठी
सातत्याने संघर्ष घडवून आणण्याची ॥
युगानयुगे चालत आलेला
हा जातीयतेचा महासागर
हा विषमतेचा भयानक डोलारा
उद्ध्वस्त केल्याशिवाय चैन नाही ॥

**कु. शीतल राचकर**, बी. ए. भाग - ३

## आम्ही वाट पहात आहोत

आम्ही वाट पहात आहोत, आतुरतेने
पावसा तुझ्या पहिल्या सरीची
किती सहन करायची ही आग... अनंत तापाची
कधी संपायची ही यातायात... सावलीच्या शोधाची
अन्य नकोच काही... नकोच काही...
आस फक्त ओलाव्याची
आम्ही वाट पहात आहोत...
आहे माहीत आम्हाला तुझी हिंमत
पाषाणाला पाझर फोडण्याची
मातीला सुगंध देण्याची
सागराला उसळविण्यासाठी
आहे माहीत आम्हाला तुझी माया
भरभरून वाहणारी
सर्वांना कुशीत घेणारी
तुष्ट पुष्ट करणारी
आम्ही वाट पहात आहोत...
बघ ना ! कशी दशा चालली आहे
दिशदिशातून धरतीची
दिली होतीस ना आश्वासने तेव्हा
वळून वळून परतीची
मग वेळ का आता ? घे धाव
तहान मिटू दे मातीची
आम्ही वाट पहात आहोत, आतुरतेने,
पावसा तुझ्या पहिल्या सरीची
पावसा तुझ्या पहिल्या सरीची...

कु. अनुराधा सरनाईक, बी. ए. भाग - २

## प्रश्न दोन वेळेच्या अन्नाचा

फार नाही हो, फक्त दिवसाकाठी,
दोन वेळच्या अन्नाचा प्रश्न
प्रश्न दोन वेळच्या अन्नाचा.
पोटात आग अन् डोळ्यात अश्रू,
कितीही पाहिले तरी नाही हो विझत पोटातली आग.
कष्टाचा डोंगर आणि प्रश्न दोन रुपयांचा,
कितीही उपसला तरी नाही हो विझत पोटातली आग,
सावकाराची कामे आणि त्यांचे अपशब्द,
कितीही ऐकली तरी नाही हो विझत पोटातली आग,
फक्त दोन वेळच्या अन्नाचा प्रश्न
दिवसाकाठी दोन वेळा पेटणाऱ्या पोटातील आगीचा प्रश्न.
कोणी असा विचार तरी केला आहे काय ?
जर ही आग वेळच्या वेळी विझविली गेली नाही तर !
अहो हीच आग, एक मशाल होऊन,
एक वणवा होण्यास वेळ लागणार नाही.
आणि हा वणवा पेटल्यानंतर,
पेटलेला असणार समाज, देश
उरणार फक्त बेचिराख घरे, बेचिराख शहरे, बेचिराख चेहरे
आपले अस्तित्व ही आपल्याला न ओळखण्याच्या स्थितीत
म्हणून म्हणते, दोन वेळच्या अन्नाचा प्रश्न मिटवा ॥ ३ ॥

कु. सुनिता विलास पाटील, बी. ए. भाग - २

## दीस कसं आल्याती !

स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्याती
तरी बी काय कळना
दीस कसलं आल्याती
दिसामागून दीस गेलं
तवाची आण्याची भाकरी
आज रुपायाची झालीया
ह्या गरिबी लाचारीमुळे
माणूस माणसालाच खातोया
स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्याती
तरी बी काय कळंना
दीस कसलं आल्याती
पैसा कमवून पोरांना शाळेला घालायचं म्हणत्यात
पण तीच रातच्याला बारा वाजता
वडाखालच्या भूतावाणी करत्यात
शिक्षण घेऊन शानं व्हा म्हणत्यात पण आज
शाण्याचा पाय वडून येडं पुढं जात्याती
स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाल्याती
तरी बी काय कळंना दिस कसलं आल्याती
While buying certain products the consumer feels that he or she is buying the perfect thing. She feels that after using certain product such as Ever Youth, Fair and Lovely, Synergi, she will become beautiful and she will look young. But she forgets that beauty given by God is a gift of nature. We can't get it by using artificial things.

There is an advertisement of shoes 'Rockers' with light system. After seeing that advertisement a small boy who stays close to my house started asking his mother to purchase the shoes for him. His mother purchased light system shoes for him. The boy was very happy because he was wearing the shoes which have light system. For two days the light system in the shoes worked, but it failed to work on the third day. Poor Child ! He dosen't know that it is just an advertisement shown for the sale of product ! The light system in the shoes only works in the advertisement and not in the real life. Thus, advertisements take us away from the reality of the life. Due to advertisements we do not believe in perfect life, a life which is all goodness, truth and beauty.

Inspite of all these drawbacks advertisements also have some merits. Trade and industries have expanded a lot. Advertisement gives glimpses of world market i. e., National and International market. Our wants are increasing and thousands of things are needed. There are number of producers who produce thousands of things in different parts of the country. Advertisement bridges the gap between producer and consumers. Advertisement helps the producers to bring their goods in the market to the notice of consumers. It also helps the consumer to know where to find the things they want. Advertisements are also important to give information and education. Now-a-days importance of voting is shown on T. V. with the help of film stars, sportsmen etc.

For example MICHAEL FERNANDO the former world Billard champion says, "A nation that votes together, stays together". Importance of literacy programme is also shown through the T. V. It also helps us to increase our general knowledge. By reading the advertisements carefully we come to know what the world is making and how it is progressing. Due to these advertisements we become practical. Thus advertisements are vital necessity of today.

◆◆◆◆

हार्दिक शुभेच्छा

फडके प्रकाशन

इ. ११ वी व १२ वी ची बोर्डाने
मंजूर केलेली क्रमिक पुस्तके,
शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए.;
बॉ.कॉम. व बॉ.एस्सी. ची नवीन
अभ्यासक्रमाची नवीन पुस्तके
आम्ही प्रकाशित केली आहेत.

वितरक -
फडके बुक हाऊस
फडके भवन, हरि मंदिराजवळ,
दुधाळी, कोल्हापूर ४१६ ००२.
फोन ५२०२११, ५२२७११, ५२८३१८

# ARUNDHATI ROY :

## THE BOOKER PRIZE WINNER

*Shamli D. Murkar*
B. A. Part - III

India is a wonderland of great writers and poets with the rich heritage. This soil with its spectacular mythology produced great artists and scientists. Rabindranath Tagore, Sarojini Naidu, R. K. Narayan and the like are twinkling stars in the galaxy of Indian English literature. When I muse on glory and fame of such writers as mentioned above, I come to the conclusion that fame is not easily acquired. It is as Milton says;

**"Fame is no plant that grows on mortal soil".**

To become famous and popular our luck plays dominant role. Shakespeare and G. B. Shaw, the two giants of English drama had to face the stroke of luck. In the slow process hardwork, loyalty and perseverance in any field can lead to the castle of fame; some got fame lately and not easily. They are like in Thomas Gray's words.

**"Full many a gem of purest ray - serene.
The dark unfathomed caves of ocean bear.
Full many a flower is born to blush unseen.
And waste its sweetness on the desert air".**

Some writers get and receive fame easily with one stroke of luck. They become shining stars. Arundhati Roy is one of these stars, who shine brightly on the wide horizon of Indian English literature. The prestigious "Booker prize" was awarded to her, recently. When I read this news about her my heart become a singing bird. I felt proud because she is "WOMAN" who climbed on the peak-point in literary scenario". The God of small Things" made her, "The Lady of Great Things.

With "The God of Small Things", Arundhati Roy creates a new important position for her in literature. A person who reads her novel, wants to know about her more. Arundhati was born in 1960, in Kottayam, Kerala, South India. Her mother, 'Mary Roy belongs to Christain family and her father was a Bengali. Without considering social barriers they married. After the birth of Arundhati, her parents got separated. Arundhati's mother brought up her in very austere manner. At the age of thirteen, She was asked to be self - dependent by her mother. At the age of eighteen, Arundhati left home and went to Delhi to join school of Architecture. In Delhi she had to earn on her own by selling empty beer bottles and fruit. No body can expect such a girl who was seller of bottles and fruit can become a writer of famous book. "The God of small Things". Hard work and patience of her mind led her to such a magnificent work of art that received the

inter-national "Booker" award. But still she is doubtful about her future work. Arundhti's mother brought up her in austere manner, but Arundhati has close, admiring and strong relationship with her mother and she dedicated this novel to her mother "Mary Roy".

**"The Words are, "For Mary Roy
Who loved me enough to let me go"**

Before writing the novel she performed a little role in the film "Massey Sahib" directed by her husband "Pradeep Kishen", She wrote a television epic "The Banyan Tree". She wrote "The Eletric Moon" She also wrote a script for a film, named "Annie". This film won a National award and people's attiudes towords her changed absolutely. She attempted continuously for this novel and the novel gave her world-wide popularity. Arundhati Roy is simple ordinary human being but bold and intellectual Indian woman. She is an excellant orator. Her Financial position was not very good but this novel gave her tremendous wealth.

**The outline of The Novel Is :**

Ammu was divorced daughter of the Ayemenem house. Her husband named Velutha always dominated her. Ammu had to surrender herself to the dominating will-power of her husband. She had two children. Rahel and Estha. They saw and experienced the bitter atmosphere in the house. Sophie was the daughter of Chacko, who was separated from his English wife. His wife was dead. Her lifeless body was fished out of the minachal river. After sometime Ammu ran away from her husband. Chacko loses his wife, He tries to keep the factory going. Babykochamma tries to seduce an English priest but fails. Chacko marries Margarate Kochamma and came back with bottling machine for the pickle. Ammu returned with her children Rahel and Estha. In this way sons and daughters returned.

The novel tells us about the necessity of mutual understanding between husband and wife. It is cross-caste unsuccessful love-affair which is not accepted by society. This is an ordinary theme but is presented in aesthetic manner. The novelist is very conscious about each minute thing related to theme, explosion of passions, background of social and political elements, romantic events and the description of nature. Such events are inter wovened by her in natural mood that made the novel a superb work of art than that of others.

The sales of the novel are significant. " The God of small Things" was published in the beginning of the month of April 1997 and since April to September in six months, 32,000 copies were sold in India alone. The sales- figure and advance for which Roy has made new Indian record are hardly sufficient criteria to judge the real worth of a book. But when in October it became known that "The God of Small Things" has been chosen for the "Booker" award. There are all sorts of opionions about her and this novel. Reputed reviewer for "The New-York Times wrote about the book as being, "Faulknercan in its ambitious tackling of family and race and class, Dickensnian in its sharp eyed observation of society and character. The book was praised by American and British reviewers and attacked by Indian reviewers for the same reasons. The western reviewers like the language that Roy used. Most Indian reviewer didn't like it. The western critics impressed by her narrative technique and design of book but the Indian

critics condemned her for it.

"Mukundan" says", She (Roy) has included all the right ingredients in the correct doses, sexual pessimism, communism, the caste-system...all in correct doses....Roy as a writer, is free to include what she likes "There are various Indian critics who said; "In the novel there are some events which show resemblance to her life. The book is attacked in India mostly bacause as Indian critics thought that Roy wrote this novel in different manner for the western readers. For this she has used local colours politics, society and everything. She has managed to create an image of India, which is acceptable and interesting to the western readers but has nothing to do with reality.

Great literatures do not know caste and religious barriers They have no limits of nationality. This novel is open to all people from all over the world. Though there are some bitter opinions about her, there are such critics who praised her for her style, language and narrative technique "Kamala Das praised her", Arundhati Roy is lucky. We are not, But she is our child and we wish her well. we are happy for her." There are people who praise her more than criticise her.

The novel presents the dilemma of the feminine world, that Indian women had to face since time immemorial. The male-domination which is a particular feature of Indian society has been highlighted. And due to the fictional touch, the novel, I feel, as one of the Masterpieces by a Masterhand.

◆◆◆◆

## THE MOMENT WITH THEE

The first meeting !
The happiest moment of my life
True friends as we were
Our friendship our treasure !
I want to recall you
again and again
I want to meet you
again and again
Why ?
What is it excactly ?
I don't know
I want to ask you
About it as you know
More and more I think it
I want to express but
My lips keep shut
When you said
"I love you"
My life turns into celestial grandeur
I get immortal pleasure
I restored these words in my life
As emblem of seren love of my life !

*Miss. Murkar Shamli D.*
B. A. Part - III

## THE KNOT

Perusing the Silken thread
of our intimacy
My mind becomes Velvet.
But when I feel
The knot of estrangement
In the Silken Thread
My mind Shivered,
'A flower in the cold'.
A strong determination possessed my mind
only for you, my life only for you, to end
Misunderstanding clears away
Like Fog in the sunny morning
And Bells of friendship
start ringing and ringing.

*Miss. Vaishali S. Naik*
B. A. Part - III

## BAPU, THOU SHOULD BE LIVING AT THIS HOUR

Bapu, Thou should be living at this hour
India hath need of thee : she is a fen of dirty water !
Truth, peace morality and character
Loyalty, patriotism of our ancestor
Have forfeited their ancient Hindu dower
of inward glory and heroic pleasure !
we are selfish pigs of the Animal Farm'
Sons kill parents and brother to brother harm
Oh raise us up, return again to us
Give manners, virtue freedom and power to us
But I ask you will you came here ?
The land for which you sacrificed your life and air
Turned wild and enjoyed to garland your murderer !
What's going on this ? do you see nation's father ?

*Miss Nichite Megha V.*
B. A. Part - II


विद्यार्थ्यांच्या प्रगती पथाची क्रांतीकारी सुरुवात

# बिरंबोळे क्लासेस

११ वी/१२ वी सायन्स फिजीक्स, केमेस्ट्री, मॅथ्स, बायॉलॉजी

S. Y. B. COM STATISTICS

आणि सर्वच विद्यार्थ्यांना उत्कृष्ट इंग्रजी बोलण्यासाठी 'मनी बॅक गॅरंटीचा कोर्स'

**"मास्टरऽऽ युवरऽऽ इंग्लिश"**

● संपर्क : तुकाराम विद्यालय, टुरिस्ट हॉटेलच्या मागे, न्यू शाहूपुरी, एस.टी.स्टँडपासून जवळच, कोल्हापूर ●




■ मोझॅक टाईल्स ■ गालिचा टाईल्स
■ सिरॅमिक टाईल्स ■ डेकोरेटिव्ह कौले

✆ ऑफिस : 654123
निवास : 662093

# मोरबी टाईल्स

६८२ ई, शाहूपुरी ३ री गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१.

# दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट

नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |
| प्रकाशन स्थळ | : | वार्षिक |
| मुद्रकाचे नांव | : | श्री. श्री. सी. गोसावी<br>राजहंस प्रिंटिंग प्रेस |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | २५०/ब २७, नागाळा पार्क, कोल्हापूर<br>फोन : ६५३९०६, ६६६३६० |
| प्रकाशकाचे नांव | : | प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर |
| संपादकाचे नांव | : | प्रा. डॉ. जे. बी. शिंदे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |
| मालकी | : | कमला महाविद्यालय<br>ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |

मी डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**

# अहवाल विभाग

जिमखाना अहवाल

राष्ट्रीय छात्र सेना अहवाल

स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन विभाग अहवाल

वार्षिक दिन अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

व्यवसायाभिमुख शिक्षण अहवाल

प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग अहवाल

ग्रंथालय अहवाल

लोकसंख्या शिक्षण मंडळ अहवाल

प्राध्यापक प्रबोधिनी समिती अहवाल

वक्तृत्व व निबंध लेखन स्पर्धा समिती अहवाल

गुंजारव भित्तीपत्रक अहवाल

विविध कलागुण विकास मंडळ अहवाल

सहल विभाग अहवाल

# जिमखाना विभाग

## क्रीडा अहवाल १९९७-९८



**कु. वैशाली शिंदे**
ऑल इंडिया आंतरविद्यापीठ
व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभाग



**कु. अर्चना बेनाडे**
आंतरविद्यापीठ बास्केटबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. तृप्ती जाधव**
राज्यस्तरीय बास्केटबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. रुपा पवार**
राज्यस्तरीय बास्केटबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. माधवी चोरगे**
राज्यस्तरीय बास्केटबॉल
स्पर्धेत सहभाग



**कु. करिश्मा नाईक**
बास्केटबॉल युनिर्व्हिसिटी
कँपकरिता निवड



**कु. वैशाली जाधव**
राज्यस्तरीय महिला व्हॉलीबॉल
निवड चाचणीसाठी निवड



**कु. सविता शिंदे**
राज्यस्तरीय महिला व्हॉलीबॉल
निवड चाचणीसाठी निवड



**कु. कविता पाटील**
राज्यस्तरीय शासकीय
व्हॉलीबॉल निवड चाचणीसाठी निवड



**कु. कल्पना बागणे**
राज्यस्तरीय शासकीय
व्हॉलीबॉल निवड चाचणीसाठी
निवड



**कु. वैशाली कोपार्डे**
शासकीय जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स
मीटमध्ये गोळा फेक व
थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक



**कु. तेजस्विनी पोवार**
शासकीय राज्यस्तरीय
ॲथलेटिक्समध्ये तिहेरी
उडीत सहभाग



प्राचार्यांसमवेत शिवाजी विद्यापीठ विभागीय
उपविजेतेपद प्राप्त केलेला टेबल टेनिस संघ



**कु. कल्पना वाळवे**
राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
मीटमध्ये १०० मी.
धावणेमध्ये सहभाग



**कु. वृषाली मगदूम**
राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
मीटमध्ये उंचउडीत
तृतीय क्रमांक



**कु. सुरेखा चौगुले**
राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
मीटमध्ये लांबउडीत
सहभाग



**कु. विपुल कोले**
राज्यस्तरीय ॲथलेटिक्स
मीटमध्ये २०० मी.
धावणेमध्ये सहभाग

आमच्या महाविद्यालयाच्या सिनियर विभागाच्या संघाने शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर झोन स्पर्धेत बुद्धिबळ, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल टेबल टेनिस व ॲथलेटिक्समध्ये भाग घेतला. त्यापैकी बास्केटबॉल संघाला अजिंक्यपद मिळाले. तसेच टेबल टेनिस व व्हॉलीबॉल संघाला उपविजेतेपद मिळाले. बास्केटबॉल संघ, सातारा येथे आंतरविभागीय स्पर्धा खेळावयास गेला होता. या संघात कु. माधवी चोरगे, करिश्मा नाईक, अर्चना बेनाडे, तृप्ती जाधव, रुपा पवार, योगिता पवार, सत्यशिला दळवी, भारती चौगुले, मनीषा गुरव, साधना दलाल, सुचित्रा औरसंगे, रेहाना जमादार, यांचा समावेश होता. करिश्मा नाईक व अर्चना बेनाडे ह्यांची बास्केटबॉल युनिव्हर्सिटी कॅम्पकरिता निवड झाली व अर्चना बेनाडे ही तिरूपती येथे आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धा खेळावयास गेली होती. व्हॉलीबॉलमध्ये वैशाली शिंदेची आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता निवड होऊन, ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धा खेळावयास अमृतसर येथे गेली होती.

ज्युनिअर विभागाच्या संघाने शासकीय उच्च माध्यमिक स्पर्धेत बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खोखो व ॲथलेटिक्समध्ये भाग घेतला. त्यापैकी शहरस्तरावर खोखो संघाला उपविजेतेपद व जिल्हास्तरावर बास्केटबॉल संघाला उपविजेतेपद मिळाले, तसेच व्हॉलीबॉल संघाला जिल्हास्तरावर अजिंक्यपद मिळून, विभागीय स्तरावर उपविजेतेपद मिळाले. या संघात कु. कविता पाटील, योगिता दळवी, कल्पना बागणे, अनिता वडींगेकर, सरिता पाटील, सुरेखा चौगुले, आदर्शा चौगुले, पुष्पा कुंभार, दिपाली चौगुले,शीतल पाटील, सविता निकम व मनाली भालवणकर यांचा समावेश होता. कविता पाटील व कल्पना बागणेची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल निवडचाचणी मध्ये निवड झाली. ॲथलेटिक्समध्ये कु. वैशाली कोपार्डेने शहरस्तरावर व जिल्हास्तरावर गोळा फेक व थाळी फेक मध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर थाळी फेकमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. तेजस्विनी पोवारने विभागीय स्तरावर ट्रीपल जंपमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून राज्यस्तरीय ॲथलेटिक्स मीटमध्ये सहभाग घेतला. वृषाली मगदूमने उंच उडी मध्ये शहरस्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला, सुरेखा चौगुलेने उंच उडीत व लांब उडी मध्ये शहरस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ४ x ४०० मी. रिले रेस मध्ये शहर स्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. या रिले संघात तेजस्विनी पोवार, सीमा गावडे, वृषाली मगदूम, विपुल कोले व सुरेखा चौगुले यांचा समावेश होता.

शासकीय महिला क्रीडा स्पर्धेत बास्केटबॉल व व्हॉलीबॉल, तसेच ॲथलेटिक्स संघाने भाग घेतला. त्यापैकी बास्केटबॉल संघाने जिल्हा प्रतिनिधित्व केले व विभागीय स्पर्धेत सहभाग केला. पुढे ह्याच संघाने अकलूज व सातारा येथे झालेल्या खुल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेतला. व्हॉलीबॉल संघात कु. वैशाली शिंदे, कु. सविता शिंदे व वैशाली जाधव ह्यांची राज्यस्तरावर निवड झाली. ॲथलेटिक्समध्ये वैशाली कोपार्डे शहर व जिल्हास्तरावर गोळा फेक व थाळी फेक मध्ये प्रथम क्रमांक मिळवून, विभागीय स्पर्धेत भाग घेतला व ४ x ४०० मी. रिले रेस व ४ x १०० मी . रिले रेस मध्ये शहर स्तरावर अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून जिल्हास्तरावर ४ x ४०० मी. रिले रेस मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. सांगली येथे झालेल्या ॲथलेटिक्स ॲम्युचर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये वैशाली कोपार्डेने गोळाफेक व थाळी फेक मध्ये सुरेखा चौगुले व वृषाली मगदूमने, उंच उडीत विपुल कोलेने ४०० मी. रनींगमध्ये व तेजस्विनी पोवारने तिहेरी उडीत भाग घेतला व त्यामध्ये उंच उडीत वृषाली मगदूमला तृतीय क्रमांक मिळविला व बास्केटबॉलमध्ये माधवी चोरगे, रुपा पवार व तृप्ती जाधव यांची राज्यस्तरावर निवड झाली.

**प्रा. श्रीमती साधना पाटील**
कनिष्ठ विभाग

**प्रा. सौ. सुनिता काळे**
प्रमुख, जिमखाना विभाग

# राष्ट्रीय छात्रसेना [एन.सी.सी.]

## पाऊल पडते पुढे...



**कॅडेट वैशाली शिंदे**
भारताच्या स्वातंत्र्य
सुवर्णमहोत्सवानिमित्य आयोजित
राष्ट्रीय स्तरावर
महाराष्ट्र टीममधून निवड



**सार्जंट दिपाली पाटील**
ए.एल.सी.-गुजरात
प्री.आर.डी.-औरंगाबाद
सी.ए.टी.सी.-पलूस
बेस्ट एन.सी.सी.कॅडेट



**सीपीएल शितल माने**
एन.आय.सी.-पुणे
ए.टी.सी.-सोनतळी
ए.टी.सी.-तारदाळ



**सीपीएल शुभांगी माने**
एन.आय.सी.-पुणे
ए.टी.सी.-सोनतळी



**सीपीएल प्रिया चव्हाण**
बी.एल.सी.-कोल्हापूर
ए.टी.सी.-तारदाळ



**सीपीएल तेजस्विनी पोवार**
एन.आय.सी.-म्हैसूर
स्पोर्टस कँप-पुणे
बी.एल.सी.-कोल्हापूर
ए.टी.सी.-पलूस



**कॅडेट लता सातपुते**
सी.ए.टी.सी.-कोल्हापूर
ए.टी.सी.तारदाळ



**लान्स कार्पोरल स्मिता पाटील**
ए.टी.सी.-तारदाळ
ए.टी.सी.-बेस्ट फायरर



**कॅडेट वैशाली वसवाडे**
बी.एल.सी.-कोल्हापूर
ए.टी.सी.-तारदाळ



**कॅडेट अरुणा भंडारी**
एन.आय.सी.-पुणे, ए.टी.सी.-तारदाळ
एडस् निर्मूलन स्पर्धेत तृतीय क्रमांक



**कॅडेट रुपाली मगर**
एन.आय.सी., म्हैसूर

महाविद्यालयाच्या एन्. सी. सी. विभागाची उत्तरोत्तर होत चाललेली प्रगती म्हणजेच महिलांच्या भविष्यकालीन कर्तृत्वाचा चढता आलेख ठरावा. गत शैक्षणिक वर्षात भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवा-निमित्त एन्. सी. सी.मार्फत ऑल इंडिया स्तरावर व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ६ महाराष्ट्र गर्ल्स् बटालियनमधून आमच्या महाविद्यालयाची कॅडेट वैशाली शिंदे हिची महाराष्ट्र टीममधून अभिमानास्पद निवड झाली. कोल्हापूर, पलूस, अहमदनगर येथे संपन्न झालेल्या कंबाइन ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प-एक, दोन, तीन या शिबिरात सार्जंट दीपाली पाटील, सीपीएल तेजस्विनी पोवार, कॅडेट त्रिशूला नार्वेकर, वैशाली वसावडे, सीमा कांबळे, सुखदा बनसोडे, शिल्पा पोवार आदि कॅडेट्सनी यशस्वी कामगिरी बजावली.

स्पोर्टस् ग्रुप्स कँप कोल्हापूर, पुणे येथे घेणेत आला. त्यामध्ये कॅडेट वैशाली शिंदे, वैशाली जाधव, उज्वला पाटील, सविता शिंदे, तेजस्विनी पोवार आदि कॅडेट्सनी व्हॉलीबॉलमध्ये चांगले नैपुण्य दाखविले. म्हैसूर येथे संपन्न झालेल्या 'राष्ट्रीय एकात्मता' शिबिरात सीपीएल् तेजस्विनी पोवार, कॅडेट रूपाली मगर यांचा यशस्वी सहभाग. पुणे येथे झालेल्या 'मेडिकल अटॅचमेंट कँप'मध्ये कॅडेट अरुणा भंडारी व त्रिशूला नार्वेकर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. पुणे येथे आयोजित 'राष्ट्रीय एकात्मता' शिबिरात कॅडेट त्रिशूला नार्वेकरने सहभाग घेतला.

तारदाळ येथे संपन्न झालेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात सांगली, सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी या जिल्ह्यातून आमच्या महाविद्यालयाच्या १२ छात्रांनी उत्कृष्ट कामगिरी केली. लान्स कार्पोरिल स्मिता पाटील हिने 'बेस्ट फायरर'चा मान मिळविला, तर लान्स कार्पोरिल सीमा कांबळेने 'गार्ड ऑफ ऑनर'चा मान मिळविला. 'एडस् निर्मूलन' निबंध स्पर्धेत कॅडेट अरुणा भंडारी हिने तृतीय क्रमांक पटकाविला. या वर्षीची 'सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय छात्र' पारितोषिकासाठी सार्जंट दीपाली पाटीलची निवड कौतुकास्पद आहे.

सन्माननीय 'सी' प्रमाणपत्र सार्जंट सोनिया दळवी, सीपीएल् लता पाटील, कॅडेट गीतांजली निंबाळकर, किट्टे, वृषाली पाटील, राज्यश्री पाटील आदिंनी मिळविले.

याशिवाय आमच्या छात्रांनी रक्तदान, वृक्षारोपण, सद्भावना दिवस, राष्ट्रीय छात्र सेना दिवस, प्रजासत्ताक दिन, एडस् निर्मूलन रॅली, तसेच संस्थेतील कार्यक्रमात यशस्वी सहभाग घेतला. आमच्या ताराराणी संस्थेमार्फत थोर स्वतंत्रता सेनानी डॉ. उषा मेहता यांना 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' देणेत आला तेव्हा त्यांचे स्वागत, सलामी, तसेच शिस्त व बैठक व्यवस्था आदिसाठी आमच्या विभागाने केलेली कामगिरी अनेक मान्यवरांच्या प्रशंसेस पात्र ठरली. विभागाच्या या यशात प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचा मोलाचा वाटा आहे.

**प्रा. डॉ. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार**
एन्. सी. सी. विभाग प्रमुख - लेफ्टनंट

# स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन विभाग




विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना यशस्वी महिला उद्योजिका व कमला महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी **कु. छाया पाटील**

विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा आणि विविध स्पर्धात्मक परीक्षांबाबत योग्य मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने या विभागामार्फत विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. विविध रोजगारविषयक जाहिराती काचफलकात लावण्यात आल्या. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात यासंबंधी अनेक प्रकारची माहितीपर पुस्तके, मासिके उपलब्ध करून देण्यात आली. वैयक्तिक पातळीवरही वेळोवेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रा. सौ. मैंदर्गी व्ही. व्ही.**
(स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन विभाग)

# वार्षिक दिन समारंभ




**कु. राजश्री मायदेव** व सहभागी कलाकार भरतनाट्य

# वार्षिक स्नेहसंमेलन अहवाल



**फूड फेस्टिव्हलची पाहणी करीत असताना**
**मा. प्राचार्य डॉ. के. आर. पाटील, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. एस्. व्ही. बागल व सहकारी प्राध्यापक आणि जी. एस. कु. लता पाटील व विद्यार्थिनी प्रतिनिधी**

वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील अपूर्व उत्साहाचा, जल्लोशाचा व विविध कला, क्रीडागुण व नैपुण्य प्रगट करण्याची सुसंधी मिळणारा क्षण होय. या संधीचा फायदा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या रुपाने आमच्या विद्यार्थिनींनी घेतला. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त मराठी व हिन्दी वक्तृत्व व निबंध स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, कुकरी स्पर्धा इ. स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याचा शुभारंभ शनिवार दिनांक २४ जानेवारी १९९८ रोजी कॉलेजच्या प्रांगणात मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे शुभहस्ते झाला. या दिवशी मनोरंजनाचा विविध गुण दर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नाट्यप्रवेश, सिनेगीत, भावगीत, नकला, एकांकिका, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन, रेकॉर्ड डान्स इ. कार्यक्रम सादर करून कलाकार विद्यार्थिनींनी रसिक प्रेक्षकांकडून दाद मिळविली.

रविवार दि. २५ जानेवारी १९९८ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत फूड फेस्टिव्हल व पारंपारिक वेशभूषा इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले होते. फूड फेस्टिव्हलमध्ये आमच्या विद्यार्थिनींनी विविध राज्यांतील प्रसिद्ध खाद्य पदार्थांचे प्रदर्शन व विक्रीकेंद्रे उभारली होती. याचा लाभ प्राध्यापक व सर्व

विद्यार्थिनींनी घेतला. तसेच पारंपारिक वेशभूषा स्पर्धेमध्ये आमच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन बंगाली, गुजराथी, आदीवासी, महाराष्ट्रीय इ. पेहराव प्रकारांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

त्याच दिवशी दुपारी 3 ते ६ या वेळेत ऑर्केस्ट्रा व त्याच सोबत उत्स्फूर्त सरप्राईज अॅटम सादर करण्यात आले. या ऑर्केस्ट्रात सिनेगीते, भावगीते, गझल, द्वंद्वगीते, पोवाडा व लावणी इ. कार्यक्रमांचे सादरीकरण केले व सरप्राईज अॅटममध्ये उपस्थितांच्यापैकी अनेक स्पर्धकांनी सक्रीय सहभाग घेऊन कार्यक्रमाची रंगत वाढविली.

दि. ३१ जानेवारी १९९८ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे - दैनिक सकाळचे संपादक मा. अनंत दीक्षित यांचे शुभहस्ते, संस्थेच्या शारदा मंदिरात आयोजित करण्यात आला होता. संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष मा. रा. कृ. कणबरकरसो, ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष मा. रामराव बेनाडीकर, तसेच श्रीमती शकुंतलादेवी घाटगे यांच्या उपस्थितीत मान. पाहुण्यांच्या शुभहस्ते विविध विषयात, क्रीडांमध्ये, राज्य, राष्ट्रीय व विद्यापीठीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके देऊन गौरविले गेले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी करून दिला, तर कार्याध्यक्ष प्रा. एस्. व्ही. बागल यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. या कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.

वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सर्व समित्यांचे चेअरमन, महाविद्यालयाची जी. एस्. कु. लता पाटील, सर्व सहकारी प्राध्यापक, वर्ग प्रतिनिधी, खेळाडू, स्पर्धक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे बहुमोल सहकार्य मिळाले.

**प्रा. एस्. व्ही. बागल**

वार्षिक स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष


जीवनात यशस्वी होण्यासाठी दर्जेदार शिक्षण देणारे

**प्रा. गोरे पी. जे.** M.Sc. यांचे

**GORE'S CLASSES**

*Regular/Vacation Batches*

**८ वी ते १० वी Maths-Science ● ११ वी, १२ वी Science PCMB**

**Polytechnic-Maths, Phy. Chemist,**

**MBBS Entrance Exam.**

*निराशा टाळण्यासाठी आजच प्रवेश घ्या*

● **संपर्क** : आदित्य चेंबर्स, १३ वी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर. फोन : ५२६५१५ ●

● **ऑफिस वेळ** : सकाळी ७ ते ११ व सायं. ४ ते ८ ●




अंबाबाईचा गोंधळ मध्ये
सहभागी कलाकार

ऑर्केस्ट्रामध्ये
**कु. प्रिया महाजन**
बी. ए. भाग ३






नांदीमध्ये सहभागी कलाकार



कुण्या गावाचं आलं पाखरू या लावणीत **कु. मंजिरी भूमकर** ११ वी कॉमर्स



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात **मा.श्री.अनंत दीक्षित** विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना...

# राष्ट्रीय सेवा योजना

प्रचंड व वेगवान तांत्रिक प्रगतीमुळे जग अगदी लहान झाले आहे. मानवाने प्रगतीची अनेक शिखरे काबीज केलेली आहेत. तरी सुद्धा समाजातील सर्व समस्या सुटलेल्या नाहीत. त्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर कार्ये सुरू आहेत. असेच कार्य करणारी एक योजना म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय.

## नियमित सेवा योजना

या सेवायोजनेद्वारे आम्ही दत्तक खेडे, मौजे कणेरी, ता. करवीर आणि कॉलेजच्या परिसरातील विविध कामे हाती घेऊन यशस्वीरित्या पार पाडली आहेत.

आमच्या विद्यार्थिनींनी मौजे कणेरी या गावी शारीरिक कष्टाची विविध कामे केली. यामध्ये रस्ता दुरुस्ती, गटारी साफ करणे, गाजर गवताचे निर्मूलन, याशिवाय खालील कामे केली.

## सागाची लागवड

'झाडे लावा, झाडे जगवा' हा उपक्रम राबविण्यासाठी ताराराणी विद्यापीठाच्या परिसरामध्ये सागाची शंभर झाडे आमच्या विद्यार्थिनींनी लावली.

## स्वतंत्रता दौड

दि. ९ ऑगस्ट ९७ रोजी शिवाजी स्टेडियमपासून कोल्हापूर शहरामध्ये जी स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त स्वतंत्रता दौड आयोजिली होती. त्यामध्ये आमच्या एन्. एस्. एस्. च्या विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या.

## रक्षाबंधन

दि. १८ ऑगस्ट ९७ रोजी बालसंकुल केंद्र, मंगळवार पेठ येथील मुलांना आमच्या विद्यार्थिनींनी बंधुभावाने राख्या बांधल्या व खाऊचे वाटप केले. यावेळी तेथील अधीक्षक मान. साळुंखेसाहेब यांच्याबरोबर आमच्या विद्यार्थिनींनी बालसंकुलातील मुलांच्याबरोबर मनमोकळी चर्चा केली. बालसंकुलातील शिस्त व समाजोपयोगी काम पाहून आमच्या मुलींना समाजकार्याची प्रेरणा मिळाली.

## एडस् रॅली

दि. १-१२-९७ छ. प्रमिलाराजे रुग्णालयापासून गांधी मैदानापर्यंत एडस् रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात आमच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या रॅलीत एडस् या महाभयंकर रोगापासून सावध कसे राहता येईल या संदर्भात मुलींनी घोषणा दिल्या.

## पल्स पोलिओ मोहीम

दि. ७ डिसेंबर ९७ व दि. १८ जानेवारी ९८ रोजी ० ते ५ वयोगटातील बालकांना पल्स पोलिओ डोस देण्यात आले. तेव्हा पोलिओ डोस लाभार्थी मुलांना डोस पाजणे, आरोग्य केंद्रात घेऊन येणे याचा प्रचार करण्याचे काम आमच्या एन्. एस्. एस्. च्या विद्यार्थिनींनी केले. अशाप्रकारे आमच्या विभागाचे कार्य अत्यंत व्यवस्थितपणे चालू आहे.

**प्रा. जे. बी. पाटील**
**प्रा. सौ. बी. व्ही. शेळके**
सहाय्यक प्रकल्प अधिकारी

**प्रा. एन्. एस्. शिरोळकर**
**प्रा. ए. एस्. घस्ते**
प्रकल्प अधिकारी

### अधिक दोन स्तरावरील

# राष्ट्रीय सेवा योजना

विद्यार्थी दशेमध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच समाज शिक्षणाची जाणीव व्हावी व सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत जाऊन वास्तव जीवनाची अनुभूती घ्यावी या हेतूने गतवर्षीपासून महाराष्ट्र शासनाने कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर ''राष्ट्रीय सेवा योजना'' हा उपक्रम सुरु केला आहे. गतवर्षी एक युनिट आमच्या महाविद्यालयात सुरु केले होते. यावर्षी ५० विद्यार्थिनींचे आणखी एक युनिट मंजूर झाल्यामुळे प्रथम व द्वितीय वर्षाच्या एकंदर १०० विद्यार्थिनी या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत.

या वर्षीच्या उपक्रमांची सुरुवात दि. २ ऑक्टोबर १९९७ रोजी मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग




राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी मौजे हणमंतवाडी, ता. करवीर येथे **''पल्स पोलिओ''** अभियानाचा एक भाग म्हणून आयोजित केलेली प्रचारफेरी

कोल्हापूर यांच्या उपस्थितीत झाली. या योजनेच्या नियमित उपक्रमांसाठी मौजे हणमंतवाडी, ता. करवीर हे दत्तक खेडे घेतले आहे. या योजनेच्या उपक्रमांचा भाग म्हणून श्रमदान, एडस्‌विरोधी जागृती, व्यसनाधीनता, आरोग्य पर्यावरण आदी विषयांवरील व्याख्याने, पल्स पोलिओ प्रचार मोहीम इ. कार्यक्रम राबविले गेले. त्यासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. ए. एल्. नरके आणि मौजे हणमंतवाडीचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. एस्. एन्. कोळेकर**
प्रकल्प अधिकारी

# व्यवसायाभिमुख शिक्षण



**मे. घाटगे-पाटील ट्रान्स्पोर्ट कंपनी लि.**, येथे दि. ४ नोव्हें ९७ ते २४ नोव्हें. ९७ पर्यंत प्रशिक्षण कालावधीचा समारोप प्रसंगी.

या उपक्रमांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम पदवी स्तरावर ''ऑफिस मॅनेजमेंट अँड सेक्रेटरीयल प्रॅक्टिस'' हा व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्यास आमच्या महाविद्यालयास परवानगी देण्यात आली आहे.

हा अभ्यासक्रम वाणिज्य शाखेकडे सुरु करण्यात आला असून यामध्ये प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गाच्या १६ विद्यार्थिनींना गुणानुक्रमे प्रवेश देण्यात आला आहे. तर द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील २० विद्यार्थिनींनी हा अभ्यासक्रम घेतला आहे. सदर कोर्स तीन वर्षाचा असून बी. कॉम. पदवीबरोबरच त्यांना हा कोर्स पूर्ण करता येणार आहे.

बी. कॉम. भाग दोन मधील विद्यार्थिनींसाठी अभ्यासक्रमाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा या उद्देशाने मे. घाटगे-पाटील ट्रान्स्पोर्ट कंपनी लि. कोल्हापूर व कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ नोव्हेंबर १९९७ ते २४ नोव्हेंबर १९९७ या कालावधीत प्रत्यक्ष कामासंबंधीचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री. मिलींद कुलकर्णी, पर्सनल मॅनेजर व श्री. एस्. बी. कुंभार, पर्सनल ऑफिसर घाटगे-पाटील ट्रान्स्पोर्ट प्रा. लि., व प्रा. एम्. ए. लोहार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सदर कोर्सची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी विशेष प्रयत्न केले असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली या विभागाची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

**प्रा. एस्. व्ही. बागल**
विभाग प्रमुख

# प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग



ज्युडो-कराटे कोर्समधील विद्यार्थिनी अप्परलॉक करताना

स्त्री संरक्षणात्मक शिक्षणासाठी प्रौढ व निरंतर शिक्षण विभागांतर्गत महाविद्यालयाच्या जिमखाना विभागामार्फत दि. १५ डिसेंबर १९९७ ते १५ जानेवारी १९९८ या कालावधीत ''ज्युदो-कराटे'' कोर्सचे आयोजन करण्यात आले. या अभ्यासक्रमात ४४ विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच मुलींना व्यवसायाभिमुख शिक्षण देण्याच्या उद्देशाने प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग व गृहविज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात १८ ऑगस्ट १९९७ ते १८ डिसेंबर १९९७ या कालावधीत ''ड्रेस डिझाईनिंग'' चा कोर्स घेण्यात आला.

**प्रा. कु. आर. डी. पंडित**
अध्यक्षा, प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग

# ग्रंथालय अहवाल

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा महत्त्वाचा विभाग असून, प्राध्यापक व विद्यार्थिनींसाठी लागणारी सर्व योग्य पुस्तके, संदर्भ पुस्तके, मासिके आणि अभ्यासिका विभाग इ. सर्व सोयी असल्याने निकाल चांगले लागतात.

आज अखेर महाविद्यालयाची ग्रंथसंख्या २४,९४२ इतकी झाली असून, त्याची किंमत रु. ९ लाख ३८ हजार इतकी आहे. यू.जी.सी. अनुदानातून ४५२ पुस्तके घेतली असून ३८ हजार रुपये खर्च केले आहेत. बुक-बँक, ज्युनियर व सिनियर कॉलेजसाठी ९५८ पुस्तके घेतली आहेत. त्यासाठी चालू वर्षी रुपये ८२ हजार खर्च केले आहेत. एकूण १,२०,००० रु. खर्च केले आहेत. ग्रंथालयात एकूण ४४ मासिके, ९ दैनिके येतात.

चालू वर्षी बुक-बँकेतून ७,३२३ पुस्तके दिली असून, त्याचा लाभ १,०५२ विद्यार्थिनींनी घेतला आहे. खेळाडू व हुषार अशा एकूण ६२ विद्यार्थिनींना मोफत पुस्तके दिली आहेत. ग्रंथालयासाठी वेगळ्या अभ्यासिकेचे बांधकाम सुरू झाले असून, ग्रंथालय समृद्ध करण्याकरिता प्राचार्य क्रांतिकुमार पाटील प्रयत्नशील आहेत.

**जे. पी. जाधव**, ग्रंथपाल

# लोकसंख्या शिक्षण मंडळ

सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात लोकसंख्या शिक्षण मंडळाद्वारा झालेल्या कामकाजाचा आढावा घेत असताना काही महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण विभागामार्फत हे मंडळ आमच्या महाविद्यालयात सुरू असून, १९९७-९८या वर्षात मंडळाने विविध स्पर्धात विद्यार्थिनींचा सहभाग घेऊन उल्लेखनीय कार्य केले आहे

कोल्हापूर जिल्हा सहकार मंडळाद्वारा घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमच्या मंडळाने पाठविलेल्या विद्यार्थिनींनी दुसरे व तिसरे पारितोषिक पटकावले असून, जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत पहिला व दुसरा क्रमांक पटकाविला आहे. शिवाय महात्मा जोतीराव फुले विश्वभारती, गारगोटी या संस्थेस आमच्या विद्यार्थिनींनी निबंध पाठविले आहेत.

महाराष्ट्र राज्य सहकार महासंघाने पुणे येथे आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेस कोल्हापूर जिल्ह्यातून दोन स्पर्धकांमध्ये आमच्या महाविद्यालयाच्या एका विद्यार्थिनीची निवड केली आहे.

चालू वर्षी महाविद्यालयात स्पर्धांचे आयोजन करण्याऐवजी महाविद्यालयाबाहेर आयोजित होणाऱ्या स्पर्धांसाठी विद्यार्थिनींची तयारी करून घेण्याचे धोरण मंडळाने ठेवले. त्याला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले.

प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या द्वारा प्रत्येक वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा आमच्या महाविद्यालयास लोकसंख्या शिक्षण मंडळ कार्यरत करण्याची संधी दिली. सन १९९७-९८ या वर्षात आम्ही महाविद्यालयात उपक्रम राबविण्याऐवजी महाविद्यालयाबाहेर संपन्न होणाऱ्या व आयोजित केलेल्या वक्तृत्त्व व निबंध स्पर्धेत सहभाग घेतला आणि अशा स्पर्धामध्ये यश मिळविण्याइतकी तयारी आमच्या मंडळाच्या सदस्य विद्यार्थिनींनी केली आणि अपेक्षे इतके यश मिळविले त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे देत आहे.

**लोकसंख्या शिक्षण मंडळाची कार्यकारिणी -**

महाविद्यालयात लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्य सुरु ठेवण्यासाठी मा. प्राचार्यांनी पुढील कार्यकारिणी नियुक्त केली.

| | | |
|---|---|---|
| मा. | प्राचार्य - के. आर. पाटील | अध्यक्ष |
| प्रा. | एन्. व्ही. पोवार | प्रकल्पाधिकारी व सचिव |
| डॉ. | जे. बी. शिंदे | सदस्य |
| प्रा. | ए. एस्. घस्ते | सदस्य |
| प्रा. | सौ. टी. पी. पाटील | सदस्या |
| प्रा. | सौ. ए. व्ही. पाठक | सदस्या |
| प्रा. | सौ. बी. व्ही. शेळके | सदस्या |
| प्रा. | सौ. एन्. एस्. धुमाळ | सदस्या |

वरील कार्यकारीणीच्या निरीक्षणाखाली १९९७-९८ यावर्षी लोकसंख्या शिक्षण मंडळाचे कार्य यशस्वीपणे पार पडले. आमच्या मंडळाच्या विद्यार्थिनींनी महाविद्यालया बाहेरील स्पर्धेत स्पृहनीय यश मिळविले त्या स्पर्धा व यशाचा तपशील असा.

## निबंध स्पर्धा -

